# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. विशेष महासभा दि. १३/०५/२०१५

करण क्र. ०१ :- उत्तन घनकचरा प्रकल्प या ठिकाणी असलेली शेड भाड्याने देणेबाबत.

:०१ :-

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात उत्तन घनकचरा प्रकल्पाच्या जागेत महानगरपालिकेची शेड आहे. सदर शेड यापुर्वी ५० मेट्रीक टन कचरा प्रकल्पातंर्गत सन २००३ मध्ये बांधण्यात आली होती. तद्नंतर सदर शेडच्या छपराचे कामाचा वापर परिवहन उपक्रमातंर्गत कार्यशाळेस वापरण्यासाठी करण्यांत आले. तथापि सदर ठिकाणी कार्यशाळा करण्यास संबंधितांनी नकार दिल्याने सद्यस्थितीत सदर शेड वापराविना पडून आहे. सदर शेडच्या संदर्भात बांधकाम विभागामार्फत झालेल्या एकुण खर्चाची चौकशी करुन अहवाल सादर करावा. शेडचे एकूण क्षेत्रफळ १८१०.०० चौ. मी. असून चालू बाजारभावानुसार (Ready Recknor) या शेडच्या जागेचे वार्षिक रू. १९,४४,०००/- एवढे भाडे होत आहे. सदर शेड वापरण्यासाठी भाडयाने दिल्यास महानगरपालिकेस उत्पन्न मिळून शेडची देखभाल होऊ शकेल. तेव्हा सदरची शेड भाडयाने देण्यासाठी नाची पूर्वपरवानगी घेऊनच निविदा काढण्यास ही सभा मंजुरी देत आहे.

तसेच भविष्यात स्थावर व जंगम मालमत्ता सर्व प्रकारे भाडयाने देण्यासाठी खालीलप्रमाणे धोरण राहील.

१) महानगरपालिकेने चालू बाजारभावाप्रमाणे (Ready Recknor) दर निश्चित करण्यासाठी नियुक्त केलेल्या द्विस्तरीय समितीत बांधकाम व नगररचना विभागाचे अधिकारी यांनी निश्चित करून दिलेल्या चालू बाजारभावाप्रमाणे (Ready Recknor) प्रमाणे मूल्य ठरवावे.

२) सदर मालमत्तेची बाजारभावाप्रमाणे मुल्य ठरल्यानंतर जाहिर निविदा प्रसिध्द करावी.

३) निविदाद्वारे प्राप्त देकार मंजुरीसाठी मा. स्थायी समितीची मंजुरी घ्यावी.

तसेच यापुढे *महापालिका मालकी हक्काच्या स्थावर व जंगम मालमत्ता चालू बाजारभावाप्रमाणे* (Ready Recknor) च्या दरावर निविदा काढून मा. स्थायी समितीची मंजुरी घेऊन करावी. त्यासाठी ही महासभा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम - ७९ (क) (द) व (इ) नुसार यापुढे मा. आयुक्तांना अधिकार देण्यात येत आहे.

*ज्याअर्थी मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांनी पत्र क्र. महसुल क्र.-१/टे-१/एल.बी.पी./कावि-१५७२ /२००२* दि. २६/१२/२००२ अन्वये मौजे उत्तन सर्व्हे क्र. २५ व मौजे पाली सर्व्हे क्र. ६५ ज्याचे एकुण क्षेत्र ३१.४६ हेक्टर मिरा भाईंदर महानगरपालिकेस हस्तांतरीत केलेली आहे व मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी नियम २००० प्रमाणे घनकचरा प्रकल्प कार्यान्वीत करणे बंधनकारक आहे.

सदरहू जागेवर शासन निर्णय महसुल व वन विभागातील परिपत्रक क्र. सीआर-१९०९ ज-५/ दि.४/२/१९८३ तसेच मा. आयुक्त कोकण विभाग यांचेकडील परिपत्रक क्र. आर.बी/डेक्स/ एलएनडी(१)/परिपत्रक-१०/८८ दि. नुसार महसुल मुक्त विनंतीने विनामुल्य शासनाचे कार्योत्तर मंजुरीच्या अधीन राहून व शासनाचे कार्योत्तर मंजुरीचे आदेशामधील अटी व शर्तीची पुर्तता करणे बंधनकारक झाल्याबाबतचे हमीपत्र महानगरपालिकेकडून घेतलेले आहे.

**अटीशर्तीचे** अ.क्र. ३ प्रमाणे वर्ग करण्यात आलेली जमीन कोणत्याही प्रयोजनासाठी खाजगी व्यक्ती / सरकारी विभागास अथवा सरकारी कार्यालयास शासनाची पुर्वपरवानगीने हस्तांतर अथवा विक्री करता येणार नाही.

अ.क्र. ४ प्रमाणे वर्ग करण्यात आलेल्या जमिनीच्या अतिक्रमापासुन संरक्षण करुन जागेवर अतिक्रमण न होऊ देण्याची जबाबदारी महानगरपालिकेवर राहिल.

तथापी सदर विषय बाबतचा कुठलाही प्रस्ताव महासभेसमोर मंजुरीसाठी आणायचा असल्यास शासनाची पुर्वपरवानगी घेण्यात यावे. तसेच जागेवर झालेले अतिक्रमण हटविण्याची कार्यवाही करण्यात यावी व भविष्यात अतिक्रमण होऊ नये याबाबतची उपाय योजना करावी असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. रोहिदास पाटील** **अनुमोदक :- सौ. निलम ढवण**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १३/०५/२०१५

प्रकरण क्र ०२ :- ॲन्टी करप्शन ब्युरो कार्यालयातून लाचलुचपत प्रकरणी अटक करण्यात आलेले महानगरपालिकेतील अधिकारी/कर्मचारी यांच्यावर मा. न्यायालयात अभियोग दाखल करणेकरीता मा. आयुक्त यांनी दिलेल्या मंजूरी प्रकरणाचे अवलोकरण करणे.

ठराव क्र ०२ :-

सदर विषयाचे गोषवाऱ्यानुसार अवलोकन करण्यांत आले.

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. विशेष महासभा दि. १३/०५/२०१५

**प्रकरण क्र. ०३ :- मालमत्ता कर आकारणी व वसुली बाबत आढावा घेणे. मालमत्तांचे (Revision) करणेबाबत.**

**ठराव क्र. 03 :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील विविध मालमत्तांना कर मागणीनुसार/सर्वेक्षणानुसार कर आकारणी करण्यात येते. कर आकारणी करताना संबधीत मालमत्तांचे क्षेत्र, त्यावेळेस मालमत्ता कराचा दर, मालमत्ता या भाडेतत्वावर आहेत का?, निवासी, बिगरनिवासी, इ. विचारात घेऊन नविन/सुधारीत कर आकारणी केली जाते.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात, मिरा भाईंदर नगरपालिका काळापासून मालमत्ता कर आकारला गेला आहे, तरी कर आकारणीबाबत अनेक तक्रारी प्राप्त होतात, चुकीच्या क्षेत्रफ़ळाची नोंदणी, निवासी मालमत्तेचे बिगरनिवासी होणे, संपूर्ण इमारतीची कर आकारणी झाली आहे. परंतू त्यातील काही सदनिकांना कर आकारणी झालेली नाही, एकाच भागात एकाच क्षेत्रफ़ळाच्या मालमत्तेचे विविध करयोग्य मुल्य असणे, फ़ेरफ़ार करण्यात आलेल्या इमारतींना वाढीव कर आकारणी करण्यात आलेली नाही, एखाद्या इमारतीस सूट दिली तरी त्याची नोंद नसणे, इ. अनियमितता दिसून येत आहे.

या बाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे प्रकरण ८ कराधान नियम ९ नुसार 'आयुक्ताने' कर आकारणी पुस्तक ठेवले पाहिजे. त्यात (अ) शहरातील **सर्व इमारती व जमिनींची यादी** आयुक्तास योग्य वाटेल अशा रितीने एकतर नावावरून किंवा क्रमांकावरून प्रत्येक इमारत किंवा जमीन ही वेगवेगळी दाखवली पाहिजे आणि तीत प्रत्येकीचे स्थान किंवा स्वरूप यासंबंधी जो तपशील तिची ओळख पटविण्यासाठी त्याच्या मते पुरेसा होईल, असा तपशील असला पाहिजे. (ब) या अधिनियमाच्या व नियमाच्या तरतूदीनुसार ठरवलेले अशा प्रत्येक इमारतीचे व जमिनीचे करयोग्य मुल्य, (क) अशा प्रत्येक इमारतीवर किंवा जमिनीवर बसवण्यायोग्य असलेले मालमत्ता कर असल्यास ते मालमत्ता कर देण्यास प्रथमतः जबाबदार असलेल्या व्यक्तिचे नाव, (ड) अशी कोणतीही इमारत किंवा जमीन सामान्य कराच्या आकारणीस जबाबदार नसेल तर ती अशी जबाबदार नसल्याबद्दलची कारणे. (ई) त्या वर्षासाठी बसवावयाच्या मालमत्ता कराचे दर महानगरपालिकेने रितसर ठरवले असतील. तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कराधान नियम १० नुसार प्रत्येक प्रभागासाठी वेगळे आकारणी पुस्तक तयार करणे आणि आवश्यक असल्यास त्याचे भाग पाडणे आवश्यक आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कराधान नियम २० नुसार आयुक्तास तदनंतर प्रत्येक सरकारी वर्षात आकारणी पुस्तकात सुधारणा करता येईल. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कराधान नियम २१ नुसार प्रत्येक सरकारी वर्षी नवीन कर आकारणी पुस्तके तयार करण्याची आवश्यकता असणार नाही.

परंतू मिरा भाईंदर महानगरपालिका कर विभागामार्फ़त काही वेळा सर्वेक्षण केल्यानंतर आकारणी न झालेल्या मालमत्तांची कर आकारणी करण्यात आली आहे. परंतू उपरोक्त नियमानुसार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सर्व इमारतींची व जमिनीची सर्वकष यादी तयार करण्याचे काम प्रलंबित आहे.

तरी मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सर्व मालमत्तांची कर आकारणी, वापर बदलाबाबतची नोंद घेऊन त्यानुसार आकारणी, Under Acess मालमत्तांची योग्य आकारणी, इमारतीत वाढीव बांधकाम झाले असतानाही त्यावर आकारणी झाली नाही अशा मालमत्तांची आकारणी, अनधिकृत असतानाही शास्तीसह आकारणी नसलेल्या मालमत्तांची शास्तीसह आकारणी करून मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्ता करात भरघोस वाढ निश्चितच होईल. सदरची वाढ ही कायमस्वरुपी असेल. तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कराधान नियम ९, १० व २० नुसार कर आकारणी पुस्तक तयार होऊन पुढील प्रत्येक वर्षी त्यात सुधारणा करून सदरचे कर आकारणी पुस्तक अद्ययावत होणे शक्य होईल. उपरोक्त नमुद केलेली कर आकारणीची कामे प्रत्यक्ष मिळकतींचे सर्वेक्षण करुन करावयाची आहेत.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सर्व मालमत्तांचे (Revision) होऊन कर आकारणी पुस्तके तयार करणे इत्यादी कामकरीतामिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सन २०१५-१६ च्या वार्षिक अंदाजपत्रकात रूपये आठ कोटी एवढी तरतुद ठेवण्यात आली आहे. उपरोक्त नमुद केलेली सर्व कामे

करणेकामी खाजगी एजंन्सीची नेमणुक करावी लागणार आहे. तरी या कामी खाजगी एजंन्सीची नेमणुक करणे व या येणाऱ्या कामास व खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देण्यात येत आहे. तसेच अधिकृत इमारती किंवा किंवा अधिकृत बांधकामावर शास्ती लावली असेल तर त्वरीत रद्द करावी असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. नरेंद्र मेहता** **अनुमोदन :- श्री. राकेश शाह**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | मेहता नरेंद्र लालचंद | १ | सय्यद नुरजहाँ नझर हुसेन | निरंक |
| २ | भानुशाली वर्षा गिरीधर | २ | ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | |
| ३ | कोठारी सुमन रमेश | ३ | डिमेला बर्नड अल्बर्ट | |
| ४ | डॉ. नयना मनोज वसानी | ४ | शिल्पा भावसार | |
| ५ | सिमा कमलेश शहा | ५ | सँन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | |
| ६ | जैन गिता भरत | ६ | पाटील वंदना विकास | |
| ७ | अरोरा दिपिका पंकज | ७ | प्रभात प्रकाश पाटील | |
| ८ | रावल भगवती जयशंकर | ८ | पाटील सुनिता कैलास | |
| ९ | मेहता डिंपल विनोद | ९ | विराणी रेखा अनिल | |
| १० | मेघना दिपक रावल | १० | पुजारी कांचना शेखर | |
| ११ | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | ११ | पिसाळ मनिषा नामदेव | |
| १२ | सुजाता रविकांत शिंदे | १२ | वंदना रामदास चक्रे | |
| १३ | सिंग मदन उदितनारायण | १३ | गोविंद हेलन जॉर्जी | |
| १४ | कांगणे यशवंत ठकाजी | १४ | काझी रशीदा जमील | |
| १५ | अनिल बाबुराव भोसले | १५ | इनामदार जुबेर | |
| १६ | कासोदरीया अश्विन श्यामजी | १६ | वेतोसकर राजेश शंकर | |
| १७ | जैन दिनेश तेजराज | १७ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | |
| १८ | जैन रमेश धरमचंद | १८ | सुर्यकांत खंडोजी म्हात्रे | |
| १९ | डॉ. राजेंद्र जैन | १९ | सामंत प्रमोद जयराम | |
| २० | निलम हरिश्चंद्र ढवण | २० | रकवी सुहास माधवराव | |
| २१ | तारा विनायक घरत | २१ | खण्डेलवाल सुरेश | |
| २२ | जयमाला किशोर पाटील | २२ | वेंचर गिल्बर्ट मेन्डोंसा | |
| २३ | परमार अनिता भरत | २३ | डॉ. आसिफ शेख | |
| २४ | पाटील प्रणाली संदिप | २४ | अशोक तिवारी | |
| २५ | गावंड मंदाकिनी आत्माराम | २५ | नरेश तुकाराम पाटील | |
| २६ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | २६ | भोईर कमलेश यशवंत | |
| २७ | प्रविण मोरेश्वर पाटील | | | |
| २८ | ठाकुर अरविंद दत्ताराम | | | |
| २९ | शाह राकेश रतिशचंद्र | | | |
| ३० | केळुसकर प्रशांत नारायण | | | |
| ३१ | भोईर भावना राजू | | | |
| ३२ | भोईर राजु यशवंत | | | |
| ३३ | मुन्ना सिंग | | | |
| ३४ | ॲड. रवि व्यास | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
# मा. महासभा दि. १७/०६/२०१५

प्रकरण क्र. ४ ते २४ :-

(सदरची सभा रद्द करण्यात आली.)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.१७/०६/२०१५

ठराव क्र.०४ :-

आज दि.१७/०६/२०१५ रोजी मा. महासभा हि आपल्या मिरा भाईंदर शहराच्या माजी महापौर श्रीम. मायरा गिल्बर्ट मेंन्डोंसा यांचे दि.१४/०६/२०१५ रोजी दिर्घ आजाराने दुःखद निधन झाले आहे.

श्रीम. मायरा गिल्बर्ट मेंन्डोंसा या शहराच्या महापौर असताना सर्वांना एकत्रित घेवून समन्म विचाराने त्यांनी त्यांचा कार्यकाल व्यतित केलेला आहे. त्यांच्या निधनाने त्यांच्या कुटूंबियांवर आलेल्या संकटास ध्येर्याने सामोरे जाण्याची शक्ती त्यांच्या कुटूंबियांना द्यावी अशी ईश्वर चरणी प्रार्थना करण्यात येत आहे व श्रीम. मायरा गिल्बर्ट मेंन्डोंसा यांना भारतीय जनता पक्ष, शिवसेना, बहुजन विकास आघाडी, राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेस पक्ष व हे सभागृह भावपूर्ण श्रध्दांजली अर्पित करीत आहे आणि आजची सभा रद्द करण्यात येत आहे असा ठराव मांडत आहे.

सुचक :- श्री. रोहिदास पाटील

अनुमोदन :- श्री. शरद पाटील

ठराव सर्वानुमते मंजुर

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. ०१/०७/२०१५

**प्रकरण क्र. २५ :-** **दि. २०/०१/२०१५ रोजीच्या मा. विशेष महासभेचे इतिवृत्तांत कायम करणे.**

ठराव क्र.०५ :-

दि. २०/०१/२०१५ रोजीच्या मा. विशेष महासभेचे इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :-** **अनुमोदक :-**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. ०१/०७/२०१५

**प्रकरण क्र. २६ :-** **स्थायी समितीच्या एका सदस्याने राजीनामा दिल्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम २३ अन्वये एक (१) सदस्याची नेमणूक करणे.**
**राजीनामा दिलेल्या सदस्याचे नांव :- १) श्रीम. वंदना मंगेश पाटील. (राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी)**

**ठराव क्र.०६ :-**

सन्मा. सदस्या श्रीम. वंदना मंगेश पाटील यांनी स्थायी समिती सदस्य पदाचा राजीनामा दिल्यामुळे स्थायी समितीवर रिक्त झालेल्या एका जागेवर नेमणूक करावयाची आहे. परंतु भारतीय जनता पक्षाच्या नव्याने निवडून आलेल्या श्रीम. दिप्ती शेखर भट यांची मा. विभागीय आयुक्तांकडे नोंदणी केली असून त्या नोंदणीची माहिती महानगरपालिकेस उपलब्ध झालेनंतर हा विषय घेण्यात यावा असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :-** श्री. रोहिदास पाटिल

**अनुमोदक :-** श्री. प्रशांत केळुसकर

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. ०१/०७/२०१५

**प्रकरण क्र. २७ :-** **वृक्ष प्राधिकरण समितीच्या एका सदस्याने राजीनामा दिल्यामुळे वृक्ष प्राधिकरण समितीवर एक (१) सदस्याची नेमणूक करणे. राजीनामा दिलेल्या सदस्याचे नांव :- १) डॉ. आसिफ शेख. (राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी)**

**ठराव क्र.०७ :-**

सन्मा. सदस्य डॉ. आसिफ गुलाब शेख यांनी वृक्ष प्राधिकरण समिती सदस्य पदाचा राजीनामा दिल्यामुळे वृक्ष प्राधिकरण समितीवर रिक्त झालेल्या एका जागेवर नेमणूक करावयाची आहे. परंतु भारतीय जनता पक्षाच्या नव्याने निवडून आलेल्या श्रीम. दिप्ती शेखर भट यांची मा. विभागीय आयुक्तांकडे नोंदणी केली असून त्या नोंदणीची माहिती महानगरपालिकेस उपलब्ध झालेनंतर हा विषय घेण्यात यावा असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :-** प्रि. रोहिदास पाटील

**अनुमोदक :-** श्री. प्रशांत केळुसकर

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

# मा. महासभा दि. ०१/०७/२०१५

**प्रकरण क्र. २८ :-** **मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत आयोजित करावयाचे भुमीपुजन, उद्घाटन कार्यक्रमासाठी धोरण निश्चित करणेबाबत.**

**ठराव क्र. :-** ८

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध विकासांची कामे सुरु करणे, भुमिपुजन करणे, उद्घाटन करणे हे महानगरपालिकेच्या दृष्टीने नागरीकांना सोयीसुविधा उपलब्ध करण्याच्या कर्तव्य असून सदर कार्यक्रमांच्या वेळी मा. खासदार, मा आमदार, मा. पदाधिकारी, सन्मा. नगरसेवक व इतर सन्मा. व्यक्ती यांचे नावाची पाटी लावणे, कार्यक्रमास सर्वांना निमंत्रित करणे इत्यादी महात्वाच्या बाबी असून सदरबाबत सभेत निर्णय घेण्याअगोदर मा. महापौर, मा. उपमहापौर, मा. पदाधिकारी व मा. गटनेते यांचेशी विचार विनिमय करुन निर्णय घेणे आवश्यक आहे. सबब सदरचा विषय वरील संबंधितांशी विचार विनियम करुन घेतल्यानंतर पुनःश्च मंजूरीसाठी सभागृहापुढे ठेवावा असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. नरेंद्र मेहता** **अनुमोदक :- श्री. प्रशांत केळुसकर**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | मेहता नरेंद्र लालचंद | १ | सय्यद नुरजहाँ नझर हुसेन | |
| २ | शरद केशव पाटील | २ | डिमेलो बर्नड अल्बर्ट | |
| ३ | पाटील रोहिदास शंकर | ३ | ग्रिटा स्टिफन फॅरो | |
| ४ | म्हात्रे कल्पना महेश | ४ | अन्सेला मेन्डोंसा परेरा | |
| ५ | भानुशाली वर्षा गिरीधर | ५ | शिल्पा भावसार | |
| ६ | मीरादेवी रामलाल यादव | ६ | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | |
| ७ | कोठारी सुमन रमेश | ७ | रॉड्रीक्स बाबरा डॉनल्ड | |
| ८ | डॉ. नयना मनोज वसाणी | ८ | दक्षता राजेंद्र ठाकूर | |
| ९ | सिमा कमलेश शहा | ९ | पाटील वंदना विकास | |
| १० | जैन गिता भरत | १० | शबनम लियाकत शेख | |
| ११ | अरोरा दिपिका पंकज | ११ | प्रभात प्रकाश पाटील | |
| १२ | रावल भगवती जयशंकर | १२ | झिनत रऊफ कुरेशी | निरंक |
| १३ | मेहता डिंपल विनोद | १३ | विराणी रेखा अनिल | |
| १४ | मेघना दिपक रावल | १४ | पुजारी कांचना शेखर | |
| १५ | शर्मा सुनिला सत्येंद्र | १५ | पिसाळ मनिषा नामदेव | |
| १६ | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | १६ | डिसा मर्लिन मर्विन | |
| १७ | पाटील प्रेमनाथ गजानन | १७ | वंदना रामदास चक्रे | |
| १८ | सिंग मदन उदितनारायण | १८ | अनिता जयवंत पाटील | |
| १९ | कांगणे यशवंत ठकाजी | १९ | गोविंद हेलन जॉर्जी | |
| २० | अनिल बाबुराव भोसले | २० | काझी रशीदा जमील | |
| २१ | कासोदरीया अश्विन श्यामजी | २१ | बगाजी शर्मिला विल्सन | |
| २२ | जैन दिनेश तेजराज | २२ | इनामदार जुबेर | |
| २३ | जैन रमेश धरमचंद | २३ | वेतोसकर राजेश शंकर | |
| २४ | डॉ. राजेंद्र जैन | २४ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | |
| २५ | निलम हरिश्चंद्र ढवण | २५ | सुर्यकांत खंडोजी म्हात्रे | |
| २६ | तारा विनायक घरत | २६ | सामंत प्रमोद जयराम | |

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## पाणी पुरवठा विभाग

### मा. महासभा दि.०९ /०७/२०१५.

## ।। ठराव ।।

**प्रकरण क्र (२९) :-** पाणी पुरवठा विभागाच्या वितरण व्यवस्था व देखभाल/दुरुस्तीसाठी मेकॅनिकल जॉईंट व फिटींग्ज पुरवठा करणे, पाईप पुरवठा करणे तसेच टॅंकर द्वारे पाणी पुरवठा करणे कामास मान्यता मिळणेबाबत (पाणी पुरवठा विभाग)

**ठराव क्र. (०९)**

महानगरपालिकेचा पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेत मोडतो. मिरा-भाईंदर महानगरपालिकेतर्फे दैनंदिन पाणी पुरवठ्याचे वितरण हाताळले जाते. सदर आवश्यक कामी जॉईंटस् व फिटींग्ज साहित्याचा पाणी पुरवठा विभागामार्फत उपलब्ध करुन महानगरपालिका कर्मचाऱ्यामार्फत करुन घेतली जातात. या जलवाहिन्यांची देखभाल / दुरुस्ती नित्याने करावी लागते. पाणी गळती सारखे प्रकार वारंवार घडत असतात अशावेळी दुरुस्ती करीता जलवाहिनीस जोडण्यात आलेल्या साहित्याची गरज भासते. पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेत मोडत असल्याने वरील सर्व साहित्य भांडारात असणे आवश्यक असते. अन्यथा साहित्य वेळीच उपलब्ध न झाल्यास पाणी पुरवठा वेळीच पुर्ववत करणे शक्य होत नाही. सद्यस्थितीत जलवाहिनी वितरण व्यवस्था व देखभाल दुरुस्तीसाठी जॉईंटस्, फिटींग्ज व पाईप मागविणे अत्यावश्यक आहे.

तसेच महानगरपालिकेद्वारे मनपा हद्दीतील नागरीकांना आवश्यकतेनुसार टॅंकरद्वारे पाणी पुरवठा करण्याचे मनपाचे धोरण आहे. सदर टॅंकर पाणी पुरवठा हा जलवाहिनी नसलेल्या इमारतींना तसेच जलवाहिन्यांच्या अंतिम टप्प्यातील कमी दाबाने पाणी पुरवठा होणाऱ्या इमारतींना व खाजगी कार्यक्रमांना मागणी केल्यास मनपामार्फत रु.७००/- प्रति फेरा इतके दर आकारुन पुरविण्यात येतात. या व्यतिरिक्त आदिवासी पाडे, धार्मिक कार्यक्रम व दुषित पाणी पुरवठा होणाऱ्या इमारती, तसेच मनपाचे कार्यालये यांना मोफत पाणी पुरवठा करणे महानगरपालिकेचे दायित्व आहे. सदर योजना **ना नफा ना तोटा** या तत्वावर राबविली जाते. उपरोक्त टॅंकर मनपा भाडे तत्वावर घेऊन पाणी पुरवठा केला जातो.

सदर कामांच्या वार्षिक निविदा मागवून काम करुन घेतले जाते. सदर कामांचा कामांचा खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १ | पाणी पुरवठा विभागाच्या वितरण व्यवस्था व देखभाल/दुरुस्तीसाठी मेकॅनिकल जॉईंट व फिटींग्ज पुरवठा करणे | रु.१,००,००,०००/- |
| २ | पाणी पुरवठा विभागाच्या वितरण व्यवस्था व देखभाल/दुरुस्तीसाठी सी.आय. पाईप मागविणे. | रु.१,००,००,०००/- |
| ३. | महानगरपालिकेद्वारे पाणी पुरवठा करणाऱ्या खाजगी टॅंकरच्या प्रति फेरा दर निश्चित करुन पाणी पुरवठा करणे | रु.३,००,००,०००/- |

वरील कामे पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेअंतर्गत येणारी महत्वाची व अत्यावश्यक कामे आहेत. तसेच पाणी पुरवठा योजनेमधील सुरु असलेल्या खालील कामांस सुधारीत प्रशासकीय मंजूरी देत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | मुळ प्रशासकिय मान्यता | सुधारित प्रशासकिय मान्यता |
|---|---|---|---|
| १ | मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील ५० द.ल.लि. योजने अंतर्गत On line Booster पंप बसविण्याच्या कामास मान्यता मिळणेबाबत. | ४७०.०३ लक्ष | ५६५.४५ लक्ष (रु.५,६५,४४,८९१/-) |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | साकेत संकुल, ठाणे येथे मिरा भाईदर महानगरपालिकेकरिता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या जलवाहिनीवरुन पाणी घेणकरिता पंपगृहात ४२५ एच.पी. क्षमतेचा व्हि.एफ.डी. प्रणालीवर आधारीत इनलाईन बुस्टर पंपाचा पुरवठा करणे, बसविणे, कार्यान्वित करणे. | २६६.०५ लक्ष (रु.२,६६,०४,६००/-) | ३२७.०३ लक्ष (रु.३,२७,०३,४१९/-) |

तरी सदर कामे अत्यावश्यक असल्याने आर्थिक व प्रशासकीय मान्यता हि सभा देत आहे.

सुचक :- श्री. अनिल भोसले

अनुमोदन :- श्री. नरेंद्र मेहता

ठराव सर्वानुमते मंजुर
ठराव वाचून कायम करण्यात आला

महापौर
महासभा
मिरा भाईदर महानगरपालिका

# मिरा-भाईदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.०१/०७/२०१५

## ।। ठराव ।।

**प्रकरण क्र. ( ३० ):- मिरा भाईदर अग्निशमन दलाकरीता ६२ मी. उंच टी. टी. एल. लॅडर प्लॅटफॉर्म खरेदी करणेबाबत.**

**ठराव क्र ( ७० ) :-**

मिरा भाईदर महानगरपालिकेचे अग्निशमन दल हि अत्यावश्यक सेवा असून २४ तास कार्यरत असते. आपत्कालीन समयी नागरीकांना सेवा पुरविणेकरीता अग्निशमन दल नेहमी अद्ययावत साधन सामग्री व अद्ययावत वाहने यांनी सुसज्ज असणे गरजेचे आहे. सध्या अग्निशमन विभागाकडे केवळ ३९ मीटर उंचीची लॅडर उपलब्ध आहे.

मा. संचालक सो, महाराष्ट्र अग्निशमन सेवा यांच्याकडील क्र. मअसे/३२ एफ/२०१३/६६१ दि. १४/०५/२०१३ रोजीच्या मंजूरी पत्रान्वये मिरा भाईंदर शहरात ७० मी. उंची पर्यतच्या इमारतींना परवानगी देण्यात येत आहे. त्यामुळे भविष्यात मिरा भाईंदर अग्निशमन विभागाकडे कमाल उंचीची लॅडर असणे आवश्यक आहे. मा. संचालक सो., यांनी त्यांचे उक्त नमुद पत्रात नमुद केल्यानुसार मिरा भाईदर शहराची लोकसंख्या विचारात घेता मिरा भाईदर अग्निशमन विभागाकरिता उपलब्ध टी. टी. एल वाहन वगळून १ टी. टी. एल व १ एरियल लॅडर प्लॅटफॉर्म खरेदी करणे आवश्यक असलेबाबत सुचविले आहे. अग्निशमन विभागाने काही इमारतींना ७० मी. उंचीपर्यत तात्पुरता ना हरकत दाखला प्रदान केला आहे. लवकरच या इमारतींचे बांधकाम पुर्ण करून अंतिम ना हरकत दाखला प्राप्त करणेकरीता अग्निशमन विभागास प्रस्ताव प्राप्त होतील. त्यामुळे सदर इमारतींना अंतिम नाहरकत दाखला व भोगवटा ना हरकत दाखला देणे पुर्वी तसेच भविष्यात सदर इमारतीतील नागरीकांना आपत्कालीन प्रसंगी अग्निशमन सेवा पुरविणेकरीता तुर्तास ३९ मी. उंची पेक्षा अधिक उंचीची १ लॅडर खरेदी करणे आवश्यक आहे. सदर वाहनाची खरेदी प्रक्रिया पूर्ण होवून वाहन अग्निशमन दलास प्राप्त होईपर्यत किमांन १८ ते २४ महिने इतका कालावधी अपेक्षित आहे. याकारणास्तव सदर वाहन खरेदी प्रक्रिया सुरू करणे आवश्यक आहे.

अग्निशमन विभागाकरीता ६२ मी. उंच टी. टी. एल. वाहन खरेदी करणेकरीता अंदाजे रु. १० ते १२ कोटी इतका खर्च अपेक्षित आहे. त्या अनुषंगाने सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात **"नवीन फायर फायटर खरेदी"** या लेखाशिर्षाअंतर्गत रु. १२.०० कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे. चालु आर्थिक वर्षात सदर तरतूदीतून कोणताही खर्च करण्यात आलेला नाही.

तरी अग्निशमन विभागाकरीता ६२ मी. उंच टी. टी. एल. वाहन खरेदी करणेकामी येणाऱ्या खर्चास हि मा. महासभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे. तसेच मिरा भाईदर महानगरपालिकेचे विकास नियंत्रण नियमावली (D.C. Rule) मधील अटीशर्तीच्या अधीन राहून व ४५ मीटर पेक्षा अधिक परंतु ७० मीटर अधिक नाही अशा इमारतीस प्रती चौ. मीटर रु.१५०/- या दराने ७० मीटर उंचीपर्यंत अग्निशमन विभागाचा नाहरकत दाखला देण्यास व यापूर्वी दाखला दिला असेल तर फरकाची रक्कम वसूल करणेस हि मा. महासभा मंजुरी देत आहे.

**सुचक :-** श्री. प्रशांत केळुसकर

**अनुमोदक:-** Ashwin S. Kasodariya — श्री. अश्विन कासोदरिया

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
# मा. महासभा दि. ०१/०७/२०१५

**प्रकरण क्र. ३२ :-** **भारतरत्न श्री. अटल बिहारी वाजपेयी "आदर्श वॉर्ड योजना" राबविणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.**

**ठराव क्र.** :- ११

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सन २०१५-१६ या वर्षाच्या "आदर्श वार्ड योजना" करीता रु.१०.०० कोटी एवढी तरतूद करण्यात आली आहे. सदर योजनेतंर्गत मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वार्डची निवड करून सदर वार्डातील सर्व मूलभूत सोयी सुविधा तसेच विकास कामे पूर्ण करून सदर आदर्श वॉर्ड तयार करावयाचा आहे. सदर काम करण्यासाठी वार्डाची निवड करून अनुभवी सल्लागार नेमून त्यांच्यामार्फत सदर वॉर्डातील करावयाच्या कामांबाबत सविस्तर प्रकल्प अहवाल तयार केल्यास सदर वार्ड हा चांगल्या प्रकारे विकसित करून घेता येईल.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र. ३६ (भागशः) ३७ (पूर्ण) व ३८ (भागशः) व प्रभाग क्र. १२ (भागशः) मध्ये भारतरत्न श्री. अटल बिहारी वाजपेयी "आदर्श वार्ड योजना" राबविणेस व सदर कामासाठी अनुभवी तांत्रिक सल्लागार नेमण्यास ही सभा मान्यता देत आहे. प्रभाग क्र. ३६ (भागशः) ३७ (पूर्ण) व ३८ (भागशः) मध्ये रु.७.०० कोटी व प्रभाग क्र. १२ (भागशः) मध्ये रु.३.०० कोटी रक्कमेची कामे करण्यासाठी खर्चास ही सभा प्रशासकीय व आर्थिक मान्यता देत आहे. सदर वॉर्ड आदर्श वॉर्ड तयार करण्यासाठी सदर प्रभागातील खालील कामांचा प्रकल्पात समावेश करण्यात यावा.

झाडे लावणे, फुटपाथ, टाईल्स, काँक्रीट रस्ते, डांबरी रस्ते तयार करणे, प्रभागातील दुकानांची छपरे काढणे, फेरीवाले ना फेरीवाला क्षेत्र निश्चित करणे, डी.पी. प्रमाणे रस्ते रुंदीकरण करणे, किती फेरीवाले कुठे बसवावे याबाबतचे नियोजन करणे, मार्केट, उद्यान, मैदान, बस स्टॉप, शौचालये, स्टॉल, गटारे बांधणे, रस्त्यांवरील सर्व युटीलिटी स्थलांतरीत करणे, सार्वजनिक ठिकाणी कचरा डब्बे बसविणे, अतिक्रमण हटविणे, पार्कींग नो पार्कींग क्षेत्र ठरविणे, गतिरोध, नामफलक, दिशा दर्शक फलक, स्टॉल डिझाईन करणे, होर्डींग्ज, सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविणे, स्वच्छता चौकी, तक्रार निवारण कक्ष तयार करणे, विना परवाना दुकान बंद करणे, सर्व दुकानदारांनी परवानगी घेणे, फायर हायड्रंट सिस्टीम बसविणे, सिव्हरेज जोडणी, रेन वॉटर हार्वेस्टींग करणे व इतर कामे करणे या आदर्श प्रभागात १००% काम पूर्ण करण्यात यावीत. आदर्श वार्ड म्हणून कामे करावयाच्या वार्ड मधील रस्त्यात बाधित अनधिकृत बांधकामे व अतिक्रमण हटविल्यानंतरच आदर्श वॉर्ड तयार करण्याची प्रक्रीया सुरू करण्यात यावी. तसेच ७.०० कोटी रक्कम शासनाच्या आमदार विशेष निधी अंतर्गत उपलब्ध होणार असून सदर निधी प्रभाग क्र. ३६ (भागशः) ३७ (पूर्ण) व ३८ (भागशः) आदर्श वॉर्ड तयार करण्यासाठी खर्च करण्यात यावी. निधी कमी पडल्यास महानगरपालिका निधीचा वापर करून सदर वॉर्ड आदर्श वॉर्ड तयार करण्यात यावा.

**सुचक :- श्री. रोहिदास पाटील** **अनुमोदक :- डॉ. नयना वसाणी**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | मेहता नरेंद्र लालचंद | १ | सय्यद नुरजहाँ नझर हुसेन | निरंक |
| २ | शरद केशव पाटील | २ | डिमेलो बर्नड अल्बर्ट | |
| ३ | पाटील रोहिदास शंकर | ३ | ग्रिटा स्टिफन फॅरो | |

# मिरा भाईंदर महानगरपालिका
# मा. महासभा दि. ०१/०७/२०१५

**प्रकरण क्र. ३३ :-** **महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० अन्वये विशेष समित्या गठित करणे व सदस्य संख्या निश्चित करणेबाबत विचारविनिमय करुन निर्णय घेणे.**

**ठराव क्र.** ७२ **:-**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ नियम ३०(१) अन्वये विशेष समित्या स्थापन करण्याचे अधिकार महासभेला दिले आहेत. तसेच विशेष समित्यांची रचना करणे बाबतही अधिकार दिले आहेत. प्रकरण क्र. ३३ नुसार (१) मा. क्रिडा व समाजकल्याण समिती (२) मा. लोक लेखा समिती (३) मा. विधी समिती (४) मा. गलीच्छ वस्ती निर्मुलन समिती (५) मा. आरोग्य परिरक्षण समिती (६) मा. नियोजन समिती (७) पूर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण समिती ह्या सात समित्या गठीत करावयाच्या आहेत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३०(१) अन्वये वरील प्रमाणे विशेष समित्या गठित करण्यास व प्रत्येक समितीवर नगरसेवकांमधून एकूण ११ सदस्यांची गठित करण्यास ही सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. रोहिदास पाटील** **अनुमोदक :- श्री. प्रशांत केळुसकर**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | मेहता नरेंद्र लालचंद | १ | सय्यद नुरजहाँ नझर हुसेन | |
| २ | शरद केशव पाटील | २ | डिमेलो बर्नड अल्बर्ट | |
| ३ | पाटील रोहिदास शंकर | ३ | ग्रिटा स्टिफन फॅरो | |
| ४ | म्हात्रे कल्पना महेश | ४ | अन्सेला मेन्डोंसा परेरा | |
| ५ | भानुशाली वर्षा गिरीधर | ५ | शिल्पा भावसार | |
| ६ | मीरादेवी रामलाल यादव | ६ | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | |
| ७ | कोठारी सुमन रमेश | ७ | रॉड्रीक्स बाबरा डॉनल्ड | |
| ८ | सिमा कमलेश शहा | ८ | दक्षता राजेंद्र ठाकूर | |
| ९ | जैन गिता भरत | ९ | पाटील वंदना विकास | |
| १० | अरोरा दिपिका पंकज | १० | शबनम लियाकत शेख | |
| ११ | रावल भगवती जयशंकर | ११ | प्रभात प्रकाश पाटील | निरंक |
| १२ | मेहता डिंपल विनोद | १२ | झिनत रऊफ कुरेशी | |
| १३ | मेघना दिपक रावल | १३ | विराणी रेखा अनिल | |
| १४ | शर्मा सुनिला सत्येंद्र | १४ | पुजारी कांचना शेखर | |
| १५ | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | १५ | पिसाळ मनिषा नामदेव | |
| १६ | पाटील प्रेमनाथ गजानन | १६ | डिसा मर्लिन मर्विन | |
| १७ | सिंग मदन उदितनारायण | १७ | वंदना रामदास चक्रे | |
| १८ | कांगणे यशवंत ठकाजी | १८ | अनिता जयवंत पाटील | |
| १९ | अनिल बाबुराव भोसले | १९ | गोविंद हेलन जॉर्जी | |
| २० | कासोदरीया अश्विन श्यामजी | २० | काझी रशीदा जमील | |
| २१ | जैन दिनेश तेजराज | २१ | बगाजी शर्मिला विल्सन | |
| २२ | जैन रमेश धरमचंद | २२ | इनामदार जुबेर | |
| २३ | डॉ. राजेंद्र जैन | २३ | वेतोसकर राजेश शंकर | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २४ | निलम हरिश्चंद्र ढवण | २४ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | |
| २५ | तारा विनायक घरत | २५ | सुर्यकांत खंडोजी म्हात्रे | |
| २६ | शुभांगी महिन कोटियन | २६ | सामंत प्रमोद जयराम | |
| २७ | जयमाला किशोर पाटील | ३७ | रकवी सुहास माधवराव | |
| २८ | परमार अनिता भरत | २८ | पांडे हंसुकुमार कमलकुमार | |
| २९ | गावंड मंदाकिणी आत्माराम | २९ | खण्डेलवाल सुरेश | |
| ३० | म्हात्रे प्रभाकर प्रद्माकर | ३० | वेंचर गिल्बर्ट मेंन्डोसा | |
| ३१ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | ३१ | डॉ. आसिफ शेख | |
| ३२ | हरिश्चंद्र रामचंद्र आमगावकर | ३२ | नरेश तुकाराम पाटील | |
| ३३ | प्रविण मोरेश्वर पाटील | ३३ | भोईर कमलेश यशवंत | |
| ३४ | ठाकुर अरविंद दत्ताराम | ३४ | रविंद्र भिमदेव माळी | |
| ३५ | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | ३५ | वंदना मंगेश पाटील | |
| ३६ | केळुसकर प्रशांत नारायण | ३६ | अशोक तिवारी | |
| ३७ | भोईर भावना राजू | | | |
| ३८ | जाधव मोहन महादेव | | | |
| ३९ | मुन्ना सिंग | | | |
| ४० | ॲड. रवि व्यास | | | |
| ४१ | दिप्ती शेखर भट | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
# मा. महासभा दि. ०१/०७/२०१५

**प्रकरण क्र. ३४ :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ८२ नुसार नगरपालिका निधी स्थापन करण्यास दि. ०२/०३/२०१५ च्या मा. महासभेतील ठरावात अंशतः बदल करण्यास परवानगी मिळणेबाबत.**

**ठराव क्र.93 :-**

मा. उच्च न्यायालयाच्या दि. २८/०३/२०१४ च्या आदेशानुसार भारतरत्न पंडीत भिमसेन जोशी रूग्णालय (टेंबा रुग्णालय) हे टप्याटप्याने कार्यरत करावयाचे आहे. त्या अनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ८२ नुसार कायमस्वरुपी नगरपालिका निधी स्थापन करण्यास व त्यामध्ये अशासकीय संस्था, सामाजिक संस्था, धर्मादाय संस्था, लोकप्रतिनिधी, खाजगी विकासक किंवा अनिवासी भारतीय यांच्याकडून पैसा, वस्तू, साहित्य, इ. तसेच बांधकाम स्वरुपात व परकीय चलनात मिळणारी मदत, देणगी, भेट, इ. स्विकारण्यास मा. महासभेने ठराव क्र. ५५, दि. ०२/०३/२०१५ (दि. १५-०१-२०१५ रोजीची निलंबीत सभा) अन्वये मान्यता दिलेली आहे. सदर ठरावावर दोन सुचना आल्या असून पहिल्या सुचनेमध्ये देणगी किती व कशाप्रकारे स्विकारावी या विषयी सुचना केलेल्या आहेत. दुसऱ्या सुचनेमध्ये निधी स्विकारल्या विषयीचे धोरण मा. स्थायी समिती सभेमध्ये निर्णय घेवून मंजूर करावे, असे म्हटले आहे. ठराव दोन्ही सुचनासह मान्य झाला आहे. मात्र धोरणात्मक निर्णय घेणे हा मा. महासभेचा अधिकार असल्याने दुसरी सुचना रद्द करून निधी स्विकारण्या विषयी धोरण मा. महासभेने मंजूर करणे आवश्यक आहे. सबब मा. महासभा ठराव क्र. ५५, दि. ०२/०३/२०१५ च्या अनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ८२ अन्वये स्थापन करावयाच्या नगरपालिका निधीमध्ये पैसे, वस्तु इ. विविध स्वरूपात मदत स्विकारण्याविषयी खालीलप्रमाणे धोरण प्रस्तावित करण्यात येत आहे.

- रु. ५ लाख किंवा त्याहून अधिक रक्कमेची देणगी देणाऱ्यांची नावे रुग्णालयाच्या दर्शनी भागात फलकावर प्रदर्शित करण्यात येतील.
- रु. ५ लाख किंवा त्याहून अधिक रक्कमेची मशीन्स देणगी रुपात देणाऱ्यांची नावे रुग्णालयाच्या दर्शनी भागात फलकावर प्रदर्शित करण्यात येतील.
- एखादा कक्ष किंवा विभाग उभारणीचा संपूर्ण खर्च देणगीदार करत असल्यास त्याचे नाव संबंधित कक्षाला देण्यात येईल.
- रुग्णवाहिका किंवा शववाहिनी देणगी रुपात दिल्यास सदर वाहनावर देणगी देणाऱ्या व्यक्तीचे / संस्थेचे नाव प्रदर्शित करण्यात येईल.
- या व्यतिरिक्त रुग्णालयासाठी लागणारे इतर सामान, वस्तू, साहित्य, इ. देणगी रुपात देऊ इच्छिणाऱ्यांकडून पैशांच्या स्वरुपात देणगी स्वीकारुन महानगरपालिकेतर्फे सदर वस्तू, साहित्य आवश्यकतेनुसार खरेदी करण्यात येईल. तसेच सदर देणगीदारांचे नाव नोंदवहीत नमूद केले जाईल व त्यास तसे आभारपत्र देखिल देण्यात यावे.
- *एखादया देणगीदारास देणगी दिल्यानंतर स्वतःचे नाव बोर्डवर किंवा देणगी दिलेल्या वाहनांवर* लिहिण्याची इच्छा नसल्यास संबंधित देणगीदाराचे नाव लिहिले जाणार नाही.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ८२ अन्वये स्थापित नगरपालिका निधीमध्ये देणगी स्विकारण्यासाठी उपरोक्तप्रमाणे धोरण स्विकारण्यास ही महासभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्रीम. निलम ढवण** **अनुमोदक :- श्रीम. तारा घरत**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | मेहता नरेंद्र लालचंद | १ | सय्यद नुरजहाँ नझर हुसेन | निरंक |
| २ | शरद केशव पाटील | २ | डिमेलो बर्नड अल्बर्ट | |
| ३ | पाटील रोहिदास शंकर | ३ | ग्रिटा स्टिफन फॅरो | |
| ४ | म्हात्रे कल्पना महेश | ४ | शिल्पा भावसार | |
| ५ | भानुशाली वर्षा गिरीधर | ५ | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | |
| ६ | मीरादेवी रामलाल यादव | ६ | रॉड्रीक्स बाबरा डॉनल्ड | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७ | कोठारी सुमन रमेश | ७ | दक्षता राजेंद्र ठाकूर | |
| ८ | सिमा कमलेश शहा | ८ | पाटील वंदना विकास | |
| ९ | जैन गिता भरत | ९ | शबनम लियाकत शेख | |
| १० | अरोरा दिपिका पंकज | १० | प्रभात प्रकाश पाटील | |
| ११ | रावल भगवती जयशंकर | ११ | झिनत रऊफ कुरेशी | |
| १२ | मेहता डिंपल विनोद | १२ | विराणी रेखा अनिल | |
| १३ | मेघना दिपक रावल | १३ | पुजारी कांचना शेखर | |
| १४ | शर्मा सुनिला सत्येंद्र | १४ | पिसाळ मनिषा नामदेव | |
| १५ | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | १५ | डिसा मर्लिन मर्विन | |
| १६ | पाटील प्रेमनाथ गजानन | १६ | वंदना रामदास चक्रे | |
| १७ | सिंग मदन उदितनारायण | १७ | अनिता जयवंत पाटील | |
| १८ | कांगणे यशवंत ठकाजी | १८ | गोविंद हेलन जॉर्जी | |
| १९ | अनिल बाबुराव भोसले | १९ | काझी रशीदा जमील | |
| २० | कासोदरीया अश्विन श्यामजी | २० | बगाजी शर्मिला विल्सन | |
| २१ | जैन दिनेश तेजराज | २१ | इनामदार जुबेर | |
| २२ | जैन रमेश धरमचंद | २२ | वेतोसकर राजेश शंकर | |
| २३ | डॉ. राजेंद्र जैन | २३ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | |
| २४ | निलम हरिश्चंद्र ढवण | २४ | सुर्यकांत खंडोजी म्हात्रे | |
| २५ | तारा विनायक घरत | २५ | सामंत प्रमोद जयराम | |
| २६ | शुभांगी महिन कोटियन | २६ | रकवी सुहास माधवराव | |
| २७ | जयमाला किशोर पाटील | ३७ | पांडे हंसुकुमार कमलकुमार | |
| २८ | परमार अनिता भरत | २८ | खण्डेलवाल सुरेश | |
| २९ | गावंड मंदाकिणी आत्माराम | २९ | वेंचर गिल्बर्ट मेन्डोंसा | |
| ३० | संध्या प्रफुल्ल पाटील | ३० | डॉ. आसिफ शेख | |
| ३१ | म्हात्रे प्रभाकर प्रद्माकर | ३१ | नरेश तुकाराम पाटील | |
| ३२ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | ३२ | भोईर कमलेश यशवंत | |
| ३३ | हरिश्चंद्र रामचंद्र आमगावकर | ३३ | रविंद्र भिमदेव माळी | |
| ३४ | प्रविण मोरेश्वर पाटील | ३४ | वंदना मंगेश पाटील | |
| ३५ | ठाकुर अरविंद११दत्ताराम | ३५ | अशोक तिवारी | |
| ३६ | शाह राकेश रतिशचंद्र | | | |
| ३७ | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | | | |
| ३८ | केळुसकर प्रशांत नारायण | | | |
| ३९ | भोईर भावना राजू | | | |
| ४० | जाधव मोहन महादेव | | | |
| ४१ | मुन्ना सिंग | | | |
| ४२ | ॲड. रवि व्यास | | | |
| ४३ | दिप्ती शेखर भट | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
# मा. महासभा दि. ०१/०७/२०१५

**प्रकरण क्र. ३५ :- मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत बांधण्यात आलेल्या क्रिडा संकुल इमारतीचा वापर सुरु करण्यासाठी धोरण निश्चित करणेबाबत.**

**ठराव क्र.१४ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत बांधण्यात आलेल्या क्रिडा संकुल इमारतीचा वापर सुरु करण्यासाठी धोरण निश्चित करणेबाबत दि. १५/१/२०१५ रोजीच्या मा. महासभेपुढे ठेवण्यात आला होता. तथापि मा.महासभेने सदर कामी सविस्तर माहिती सादर करणेबाबत ठराव क्र. ६१ अन्वये निर्णय घेतला आहे.

यापुर्वी सादर केलेले धोरण स्वयंस्पष्ट असल्याने खालीलप्रमाणे क्रिडा धोरण पुनश्चः सादर करण्यात येत आहे.

१) मिरा भाईंदर महानगरपालिकेने भाईंदर (पूर्व) मौजे गोडदेव येथे मंजूर विकास योजनेतील आरक्षण क्र. ११९ मैदाने या आरक्षणाच्या १५% जागेत सदर क्रिडा संकुल बांधलेले आहे. त्याकरीता एकुण १५.५० कोटी खर्च होणार आहे.

२) सदर क्रिडा संकुलाचे एकूण क्षेत्र १७६७.९८ चौ.मीटर एवढे असून तळ + एक मजल्याची इमारत बांधलेली असून त्यामध्ये खालील सुविधा निर्माण करण्यात आल्या आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. जिम्नॅशियम | - | १ |
| २. स्क्वॉश कोर्ट | - | १ |
| ३. बॅडमिंटन कोर्ट | - | २ |
| ४. कॅरम, चेस, बिलीयर्ड रूम | - | १ |
| ५. कँटींन | - | १ |
| ६. तरण तलाव | - | १ |

त्याच बरोबर इमारतीच्या पाठीमागे तरण तलावा शेजारी मोकळा भुखंड उपलब्ध होणार आहे. त्यामध्ये खाजगी, सार्वजनिक समारंभ, लग्नकार्य इ. साठी वापर करता येईल.

३) सदर क्रिडा संकुलाचे संचलन करण्यासाठी इमारतीची सुरक्षा व्यवस्था, साफसफाई साठी कर्मचारी, सर्व खेळा ठिकाणी प्रशिक्षक, रिसेप्शन कर्मचारी, हिशोबनास कॅटींग चालविण्यासाठी कर्मचरी उपलब्ध करून दयावे लागतील. महानगरपालिकेकडे एवढया मोठया स्वरूपात कर्मचारी वर्ग व प्रशिक्षक उपलब्ध नाहीत.

४) सदर क्रिडा संकुलनाच्या ठिकाणी व्यायामाचे साहित्य, सर्व खेळासाठी साहित्य देखिल उपलब्ध करून दयावे लागणार असून विद्युत देयक, पाणी देयक यासाठी खर्च येणार आहे.

५) शहरातील सर्वसामान्य नागरीक व खेळाडूंना उपलब्ध खेळाच्या सुविधा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने सदर क्रिडा संकुलाचा वापर सुरू करावयाचा आहे. त्यासाठी खालीलप्रमाणे धोरण निश्चित करावे लागेल.

**उपरोक्त अनुषंगाने खालीलप्रमाणे क्रिडा धोरण तयार करण्यात ओलेले आहे.**

**<u>प्रस्तावित धोरण :-</u>**

संपुर्ण क्रिडा संकुल संचलन व चालविण्यासाठी निविदा प्रक्रिया करून अनुभवी कंत्राटदाराची नियुक्ती करणे, त्यास क्रिडा प्रकारासाठी व कॅटींन मधील आकारावयाचे दर निश्चित करून देणे, सदर कंत्राटदाराने स्वतःचे सुरक्षा रक्षक, साफसफाई कर्मचारी व सर्व खेळाचे प्रकार सुरू ठेवण्यासाठी आवश्यक साहित्य स्वतः पुरविणे, प्रशिक्षक व कर्मचारी नेमणे, कॅटींन मध्ये कर्मचारी नेमुन कॅटींन चालविणे, विद्युत बिल, पाणी बिल भरणे याचा समावेश राहिल. त्याबदल्यात सदर कंत्राटदाराने महानगरपालिकेने ठरविलेले दर वापर करणाऱ्याकडून आकारणे, मोकळी जागा फक्त क्रिडा प्रयोजनासाठी भाडयाने देणे, मनपा.ने ठरविलेली मेंबरशिप फी घेणे इत्यादींचा समावेश असेल. सदर क्रिडा संकुल चालविण्यासाठी निविदेद्वारे नियुक्ती करावयाच्या कंत्राटदाराकडून रॉयल्टी घेवून किंवा त्यांना प्रिमीयम देवून करण्यात येईल.

# क्रिडा धोरण

## १) मोकळी जागा केवळ क्रिडा प्रयोजनासाठी - दरपत्रक

| अ. क्र. | आरक्षणाचा तपशिल | दरपत्रक (रू.) |
|---|---|---|
| १ | मनपा. शाळा मधील विद्यार्थी | विनामुल्य |
| २ | खाजगी शाळा इ. १२ वी पर्यंतचे विद्यार्थी | १०००/- |
| ३ | वरिष्ठ महाविद्यालय | १०००/- |
| ४ | क्रिडा संघटना संस्था क्लब कंपनी इतर | २०००/- |
| ५ | वरिष्ठ गटातील राज्य राष्ट्रीय खेळाडू | १०००/- |

## २) जलतरण तलाव - दरपत्रक

| अ. क्र. | तपशिल | तिमाही दर रु. | सहामाही दर रु. | वार्षिक रु. |
|---|---|---|---|---|
| १ | १२ वर्षाखालील मुले/ मुली (प्रत्येकी) | १०००/- | १८००/- | ३०००/- |
| २ | १२ वर्षावरील व्यक्ती (प्रत्येकी) | १२००/- | २४००/- | ४०००/- |
| ३ | अपंग, मनपा. कर्मचारी, राष्ट्रीय/ आंतरराष्ट्रीय खेळाडू, जेष्ठ नागरीक | ३००/- | ५००/- | १०००/- |
| ४ | लॉकर फी | १०/- | | |
| ५ | प्रती गेस्ट | प्रतिदिन गेस्ट तिकिट रु. ५०/- | | |

## ३) बॅडमिंटन हॉल - दरपत्रक

| अ. क्र. | बॅडमिंटन हॉल आरक्षणाचा तपशिल | प्रतिदिन एक तास सराव शुल्क दर रु. |
|---|---|---|
| १ | मनपा. शाळा विद्यार्थी | विनामुल्य |
| २ | २, ४ एकत्रित ग्रुप नागरीकांसाठी | प्रति व्यक्ति २५/- |
| ३ | मनपा. हद्दीतील खाजगी शाळांची मुले २, ४ | |

## ४) विविध क्रिडा सुविधा - दरपत्रक

| अ. क्र. | क्रिडा सुविधा तपशिल | दर रु. |
|---|---|---|
| १ | स्क्वॅश कोर्ट, सरावासाठी प्रती तास दर (प्रत्येकी) | १००/- |
| २ | टेबल टेनिस सरावासाठी प्रती तास दर (प्रत्येकी) | २५/- |
| ३ | लॉन टेनिस सरावासाठी प्रती तास दर (प्रत्येकी) | १००/- |
| ४ | वॉली बॉल सरावासाठी प्रती तास दर (प्रत्येकी) | ५०/- |
| ५ | बास्केट बॉल सरावासाठी प्रती तास दर (प्रत्येकी) | ५०/- |
| ६ | बिलियर्ड / स्नुकर सरावासाठी प्रती तास दर (प्रत्येकी फ्रेम / गेम) | ५०/- |
| ७ | कॅरम / बुध्दीबळ | मोफत |

## ५) व्यायाम शाळा - दरपत्रक

| अ. क्र. | तपशिल | तिमाही दर रु. | सहामाही दर रु. | वार्षिक रु. |
|---|---|---|---|---|
| १ | व्यायाम शाळा | १०००/- | १८००/- | ३५००/- |

१. महापालिकेच्या कार्यक्रमाकरीता सदरहू मैदान विनामुल्य उपलब्ध करून देण्यात येईल.

२. सदरहु मैदान कोणत्याही कार्यक्रमासाठी कोणालाही उपलब्ध करून दिले जाणार नाही.

३. मैदान आरक्षण काळात विजेचा वापर करावयाचा असल्यास संबंधित विद्युत विभाग यांची पुर्व परवानगी घेऊन विद्युत मिटर रिडींग पाहून नोंद घेण्यात यावी. व आरक्षण काळात एकुण वापरलेल्या युनिट प्रमाणे विद्युत विभाग ठरवून देईल त्यानुसार विद्युत बिल भरावे लागेल. त्याकरीता अनामत रक्कम भरणे अनिवार्य राहील.

४. मिरा भाईंदर महानगरपालिका आयोजित वा पुरस्कृत कार्यक्रमांना मैदानाची आवश्यकता असल्यास दिलेले आरक्षण रद्द करण्याचा अधिकार मा. आयुक्त यांनी राखुन ठेवला आहे.

५. क्रिडा संकुल वापरण्याची वेळ सकाळी. ६.०० ते सकाळी ११.०० वा. (सर्वांसाठी), दुपारी १२ ते ३ वा. महिलांसाठी राखीव, सांय ५ ते रात्री १० वा (सर्वांसाठी) अशी राहील.

६. क्रिडा संकुलाकरिता वार्षीक सभासद फी रू. ५०००/- इतकी आकारण्यात येईल.

७. क्रिडा संकुलात प्रवेश फी रू. ५०/- प्रति दिन इतकी आकारण्यात येईल.
८. क्रिडा संकुल दर सोमवारी बंद ठेवण्यात येईल.
९. मैदान परिसरात दारु, मादक द्रव्य घेण्यास सक्त मनाई आहे. असे आढळून आल्यास योग्य ती पोलीस कारवाई संबंधितावर केली जाईल. अशा संस्था/ क्लब/ कंपनी/ खेळाडुंना भविष्यात पुन्हा मैदान सरावासाठी दिले जाणार नाही.
१०. मैदानात स्पर्धा आयोजन झाल्यानंतर मैदान स्वच्छ करून देण्याची जबाबदारी संबंधित आयोजकांवर बंधनकारक राहील. व सदर मैदान स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील.
११. मैदाना संबंधित अधिकारी, कर्मचारी यांचे सोबत खेळाडू/ संस्था/ मंडळ/कंपनी/ क्रिडा संघटना यांची वर्तणुक सहकार्याची असणे अपेक्षित आहे.
१२. स्थानिक शाळा/विद्यालयातील विद्यार्थ्यांकडे मैदानात येताना ओळखपत्र असणे बंधनकारक राहील. संबंधित प्राधिकृत ओळखत्रा शिवाय मैदानात प्रवेश देण्यात येणार नाही.
१३. शासकिय, निमशासकीय स्पर्धांकरीता मैदान आरक्षणास प्रथम प्राधान्य देण्यात येईल.
१४. मैदान भाड्याने देण्याचे अधिकार क्रिडा विभागाचे उप-आयुक्त यांना राहील. अपवादात्मक परिस्थितीत उप-आयुक्त यांचे अधिकार क्रिडा अधिकारी यांना असतील.
१५. पोलीस परेड, ध्वजसंचलन, अग्निशमन दल संचलन वा त्यांचा सराव यांचेसाठी मैदानाचा वापर प्रत्यक्षात कार्यक्रमाचा दिवस धरुन ०३ दिवसापेक्षा जास्त कालावधीसाठी देण्यांत येणार नाही.
१६. क्रिडा संकुलात आयोजकांस कोणत्याही प्रकारचे खाद्यपदार्थ, शितपेये क्रिडा संकुल कार्यालयाची पुर्व परवानगी घेतल्याशिवाय विकता येणार नाही. क्रिडा संकुलातील कॅन्टीग शुध्द शाकाहारी राहील. कॅन्टीग चे दर मा. स्थायी समिती ठरवेल.
१७. उपरोक्त दरपत्रकामध्ये फेरबदल करावयाचे असल्यास मा. महासभेची मंजूरी घ्यावी.
१८. क्रिडा संकुल चालविण्याकामी निविदा मागविताना ३ वर्षाकरिता मागविण्यात यावी व काम समाधानकारक असल्यास मा. आयुक्त यांच्या खात्रीनुसार प्रत्येक वर्षी मुदतवाढ देण्यात यावी. मुदतवाढ फक्त २ वर्षाकरिता राहील.
१९. सदरचे क्रिडा संकुल फक्त क्रिडेसाठी वापरण्यात यावे. इतर कोणत्याही कार्यक्रमाकरिता वापरण्यात येऊ नये.

वरीलप्रमाणे भाईंदर पुर्व मौजे गोडदेव येथील मंजुर विकास योजनेतील आरक्षण क्र. ११९ या जागेत बांधलेले क्रिडासंकूल ठेकेदारामार्फत चालविण्यास व वरील क्रिडाधोरणास ही सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्रीम. जयमाला पाटील अनुमोदक :- श्री. हरिश्चंद्र आमगावकर**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | मेहता नरेंद्र लालचंद | १ | सय्यद नुरजहाँ नझर हुसेन | |
| २ | शरद केशव पाटील | २ | डिमेलो बर्नड अल्बर्ट | |
| ३ | पाटील रोहिदास शंकर | ३ | ग्रिटा स्टिफन फॅरो | |
| ४ | म्हात्रे कल्पना महेश | ४ | शिल्पा भावसार | |
| ५ | भानुशाली वर्षा गिरीधर | ५ | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | |
| ६ | मीरादेवी रामलाल यादव | ६ | रॉड्रीक्स बाबरा डॉनल्ड | |
| ७ | कोठारी सुमन रमेश | ७ | दक्षता राजेंद्र ठाकूर | |
| ८ | सिमा कमलेश शहा | ८ | पाटील वंदना विकास | |
| ९ | जैन गिता भरत | ९ | शबनम लियाकत शेख | निरंक |
| १० | अरोरा दिपिका पंकज | १० | प्रभात प्रकाश पाटील | |
| ११ | रावल भगवती जयशंकर | ११ | झिनत रऊफ कुरेशी | |
| १२ | मेहता डिंपल विनोद | १२ | विराणी रेखा अनिल | |
| १३ | मेघना दिपक रावल | १३ | पुजारी कांचना शेखर | |
| १४ | शर्मा सुनिला सत्येंद्र | १४ | पिसाळ मनिषा नामदेव | |
| १५ | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | १५ | डिसा मर्लिन मर्विन | |
| १६ | पाटील प्रेमनाथ गजानन | १६ | वंदना रामदास चक्रे | |
| १७ | सिंग मदन उदितनारायण | १७ | अनिता जयवंत पाटील | |
| १८ | कांगणे यशवंत ठकाजी | १८ | गोविंद हेलन जॉर्जी | |
| १९ | अनिल बाबुराव भोसले | १९ | काझी रशीदा जमील | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २० | कासोदरीया अश्विन श्यामजी | २० | बगाजी शर्मिला विल्सन | |
| २१ | जैन दिनेश तेजराज | २१ | इनामदार जुबेर | |
| २२ | जैन रमेश धरमचंद | २२ | घेतोसकर राजेश शंकर | |
| २३ | डॉ. राजेंद्र जैन | २३ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | |
| २४ | निलम हरिश्चंद्र ढवण | २४ | सुर्यकांत खंडोजी म्हात्रे | |
| २५ | तारा विनायक घरत | २५ | सामंत प्रमोद जयराम | |
| २६ | शुभांगी महिन कोटियन | २६ | रकवी सुहास माधवराव | |
| २७ | जयमाला किशोर पाटील | ३७ | पांडे हंसुकुमार कमलकुमार | |
| २८ | परमार अनिता भरत | २८ | खण्डेलवाल सुरेश | |
| २९ | गावंड मंदाकिणी आत्माराम | २९ | वेंचर गिल्बर्ट मेन्डोंसा | |
| ३० | संध्या प्रफुल्ल पाटील | ३० | डॉ. आसिफ शेख | |
| ३१ | म्हात्रे प्रभाकर प्रद्माकर | ३१ | भोईर कमलेश यशवंत | |
| ३२ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | ३२ | रविंद्र भिमदेव माळी | |
| ३३ | हरिश्चंद्र रामचंद्र आमगावकर | ३३ | वंदना मंगेश पाटील | |
| ३४ | प्रविण मोरेश्वर पाटील | ३४ | अशोक तिवारी | |
| ३५ | ठाकुर अरविंद१५दत्ताराम | | | |
| ३६ | शाह राकेश रतिशचंद्र | | | |
| ३७ | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | | | |
| ३८ | केळुसकर प्रशांत नारायण | | | |
| ३९ | भोईर भावना राजू | | | |
| ४० | जाधव मोहन महादेव | | | |
| ४१ | मुन्ना सिंग | | | |
| ४२ | ॲड. रवि व्यास | | | |
| ४३ | दिप्ती शेखर भट | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

# मा. महासभा दि. ०१/०७/२०१५

**प्रकरण क्र. ३६ :-** **भाईंदर (पूर्व) चौपाटी (आरक्षण क्र.१२२-अ) विकसित करणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.**

**ठराव क्र.७५ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मंजुर विकास आराखड्यात आरक्षण क्र. १२२-अ चौपाटीसाठी राखीव आहे. सदर जागा मौजे नवघर सर्व्हे क्र. १५ (नविन) सर्व्हे क्र. २०९ (जुना) मध्ये मोडत आहे. सदर आरक्षणाचे क्षेत्र ३७.३७ हेक्टर एवढे आहे. सदर जागा शासनाची असून मा. जिल्हाधिकारी ठाणे यांनी दि.०७/१०/२०१० रोजीच्या आदेशान्वये मिरा-भाईंदर महानगरपालिकेस संरक्षणासाठी हस्तांतर केलेली आहे.

मिरा-भाईंदर महानगरपालिकेने तत्कालिन नगरपरिषद असताना १९९२ पासून सदर ठिकाणी श्रीगणेश विसर्जन साठी सोयी सुविधा पुरविलेल्या आहेत. सदर जागा सी.आर.झेड. ने बाधित होत आहे. सदर चौपाटीचे क्षेत्र विकसित करण्यासाठी एक आराखडा तयार करुन त्यानुसार विकास कामे केल्यास सदर चौपाटी सुंदर प्रकारे तयार होऊ शकेल.

तरी सदर आरक्षण क्र. १२२ अ विकसित करण्यासाठी अनुभवी तांत्रिक सल्लागार नेमण्यास व सल्लागाराकडील अहवाल, नकाशा व अंदाजपत्रकानूसार गणपती विसर्जनापूर्वी तयार करणे करिता कोळी नगर/रेल्वे धक्का येथे सदर कामासाठी तरतूदीनूसार रु. १.०० कोटी एवढ्या खर्चास ही सभा प्रशासकीय व आर्थिक मान्यता देत आहे.

**सुचक :- श्री. रोहिदास पाटील** **अनुमोदक :- श्रीम. सुमन कोठारी**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | मेहता नरेंद्र लालचंद | १ | सय्यद नुरजहाँ नझर हुसेन | निरंक |
| २ | शरद केशव पाटील | २ | डिमेलो बर्नड अल्बर्ट | |
| ३ | पाटील रोहिदास शंकर | ३ | ग्रिटा स्टिफन फॅरो | |
| ४ | म्हात्रे कल्पना महेश | ४ | शिल्पा भावसार | |
| ५ | भानुशाली वर्षा गिरीधर | ५ | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | |
| ६ | मीरादेवी रामलाल यादव | ६ | रॉड्रीक्स बाबरा डॉनल्ड | |
| ७ | कोठारी सुमन रमेश | ७ | दक्षता राजेंद्र ठाकूर | |
| ८ | सिमा कमलेश शहा | ८ | पाटील वंदना विकास | |
| ९ | जैन गिता भरत | ९ | शबनम लियाकत शेख | |
| १० | अरोरा दिपिका पंकज | १० | प्रभात प्रकाश पाटील | |
| ११ | रावल भगवती जयशंकर | ११ | झिनत रऊफ कुरेशी | |
| १२ | मेहता डिंपल विनोद | १२ | विराणी रेखा अनिल | |
| १३ | मेघना दिपक रावल | १३ | पुजारी कांचना शेखर | |
| १४ | शर्मा सुनिला सत्येंद्र | १४ | पिसाळ मनिषा नामदेव | |
| १५ | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | १५ | डिसा मर्लिन मर्विन | |
| १६ | पाटील प्रेमनाथ गजानन | १६ | वंदना रामदास चक्रे | |
| १७ | सिंग मदन उदितनारायण | १७ | अनिता जयवंत पाटील | |
| १८ | कांगणे यशवंत ठकाजी | १८ | गोविंद हेलन जॉर्जी | |
| १९ | अनिल बाबुराव भोसले | १९ | काझी रशीदा जमील | |
| २० | कासोदरीया अश्विन श्यामजी | २० | बगाजी शर्मिला विल्सन | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २१ | जैन दिनेश तेजराज | २१ | इनामदार जुबेर | |
| २२ | जैन रमेश धरमचंद | २२ | वेतोसकर राजेश शंकर | |
| २३ | डॉ. राजेंद्र जैन | २३ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | |
| २४ | निलम हरिश्चंद्र ढवण | २४ | सुर्यकांत खंडोजी म्हात्रे | |
| २५ | तारा विनायक घरत | २५ | सामंत प्रमोद जयराम | |
| २६ | शुभांगी महिन कोटियन | २६ | रकवी सुहास माधवराव | |
| २७ | जयमाला किशोर पाटील | ३७ | पांडे हंसुकुमार कमलकुमार | |
| २८ | परमार अनिता भरत | २८ | खण्डेलवाल सुरेश | |
| २९ | गावंड मंदाकिणी आत्माराम | २९ | डॉ. आसिफ शेख | |
| ३० | म्हात्रे प्रभाकर प्रद्माकर | ३० | नरेश तुकाराम पाटील | |
| ३१ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | ३१ | भोईर कमलेश यशवंत | |
| ३२ | हरिश्चंद्र रामचंद्र आमगावकर | ३२ | रविंद्र भिमदेव माळी | |
| ३३ | प्रविण मोरेश्वर पाटील | ३३ | वंदना मंगेश पाटील | |
| ३४ | ठाकुर अरविंद दत्ताराम | ३४ | अशोक तिवारी | |
| ३५ | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | | | |
| ३६ | केळुसकर प्रशांत नारायण | | | |
| ३७ | भोईर भावना राजू | | | |
| ३८ | जाधव मोहन महादेव | | | |
| ३९ | मुन्ना सिंग | | | |
| ४० | ॲड. रवि व्यास | | | |
| ४१ | दिप्ती शेखर भट | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

# मा. महासभा दि. ०१/०७/२०१५

**प्रकरण क्र. ३७ :-** **विविध विकास कामांना प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे. (सार्व. बांधकाम विभाग)**

**ठराव क्र.** :- १६

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात करावयाच्या अग्निशमन केंद्र, मार्केट, कम्युनिटी हॉल व स्मशानभुमी विकसित करणे आरोग्य केंद्र बांधणे, सबवे पोहच रस्ते कामांची खालीलप्रमाणे अंदाजपत्रके तयार करण्यात आली आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १ | भाईंदर (प.) अग्निशमन केंद्र इमारतीत बदल करुन वाढीव जागेसह मार्केट बांधणे. | रु. १,२५,००,०००/- |
| २ | मिरारोड (पूर्व) सिल्व्हर पार्क मार्केट इमारत बांधणे. | रु. १,३७,८९,७००/- |
| ३ | भाईंदर (पूर्व) एस.एन. कॉलेज समोरील नाला व मार्केट शेड बांधणे. | रु. २,६८,९५,८२५/- |
| ४ | मिरारोड (पूर्व) आरक्षण क्र. २४१ कम्यूनिटी हॉल विकसित करणे. | रु. १६,८८,६७,०००/- |
| ५ | भाईंदर (पूर्व) आरक्षण क्र. १२२ या जागेत अग्निशमन केंद्र इमारत बांधणे. | रु. १,२५,५०,०००/- |
| ६ | भाईंदर (प.) स्मशानभुमी विकसित करणे. | रु. ९०,००,०००/- |
| ७ | भाईंदर (पूर्व) गोडदेव स्मशानभुमी विकसित करणे. | रु. ७६,००,०००/- |
| ८ | भाईंदर (प.) मोतीगनर नाझरेथ चर्च कंपाऊंड ते गणेश देवल नगर पर्यंत रस्त्याचे बांधकाम करणे. | रु.९९,९५,६००/- |
| ९ | मिरारोड (पूर्व) कनकिया मुख्य रस्ता, ऑस्तवाल हाईट्स ते संतहोम शाळेपर्यंत रस्ता तयार करणे. | रु.१,०८,६७,३००/- |
| १० | भाईंदर (पूर्व) इंद्रलोक फेज-६ एम्स जंक्शन ते आरक्षण २३१, मार्केट लगतचा रस्ता तयार करणे. | रू. ८२,४८,८५०/- |
| ११ | भाईंदर (पूर्व) रस्त्यावर महावीर पॅलेस ते राम अनुज ते रामदेव पार्क मुख्य रस्त्यापर्यंत रस्ता तयार करणे. | रू. ७०,३३,६००/- |
| १२ | भाईंदर (पूर्व) दिपक हॉस्पीटल रस्ता दुर्गा रेसीडेन्सी ते रामवाटीका पर्यंत रस्ता तयार करणे | रू. ७३,४१,६५०/- |
| १३ | भाईंदर (पूर्व) रामदेव पार्क रस्ता, सहकार हाईट ते ३०.०० मी. डी.पी. रस्त्यापर्यंत नाल्यालगत रस्ता तयार करुन डांबरीकरण करणे. | रु. ६५,२८,२५०/- |
| १४ | मिरारोड (पूर्व) रामदेव पार्क रस्ता श्वेता रेसिडन्सी ते कनकिया पाण्याची टाकी पर्यंत डी.पी. रस्ता तयार करणे व गटारे बांधणे. | रु. २,२१,२१,७५०/- |
| १५ | मिरारोड (पूर्व) कनकिया वासुदेव कॉम्पलेक्स रस्ता रॉडस्टोन ते एस.टी.पी. पर्यंत विकास योजना रस्ता तयार करणे व गटारे बांधणे. | रू. ३,०५,११,४००/- |
| १६ | मिरारोड (पूर्व) कनकिया वासुदेव कॉम्पलेक्स समोरील स्प्रींग रोझ ते मेरी गोल्ड पर्यंत विकास योजना रस्ता तयार करणे व दोन्ही बाजूस गटारे बांधणे | रू. २,०३,४३,४००/- |
| १७ | भाईंदर (प.) गणेश देवल नगर येथे आरोग्य केंद्र बांधणे. | रु. ६१,२०,०००/- |
| १८ | भाईंदर (पूर्व) व (पश्चिम) जोडणारा रेल्वेखालील सब-वेसाठी पोहच रस्ते बांधणे.<br>मूळ अंदाजपत्रक रु. २३,११,९६,८७७/-<br>सुधारीत अंदाजपत्रक रु. ३१,९०,५१,६९०/- | |
| १९ | भाईंदर (पूर्व) आरक्षण क्र. २३१ येथे मार्केट चे बांधकाम करणे.<br>मूळ अंदाजपत्रक रु. ३,७१,२२,०००/-<br>सुधारीत अंदाजपत्रक रु. ७,३५,४७,५७१/- | |

| | | |
|---|---|---|
| २० | भाईंदर (पूर्व) आरक्षण क्र. २१८ येथे कम्युनिटी सेंटरचे बांधकाम करणे.<br>मूळ अंदाजपत्रक रु. ४,८२,५८,६००/-<br>सुधारीत अंदाजपत्रक रु. ९,१२,४५,२२३/- | |
| २२ | भाईंदर (पूर्व) नवघर येथील एस.व्ही. रोड वरील गटाराची पुर्नःबांधणी करणे. | रु. ६४,५३,८५०/- |
| २३ | भाईंदर (पूर्व) नवघर गांव चाळघर येथील नाल्याची पुर्नःबांधणी करुन स्लॅब टाकणे. | रु. १,०८,६६,४३०/- |
| २४ | भाईंदर (पूर्व) नवघर स्मशानभुमी मागील नाल्याची पुर्नःबांधणी करुन स्लॅब टाकणे. | रु. ५८,३८,४३०/- |
| ३० | संध्या प्रफुल्ल पाटील | ३० | वंदना मंगेश पाटील | |

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. विशेष महासभा दि. १३/०७/२०१५

प्रकरण क्र. ५७ :- महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये विकास नियंत्रण नियमावलीत बदल करणे - चेणे व वरसावे गावासाठी चटई क्षेत्र निर्देशांक १.० मंजूर होणेबाबत.

(सदरचे प्रकरण मागे घेण्यात आले.)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. महासभा दि.१३/०७/२०१५**

**प्रकरण क्र.५९ :- मौजे महाजनवाडी सर्व्हे क्र.१०७/१ पै, १०८/१,२, ३/१०९/२३,२४,२७,२८,११०/५पै या जागेचा मे. काऊनटाऊन यांना देण्यात आलेला करारनामा रद्द करणेबाबत.**

**ठराव क्र. ३२ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे महाजनवाडी सर्व्हे क्र. १०७/१पै, १०८/१,२,३/१०९/२३,२४,२७,२८,११०/५ पै या जागेमधील नागरी सुविधा क्षेत्राच्या एकुण ७७८१.०२ चौ.मीटर क्षेत्रापैकी ५० टक्के प्रमाणाच्या २८९०.५१ चौ. मीटर क्षेत्रामध्ये शाळेचे बांधकाम करणेस विकासक मे. काऊनटाऊन लॅन्ड डेव्हलपर्स प्रा.लि. यांना बांधकाम परवानगी देण्यात आली असून सदरचे क्षेत्र विकासकाम मा. महासभेच्या मान्यतेने ३० वर्षे भाड्याने देण्यात येवून दि.३०/०६/२०११ रोजी करारनामा करण्यात आला आहे.

सदरच्या मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामधील नागरी सुविधा क्षेत्राच्या भुखंडापैकी राजकीय वरदहस्त लाभलेल्या या विकासकाने हा भुखंड हस्तांतरीत न करता स्वतःच्या शाळेच्या वापराकरीता कुठलीही निविदा न काढता महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांना हाताशी धरुन व तत्कालीन आयुक्तांची दिशाभुल करुन गिळंकृत केला आहे.

१. सदर करारनामा महानगरपालिकेच्या हिताचा नाही.

२. सदरचे भुखंडाकरीता असलेले भाडे रेडी रेक्नर प्रमाणे कमी आहे

३. सदर जागेत जास्तीचे एफ.एस.आय. देण्यात आलेले आहे.

४. सदर जागा मालकाचा आणि महानगरपालिकेचे वास्तु विशारद (व्हॅल्युअर) एकच आहेत.

५. सदर जागेच्या निविदा काढण्यात आल्या नव्हत्या.

वरील सर्व कारणांसाठी मे. काऊनटाऊन लॅन्ड डेव्हलपर्स प्रा.लि. यांचा सदर करारनामा रद्द करण्यात यावा व (आरक्षित) जागा ताब्यात घेवून महानगरपालिकेने विकसीत करावी असा ठराव मांडण्यात येत आहे.

सुचक :- सौ. निलम ढवण      अनुमोदक:- दिनेश जैन

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. विशेष महासभा दि. १३/०७/२०१५

प्रकरण क्र. ६० :- एस. पी. एम. एल. कामाबाबत आढावा घेणे.

(सदर विषयाचा आढावा घेण्यात आला.)

# मिरा-भाईंदर महानगरपालिका
## मा. विशेष महासभा दि. २२/०७/२०१५

**प्रकरण क्र. ६१ :- केंद्र शासन व राज्य शासनामार्फत येणाऱ्या स्वच्छता महानगरपालिका कार्यक्षेत्रात राबविणेबाबत.**

**ठराव क्र. ३४ :-**

प्रशासनाने दिलेल्या गोषवाऱ्यानुसार मा. पंतप्रधान महोदयांनी घोषीत केलेल्या स्वच्छ भारत अभियान व मा. मुख्यमंत्री महोदयांनी स्वच्छ महाराष्ट्र अभियान "सप्तपदी स्वच्छते" मध्ये नमुद केलेल्या तरतुदी नुसार तसेच उपरोक्त अभियानाबाबत केंद्र शासन व राज्य सरकार यांच्यामार्फत प्राप्त होणाऱ्या निधीतून खालीलप्रमाणे उपक्रम राबविणेत यावे.

१. स्वच्छ भारत अभियान अंतर्गत नागरीकांमध्ये जनजागृती करणे कामी होर्डींग्ज, पोस्टर्स, फलक इत्यादींच्या माध्यमातून जनजागृती करणे.

२. मिरा भाईंदर शहरामध्ये उघड्यावर शौचालयास बसले जाते. अशा ठिकाणी पुरेसे शौचालय बांधणे, राज्य शासन व खाजगी मालकीच्या जागेवर शौचालय बांधणे आवश्यक आहे. शौचालय बांधण्यासाठी केंद्र व राज्य शासनाकडून प्राप्त होणारा निधी तसेच आवश्यकता पडल्यास महापालिकेचा निधी उपलब्ध करून देणे.

३. स्वच्छ भारत अभियान यशस्वी राबविणे करीता रस्त्यावर सार्वजनीक ठिकाणी थुंकणे, उघड्यावर शौचास बसणे, रस्त्यावर कपडे धुणे, आंघोळ करणे, रस्त्यावर टाकाऊ बांधकाम इत्यादी साहित्य वस्तु टाकणे, तसेच ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या कॅरीबॅगचा वापर करणे इत्यादींवर प्रतिबंध करणे कामी मिरा भाईंदर महानगरपालिकेने घनकचरा व्यवस्थापन उपविधी २०११ मंजुर करून शासनास पाठविलेली आहे. त्यामधील नमुद केलेल्या तरतुदीनुसार दंडात्मक कार्यवाही करणे.

उपरोक्त सर्व कामास येणाऱ्या खर्चास ही सभा आर्थिक व प्रशासकीय मान्यता देत आहे.

**सुचक :- श्री. रोहिदास पाटील अनुमोदक :- श्री. प्रेमनाथ पाटील**

**सदर ठरावामध्ये सुचक डॉ. नयना वसाणी व अनुमोदक श्रीम. सिमा शाह ह्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

१) मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात खालीलप्रमाणे स्वच्छतागृह बांधण्यात आलेली आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | महानगरपालिकेमार्फत स्वखर्च/ अनुदानातुन बांधलेली स्वच्छतागृह | १६७ |
| २) | पे-ॲन्ड युज तत्त्वावर बांधलेली स्वच्छतागृह | ५६ |
| ३) | फायबर प्री-फॅब स्वच्छतागृह | ०६ |
| ४) | मोबाईल टॉयलेट | ०५ |
| | **एकूण** | **२३४** |

मिरा-भाईंदर महानगरपालिकेमार्फत बांधलेली स्वच्छतागृहे ही MMRDA च्या वस्ती स्वच्छतागृह योजनेअंतर्गत चालविण्यासाठी स्थानिक पातळी वरील संस्थाना देण्यात आली होती. तथापी सदर स्वच्छतागृहे ही व्यवस्थिरीत्या स्वच्छ होणे, मासिक वीज बील, पाणी बील न भरणे, आवश्यक दुरुस्ती न करणे इ. बाबत तक्रारी येऊन चालविणाया संस्था सोडून गेल्याने अशी १४३ स्वच्छतागृहाची देखभाल व दुरुस्तीसाठी महानगरपालिकेमार्फत संस्था नेमून त्यांना प्रति स्वच्छतागृह रु.२०,०००/- प्रति महिना

रक्कम देण्यात येत आहे. तसेच सदर स्वच्छतागृहांचे वीज बील, पाणी बील महानगरपालि... असून आवश्यक दुरुस्ती कामे देखील करण्यात येत आहेत. त्यासाठी दुरुस्ती कामांवर आता... रु. १.५० कोटी खर्च केला असून देखभाल व निगा ठेवण्याच्या संस्थावर वार्षिक रु.४.२५ कोटी एवढा खर्च येणार आहे. मिरा-भाईंदर महानगपालिकेचे यापूर्वी सर्व स्वच्छतागृह देखभाल दुरुस्ती व चालविण्यासाठी खाजगी संस्थाना कामे दिली होती. सदर संस्थाना स्वच्छतागृह वापरणाया कुटुंबाकडून मासिक रुपये २० ते ३५ प्रति कुटुंब रक्कम घेऊन पास देण्यात येत होते. तथापी विशेषतः राई, मोर्वा, मुर्धा, उत्तन, पेणकरपाडा, घोडबंदर, काशि या भागातील रहिवाशी सदर रक्कम देत नसल्याने तक्रारी, भांडणे होत होती ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे संस्थानी कामे सोडून दिली. स्वच्छतागृह वापरणाया कुटुंबाकडून नेमलेल्या कंत्राटदराकडून ठरविलेली रक्कम वसूल करण्यात यावी. तसेच पाणी बील व वीज बील महानगरपालिकेमार्फतच भरुन सदर रक्कम देखील सदर संस्थाना/ कंत्राटदाराना द्यावयाच्या रकमेतुन कपात करुन घेता येईल. सदर स्वच्छतागृहाच्या सर्व दुरुस्त्या, दैनंदिन साफसफाई विद्युत कामे देखील सदर संस्थानी स्वखर्चाने कराव्यात. यासाठी निविदा मागवून प्रति कुटुंबावर निश्चित करुन संस्थाची देखील निवड करुन प्रत्येक संस्थेस १५ कामे दिल्यास त्यांच्यावर नियंत्रण ठेवून स्वच्छतागृहाबाबत नियोजन करता येऊ शकेल.

वरील प्रमाणे कार्यवाही करण्यास प्रशासकिय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

**सुचनेसह ठराव सर्वानुमते मंजूर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. विशेष महासभा दि. २२/०७/२०१५

**प्रकरण क्र. ६३ :-** *महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील "कनिष्ठ अभियंता" यांना "शाखा अभियंता म्हणून दर्जोन्नतीसह श्रेणीवाढ देणेबाबत.*

**ठराव क्र. ३६ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका मुंबई उपनगरास लागून असून मिरा भाईंदर नगरपालिकेची "ब" वर्ग मध्ये दि.१२/०६/१९८५ रोजी स्थापना होवून नगरपालिकेचे दि.२८/०८/१९९६ रोजी "अ" वर्गामध्ये रुपांतर झालेले आहे. त्यानंतर दि.२८/०२/२००२ पासून "ड" वर्ग महानगरपालिका अस्तित्वात आलेली आहे. सन १९९१ च्या जनगणनेप्रमाणे मिरा भाईंदर महानगरपालिकेतील लोकसंख्या १७५३७२ व सन २००१ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या ५२०३८८ तसेच सन २०११ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या ८०९३७८ असून सद्यस्थितीत अंदाजे ११ लक्ष आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर एकूण २० कनिष्ठ अभियंते विविध विभागामध्ये कार्यरत असून यापैकी बहुतांश कनिष्ठ अभियंत्यांची सेवा १० ते १२ वर्षाची झालेली आहे. सदरचे कनिष्ठ अभियंते शासनाच्या पाटबंधारे विभागाच्या जा.क्र. सी.डी.एस.१५८२/१५८(२१५)/आ(१०), दि.१६/०४/१९८४ तसेच ग्रामविकास व जलसंधारण विभागासाठीच्या जा.क्र. झेडएनजी/ १०७०/प्र.क्र.२६४/११, दि.२६/०४/२००१ अन्वयेच्या निर्णयासह नवी मुंबई महानगरपालिकेप्रमाणे व महानगरपालिकेसाठी शासनाने मंजूर केलेल्या "सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण नियम' याप्रमाणे कनिष्ठ अभियंता या पदावर ५ वर्षे सेवा पूर्ण झालेनंतर शाखा अभियंता (वर्ग-२) म्हणून श्रेणीवाढ मिळणेस सन २००८ पासून मागणी करित असून त्यांना अद्यापपर्यंत श्रेणीवाढ देण्यात आलेली नाही.

मिरा भाईंदर शहराच्या हद्दीचा विचार करता भविष्यामध्ये महानगरपालिकेची हद्द वाढून महानगरपालिकेच्या कर्मचा-यांना पदोन्नतीच्या संधी उपलब्ध होण्याची शक्यता फारच कमी असल्यामुळे तसेच महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील अनुभवी, कुशल कनिष्ठ अभियंते यांची कुंठिता घालविण्याच्या दृष्टीकोनातून व मिरा भाईंदर महानगरपालिकेसाठी शासनाने मंजूर केलेल्या "सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण नियम" यामधील तरतुदी यांचा विचार करता शासनाच्या प्रचलित धोरणाप्रमाणे तसेच महानगरपालिकेसाठीच्या मंजूर "सेवा प्रवेश व सेवा वर्गीकरण नियम" प्रमाणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील ५ वर्षे सेवा पूर्ण झालेल्या कनिष्ठ अभियंत्यांना "शाखा अभियंता" (वर्ग-२) या संवर्गात दर्जोन्नतीसह श्रेणीवाढ देण्यासाठीचा विषय दि.१३/०७/२०१५ रोजीच्या मा. महासभेमध्ये आला असता, सदर विषयांचा गोषवारा नसल्यामुळे सदरचा विषय पुढील मा. महासभेमध्ये घेणेबाबत मा. महासभेने निर्देश दिलेले आहेत. त्याप्रमाणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील ५ वर्ष सेवा पूर्ण झालेल्या कनिष्ठ अभियंत्यांना "शाखा अभियंता" (वर्ग-२) या संवर्गात दर्जोन्नतीसह श्रेणीवाढ देणेसाठी ही महासभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत दळवी** **अनुमोदक :- श्री. अनिल भोसले**

**सदर ठरावामध्ये सुचक श्री. शरद पाटील व अनुमोदक श्री. राकेश शाह ह्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर अत्यंत अपुरा तांत्रिक कर्मचारी वर्ग आहे. सद्यस्थितीत ५ ते ७ कनिष्ठ अभियंता व इमारत निरिक्षकाची पदे रिक्त असून त्यामधून काही पदे पदोन्नतीने भरावयाची आहेत. परंतु महानगरपालिकेकडे सदर पदे पदोन्नतीने भरण्यासाठी आवश्यक पात्रता, अनुभव असलेले कर्मचारी नसल्याने कनिष्ठ अभियंता व इमारत निरिक्षकाची सर्व रिक्त पदे तातडीने सरळसेवेने भरण्यात यावीत.

**सुचनेसह ठराव सर्वानुमते मंजूर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## प्रस्तावना

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात गणपती व नवरात्रौत्सव, रमजान महिना, बकरी ईद, मोहरम, नाताळ, १४ एप्रिल (डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती), ६ डिसेंबर (महानिर्वाण दिन) व सर्व धर्मीय उत्सव, सण रस्त्यावर साजरे केले जातात. या उत्सवा दरम्यान मोठया प्रमाणात मंडप उभारण्यासाठी विविध संस्था महानगरपालिकेकडे अर्ज करीत असतात. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २३४ अन्वये मा. पोलिस आयुक्त यांच्या सहमतीने रस्त्यावर मंडप उभारण्यासाठी महापालिका आयुक्त परवानगी देऊ शकतात.

सार्वजनिक उत्सवाच्यावेळी बहुतेक मंडळे ही महानगरपालिकेच्या वाहतुकीच्या रस्त्यावर मंडप उभारणी करतात, अशावेळी परिसरात असलेल्या नागरीकांना तसेच वाहतुकीस अडथळा निर्माण होऊन कायदा व सुव्यस्थेचा प्रश्न निर्माण होतो. सार्वजनिक उत्सवामध्ये तात्पुरत्या स्वरूपात बांधलेल्या मंडपाचा अडथळा होऊ नये, तसेच सार्वजनिक उत्सवही साजरे करता यावेत व परिसरातील नागरीक व रहदारीला कमीत कमी त्रास व्हावा या दृष्टीकोनातून वेळोवेळी मिरा भाईंदर महानगरपालिकेने मार्गदर्शक तत्वे व कार्यलयीन पध्दती तयार केलेली आहे.

डॉ. महेश बेडेकर विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर जनहित याचिका क्र. १७३/२०१० अन्वये मा. उच्च न्यायालयाने सार्वजनिक उत्सव साजरे करताना रहदारीस अडथळा होणार नाही, तसेच ध्वनी क्षेपकामुळे होणारे प्रदुषण नियंत्रित करणे व नागरीकांसाठी प्रभावी तक्रार स्विकारण्याची सुविधा उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिलेले आहेत व निर्देशाची अंमलबजावणी करण्याबाबत मा. मुख्य सचिवांकडे धोरणात्मक निर्णय घेण्याबाबत विचारणा केली आहे.

त्याअनुषंगाने सण साजरे करताना पर्यावरणाचा ऱ्हास होणार नाही, ध्वनी प्रदुषण होणार नाही व रहदारीस अडथळा निर्माण होणार नाही. मा. उच्च न्यायालयाने घालून दिलेल्या नियमांचे दिशा निर्देश सार्वजनिक मंडळाकडून उचित पालन होण्यासाठी, मिरा भाईंदर महानगरपालिकेतर्फे जनभावनांचा मान राखून आणि जनजीवन विस्कळीत होऊ न देता जनहितार्थ मार्गदर्शक तत्त्वे तयार करयात आलेली आहे. तसेच सदर प्रकरणी नागरीकांच्या तक्रारी स्वीकारण्यासाठी तक्रार निवारण व्यवस्था निर्माण केलेली असून सदर सुविधेस उचित प्रसिध्दी देण्यात येत आहे.

सदर मार्गदर्शक तत्त्वांमुळे सार्वजनिक उत्सव शांततेत व सुरळीत जनजीवन विस्कळीत न होता साजरे करण्यास निश्चितच मदत होईल असा मला विश्वास आहे.

**(अच्युत हांगे)**
**आयुक्त**
मिरा भाईंदर महानगरपालिका

**मार्गदर्शक तत्त्वे :-**

**अर्ज सादर करण्याची पध्दती :-**

१. सार्वजनिक उत्सवाच्या प्रसंगी रस्ता/सार्वजनिक ठिकाणी मंडप/स्टेशन इ. उभारण्यास परवानगी मिळणेबाबत संबंधित मंडळाने विहीत नमुन्यात सार्वजनिक उत्सवाच्या ३० दिवस अगोदर प्रभाग समितीचे प्रभाग क्षेत्र अधिकारी यांचेकडे अर्ज करणे आवश्यक आहे.

२. संबंधित मंडळाने मागणी केलेल्या ठिकाणी मंडप/स्टेज इ. उभारणेसाठी रस्त्याच्या १/४ भागापेक्षा अधिक असणार नाही व सार्वजनिक वाहतुकीस अडथळा येणार नाही व नागरीकांना त्यापासून उपद्रव तसेच आक्षेपार्ह होणार नाही याची दक्षता संबंधित मंडळाने घ्यावयाची आहे. मंडप/स्टेज इ. उभारणेकरीता प्रचलित आकाराचा तक्ता खालीलप्रमाणे :

| रस्त्याची रुंदी | मंडप/स्टेजसाठी दिली पाहीजे अशी कमाल रुंदी | मोकळी/खुली असली पाहीजे अशी रस्त्याची रुंदी |
|---|---|---|
| २५ फूट | ६.२५ फूट | १८.७५ फूट |
| ५० फूट | १२.५ फूट | ३७.५ फूट |
| ७० फूट | १७.५ फूट | ५२.५ फूट |

**ना हरकत दाखला :**

३. संबंधित मंडळाने मागणी केलेल्या ठिकाणी मंडप/स्टेज इ. उभारणेसाठी परवानगी देणेपूर्वी शहर वाहतूक पोलिस शाखा, स्थानिक पोलिस स्टेशन व महापालिकेच्या अग्निशमन विभाग यांचे ना हरकत दाखला तीन दिवसांचे आत सादर करणे आवश्यक आहे.

**पूर्व इतिहास :**

४. मागील वर्षी ज्या मंडळांना मंडप/स्टेज इ. उभारणेसाठी ज्या जागेवर परवानगी देण्यात आली होती. त्याच जागेवर अर्जावेळी परवानगी देण्यात येईल. परंतू प्रशासकीय आवश्यकतेनूसार मिरा भाईंदर महानगरपालिका सदर बाबीमध्ये योग्य तो बदल करू शकते.

५. मागील वर्षी ज्या आकाराचा मंडप/स्टेज इ. उभारणेसाठी परवानगी देण्यात आली होती. तेवढयाच आकाराचा किंवा रस्त्याच्या १/४ भाग यापैकी जे कमी असेल त्या आकाराचा मंडप/स्टेज इ. उभारणेसाठी परवानगी देण्यात येईल. मिरा भाईंदर महानगरपालिका आवश्यकतेनूसार मंडप उभारण्याची परवानगी द्यावी किंवा नाही याबाबत स्वच्छधिकार अबाधित ठेवत आहे. तसेच मंडप/स्टेज आकार कमी करण्याचे निर्देशसुध्दा मंडळांना देऊ शकते.

**कायदेशीर तरतुद :**

६. महापालिकेने परवानगी दिल्यानुसारच मंडप/स्टेज इ. उभारणे संबंधित मंडळावर बंधनकारक आहे. परवानगी व्यतिरिक्त संबंधित मंडळाने मंडप/स्टेज इ. उभारल्याचे निदर्शनास आल्यास ते संबंधित प्रभाग समितीचे प्रभाग क्षेत्र अधिकारी यांनी पोलिस अधिकाऱ्यांच्या मदतीने काढून टाकण्यात येईल व संबंधितांवर योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल. तसेच महानगरपालिकेने दिलेल्या सुचनेनूसार मंडप/स्टेज नसल्यास सदरचा मंडप/स्टेज मिरा भाईंदर महानगरपालिका पूर्वसुचना न देता काढू शकते.

७. पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्र. ईएनव्ही-२०१०/प्र.क्र.१०६/ता.क.३ दि. ३/५/२०११ अन्वये दिलेल्या निर्देशांप्रमाणे सार्वजनिक उत्सव साजरे करणारी मंडळे यांचेकडून सर्व नियमांचे पालन करणे बंधनकारक आहे.

८. महाराष्ट्र शासनाचे पर्यावरण विभाग, नगर विकास विभाग व इतर विभागांनी वेळोवेळी पारीत केलल्या शासन निर्णय व मा. उच्च न्यायालय व मा. सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशांचे पालन संबंधित मंडळांनी करणे बंधनकारक आहे.

**दक्षता :**

९. ज्या प्रस्तावित मंडप/स्टेज इ. उभारणीची जागा ही परिवहन सेवेच्या बस मार्गावर असेल त्या रस्त्यावर मंडप/स्टेज इ. उभारणेकरीता किमान १२ फुट रुंद जागा ही बसेस, रिक्षा व सार्वजनिक वाहतुकीतील ट्रॅककरीता उपलब्ध राहील याची दक्षता घेण्यात यावी.

१०. संबंधित मंडळाने मंडप/स्टेज इ. उभारणी करताना ते रोड जंक्शनपासून किमान रस्त्याच्या रुंदीच्या अर्धे याप्रमाणे जंक्शनपासून लांब राहील जेणेकरून वाहने वळविणे सोपे होईल अशा पध्दतीने कार्यवाही करावी.

११. संबंधित मंडळास मंडप/स्टेज इ. उभारणी करण्यासाठी कोणत्याही ठिकाणचा सिमेंट कॉंक्रिट रस्ता अथवा पॅसेज असलेल्या पृष्ठभागावर खोदाई करण्याकरीता परवानगी देण्यात येणार नाही. अशा ठिकाणी मंडप घालावयाचे झाल्यास वाळूने भरलेल्या ड्रमवर मंडप/स्टेज याकरीता आवश्यक असणारे बांबू रोवून त्यापासून अथवा पुर्वनियोजित व्यवस्थापनाप्रमाणे मंडप/स्टेज याकरीता बांबू रोवण्यात यावेत. रस्ते/सार्वजनिक खोदाई करून मंडप/स्टेज इ. उभारणी केल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित मंडळावर रस्ते अनधिकृतपणे खोदाईबाबत कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

१२. ज्या ठिकाणी पक्क्या स्वरूपाचे रस्ते दुभाजक आहेत अशा ठिकाणी पदपथ व दुभाजक यामधील रस्त्याच्या भागातील १२ फुटा व्यतिरिक्त उर्वरित जागेत मंडपाची उभारणी संबंधित मंडळाने करावी.

१३. कोणत्याही ठिकाणी ८ फुट व त्यापेक्षा कमी असलेल्या रस्त्याच्या जागेत मंडप/स्टेज इ. उभारणीकरीता परवानगी महानगरपालिकेकडुन देण्यात येणार नाही. मंडप/स्टेज इ. अंतर विद्युत तार व डी. पी. बॉक्स पेक्षा ६ फुट अंतरावर ठेवणे संबंधित मंडळावर बंधनकारक आहे.

१४. सार्वजनिक उत्सवांकरीता आवश्यक विद्युत कनेक्शन महापालिकेच्या कोणत्याही रस्त्यावरील विद्युत पालेमधुन घेता येणार नाही. असे आढळुन आल्यास संबंधित मंडळावर दंडात्मक कारवाई करुन त्यांची परवानगी रद्द करण्यात येईल.

१५. संबंधित मंडळाला महानगरपालिकेने परवानगी दिलेल्या जागी उभारण्यात आलेल्या मंडपापासुन जास्तीत जास्त १५ मीटर अंतरापर्यंतचा विद्युत रोषणाई करता येईल.

१६. मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत नविन धोरणानूसार द्यावयाच्या परवानगीबाबत स्थानिक परिस्थिती व पर्यायी व्यवस्था याबाबत माहीती घेऊन सदर धोरणात शिथिलता आणून परवानगी देण्याचे अधिकार आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना देण्यात येत आहेत.

**शुल्क वसुली :**

१७.मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दितील रस्ता/सार्वजनिक ठिकाणी उत्सव, सण, धार्मिक कार्यक्रम तसेच वैयक्तिक कारणांसाठी मंडप/स्टेज उभारणेसाठी यापुर्वी मा. महासभेने पारित केलेल्या ठरावाप्रमाणे आवश्यक शुल्काची वसुली संबंधित मंडळांकडुन करण्यात येईल.

**परवानगी कालावधी**

१८.सार्वजनिक रस्ते तात्पुरते व्यापण्यासाठी किंवा त्यावी उभारणी करण्यासाठी सर्वसामान्यपणे खाजगी उत्सव किंवा समारंभ यांचेबाबतीत पाच दिवस किंवा सार्वजनिक उत्सव किंवा समारंभ यांच्या बाबतीत पंधरा दिवस ह्यापेक्षा जास्त कालावधीसाठी परवानगी देण्यात येणार नाही.

**ध्वनी प्रदुषण तक्रारीबाबत कार्यपध्दतील :**

१९.सार्वजनिक ठिकाणी वातावरणात दिवसेंदिवस ध्वनीची तीव्रता औद्योगिक कामे, विविध प्रकारची बांधकामे, जनित्रे (जनरेटर्स), ध्वनिवर्धक (लाऊड स्पीकर्स), सार्वजनिक सभा, संगीत वाद्ये, वाहनांचे भोंगे व इतर यांत्रिक साधनांमुळे ध्वनीचे प्रमाण वाढतच आहे. ध्वनी प्रदुषणामुळे नागरिकांच्या आरोग्यावर व मानसिक स्वास्थ्यावर अनिष्ट परिणाम होत असल्यामुळे तसेच वातावरणातील ध्वनीची योग्य पातळी राखण्याच्या हेतुन ध्वनी निर्माण करण्याऱ्या स्त्रोतांचे नियमन व नियंत्रण करणे आवश्यक असल्याने महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय दि. २१ एप्रिल २००९ अन्वये ध्वनी प्रदुषण (नियंत्रण व नियमन) नियम २००० ची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी प्राधिकरणाची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

२०.बांधकाम प्रकल्पाच्या ठिकाणी ध्वनी प्रदुषण करणारी उपकरणे/ स्त्रोत जसे D.G. Sets, Generator Sets इमारतीसाठी वापरण्यात येणाऱ्या सुविधा, घरगुती उपकरणे इत्यादिंची सभोवतालच्या हवेतील ध्वनी प्रदुषण गुणवत्ता खाली नमुद केल्याप्रमाणे असेल.

२१.आवाजाच्या संबंधीत सभोवतालच्या हवेच्या गुणवत्तेचा दर्जा

| क्षेत्र संकेतांक | क्षेत्र / झोन प्रवर्ग | ऐबि (ए) एल ईक्यु दिवसा | मधील मर्यादा रात्री |
|---|---|---|---|
| (अ) | औद्योगिक क्षेत्र | ७५ | ७० |
| (ब) | वाणिज्यिक क्षेत्र | ६५ | ५५ |
| (क) | निवासी क्षेत्र | ५५ | ४५ |
| (ड) | शांतता क्षेत्र | ५० | ४० |

**टिप :-**

१. दिवसा म्हणजे सकाळी ६.०० ते रात्री १०.०० पर्यंत

२. रात्री म्हणजे १०.०० ते सकाळी ६.०० पर्यंत

३. शांतता क्षेत्र म्हणजे रुग्णालये, शैक्षणिक संस्था, न्यायालये, धार्मिक ठिकाणे किंवास क्षम प्राधिकरणाने अशी क्षेत्रे म्हणुन घोषित केलेली अतर कोणतीही क्षेत्रे यांच्या सभोवतालच्या १०० मीटर्सपर्यंतच्या क्षेत्राचा समावेश असलेली क्षेत्रे.

४. संमिश्र क्षेत्र हे वर नमु केलेल्या चारांपैकी एक क्षेत्र असल्याचे सक्षम प्राधिकरणाकडुन घोषित करण्यात येईल.

२२.ध्वनी प्रदुषणाच्या प्राप्त झालेल्या तक्रारींची नोंद ठेवण्यासाठी स्वतंत्र रजिस्टरची व्यवस्था केलेली आहे. प्राप्त झालेली ध्वनी प्रदुषणाची तक्रार कार्यवाहीसाठी संबंधित पोलीस स्टेशनला व पोलीस कंट्रोल रुमला अग्रेषीत करण्यात येणार आहे.

२३.आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका, मिरा भाईंदर यांना शांतता क्षेत्र अधिसुचना, अन्वये जाहीर केलेले आहेत.

**तक्रार निवारण व्यवस्था :**

२४.मा. उच्च न्यायालयाचा आदेशानूसार मिरा भाईंदर महानगरपालिकेने सार्वजनिक उत्सवाच्यावेळी अनधिकृतरित्या उभारलेल्या मंडपांबाबत तसेच ध्वनी प्रदुषणाबाबत, नागरीकांच्या तक्रारी स्विकारण्यासाठी सद्यस्थितीत कार्यान्वित असलेली आपतकालिन विभागाची टोल फ्री नंबर, ई-मेल सुविधा, एस.एम.एस. सुविधा खालीलप्रमाणे उपलब्ध केलेली आहे व त्यास उचित प्रसिध्दी देण्यात येत आहे.

२५.वरीलप्रमाणे आदेश आपत्कालिन विभागाला दिलेले असून सर्व प्रभाग क्षेत्र अधिकारी यांना उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित केलेले आहेत.

२६.ध्वनी प्रदुषण तसेच इतर प्रदुषण होणार नाही याची सर्वस्वी जबाबदारी मंडळाची राहील.

२७.पोलिस, वाहतूक यंत्रणा, महानगरपालिका यंत्रणा, शासन यंत्रणा यांना दिलेले सर्व निर्देश यांचे काटेकोर पालन करणे मंडळास बंधनकारक राहील.

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. विशेष महासभा दि. २२/०७/२०१५

**प्रकरण क्र. ६५ :-** **सार्वजनिक रस्त्यांवर (फुटपाथ / फुटवेज) समारंभाच्या व उत्सवाच्या प्रसंगी मंडप किंवा असे काणेतेही अन्य बांधकाम तात्पुरते उभारण्यास परवानगी देण्यासाठी धोरण निश्चित करणेबाबत व सदरचे धोरण मार्गदर्शक सुचनांच्या स्वरुपात प्रसिध्द करणेबाबत.**

**ठराव क्र. :-** ३८

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात गणपती व नवरात्रोत्सव, रमजान महिना, बकरी ईद, मोहरम, नाताळ, १४ एप्रिल (डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती), ६ डिसेंबर (महानिर्वाण दिन) व सर्वधर्मीय उत्सव सण रस्त्यावर साजरे केले जातात. या उत्सवा दरम्यान मोठया प्रमाणात मंडप उभारण्यासाठी विविध संस्था महानगरपालिकेकडे अर्ज करीत असतात. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २३४ अन्वये पोलिस कार्यालयाच्या संमतीने रस्त्यावर मंडप उभारण्यासाठी महापालिका आयुक्त परवानगी देऊ शकतात.

सार्वजनिक उत्सवाच्यावेळी बहुतेक मंडळी ही महानगरपालिकेच्या वाहतुकीच्या रस्त्यावर मंडप उभारणी करतात, अशावेळी परिसरात असलेल्या नागरीकांना तसेच वाहतुकीस अडथळा निर्माण होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो. समारंभाच्या व उत्सवाच्या प्रसंगी रस्त्यावर येत उभारण्यात असलेल्या मंडप संदर्भात व ध्वनी प्रदुषण (नियमन व नियंत्रण) नियम, २००० ची अंमलबजावणी करण्यासंदर्भात डॉ. महेश बेडेकर यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे जनहित याचिका क्र. १७३/२०१० सोबत सिव्हिल ॲप्लिकेशन क्र. १२४/२०१४ दाखल केली आहे. सदर याचिकेमध्ये मा. उच्च न्यायालयाने दि.१३/०३/२०१५ व दि. २४/०६/२०१५ रोजीच्या आदेशात समारंभाच्या व उत्सवाच्या प्रसंगी रस्त्यावर उभारण्यात येत असलेल्या मंडपसंदर्भात सविस्तर विवेचन करुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम २३४ अन्वये महानगरपालिकांच्या आयुक्तांना असलेल्या अधिकारांचा वापर करण्याकरीता महानगरपालिकांनी धोरण तयार करुन मार्गदर्शक सुचनांच्या स्वरुपात प्रसिध्द करण्याबाबत आदेशित केले आहेत. सदरचे धोरण सर्व समाजांच्या व धर्माच्या उत्सवांना लागू राहतील व सदर धोरणास महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर प्रसिध्द देणेबाबत व सदरची धोरण प्रतिज्ञापत्राद्वारे मा. उच्च न्यायालयात विहीत कालावधीत सादर करणेस आदेशित केले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाने शासन परिपत्रक क्र. याचिका २०१५/सं.क्र.८७८(१)/नवि३४, या शासन निर्णयाद्वारे सर्व महानगरपालिकांना मा. उच्च न्यायालयाने दि.१३/३/२०१५ व दि.२४/०६/२०१५ रोजी दिलेल्या आदेशांचे पालन करावे व यासंदर्भात विहित कालावधीत कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मा. उच्च न्यायालयात व शासनास सादर करण्यास निर्देशित केलेले आहे. तसेच दि.१५/०७/२०१५ रोजी या विषयासंदर्भात मा. सचिव, नगरविकास विभाग यांच्याकडे झालेल्या बैठकीत व्हिडिओ कॉन्फरन्स मध्ये सर्व महानगरपालिकांना सदरचे धोरण निश्चित करण्याकरीता मा. महासभेची मंजूरी घेणेस आदेशित केले आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका रस्त्यावरा समारंभाच्या व उत्सवाच्या प्रसंगी मंडप किंवा असे कोणतेही अन्य बांधकाम तात्पुरता उभारण्यास परवानगी देण्यासाठी मार्गदर्शक तत्वे २०१५ तयार केली असून सोबत जोडलेल्या धोरणास ही सभा मंजूरी देत आहे. तसेच याबाबतचे सर्व अधिकार मा. आयुक्त यांना देण्यात येत आहेत.

**सुचक :- श्री. रोहिदास पाटील** **अनुमोदन :- श्रीम. सुनिला शर्मा**

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. ०४/०९/२०१५

**प्रकरण क्र. ६६ :-** दि. ०७/०२/२०१५, दि. २७/०२/२०१५, दि. ०२/०३/२०१५ (दि. १५/०१/२०१५ रोजीची निलंबित सभा) व दि. ०२/०३/२०१५ (दि. ०७/०२/२०१५ रोजीची तहकुब सभा) रोजींच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. ४०  :-**

दि. ०७/०२/२०१५, दि. २७/०२/२०१५, दि. ०२/०३/२०१५ (दि. १५/०१/२०१५ रोजीची निलंबित सभा) व दि. ०२/०३/२०१५ (दि. ०७/०२/२०१५ रोजीची तहकुब सभा) रोजीच्या मा. विशेष महासभेचे इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :-** श्री. रोहिदास पाटील

**अनुमोदक :-** श्री. नरेंद्र मेहता

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

# मा. महासभा दि. ०४/०९/२०१५



**प्रकरण क्र. ६८ :-** **मिरारोड (पूर्व) क्षेत्रातील नया नगर पोलीस ठाणेसाठी जागा उपलब्ध करुन देणे संदर्भात निर्णय घेणे.**

**ठराव क्र.४२:-**

सदर विषयाबाबत सन्मा. पोलिस अधिक्षक व उपअधिक्षक पोलिस विभाग, ठाणे ग्रामीण, ठाणे व मा. आयुक्त यांनी सन्मा. महापौर यांचेबरोबर चर्चा करुन सदर विषय रितसर सादर करण्यात यावा.

**सुचक :- श्रीम. सिमा शाह** **अनुमोदक :- श्री. दिनेश जैन**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | मेहता नरेंद्र लालचंद | १ | ध्रुवकिशोर पाटील | |
| २ | पाटील रोहिदास शंकर | २ | डिमेलो बर्नड अल्बर्ट | |
| ३ | म्हात्रे कल्पना महेश | ३ | शिल्पा भावसार | |
| ४ | भानुशाली वर्षा गिरीधर | ४ | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | |
| ५ | मीरादेवी रामलाल यादव | ५ | दक्षता राजेंद्र ठाकूर | |
| ६ | कोठारी सुमन रमेश | ६ | पाटील वंदना विकास | |
| ७ | डॉ. नयना मनोज वसाणी | ७ | शबनम लियाकत शेख | |
| ८ | सिमा कमलेश शहा | ८ | प्रभात प्रकाश पाटील | |
| ९ | जैन गिता भरत | ९ | पाटील सुनिता कैलास | |
| १० | रावल भगवती जयशंकर | १० | झिनत रऊफ कुरेशी | |
| ११ | मेहता डिंपल विनोद | ११ | विराणी रेखा अनिल | |
| १२ | मेघना दिपक रावल | १२ | पुजारी कांचना शेखर | |
| १३ | शर्मा सुनिला सत्येंद्र | १३ | पिसाळ मनिषा नामदेव | |
| १४ | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | १४ | डिसा मर्लिन मर्विन | निरंक |
| १५ | सुजाता रविकांत शिंदे | १५ | अनिता जयवंत पाटील | |
| १६ | पाटील प्रेमनाथ गजानन | १६ | बगाजी शर्मिला विल्सन | |
| १७ | सिंग मदन उदितनारायण | १७ | इनामदार जुबेर | |
| १८ | कांगणे यशवंत ठकाजी | १८ | घेतोसकर राजेश शंकर | |
| १९ | अनिल बाबुराव भोसले | १९ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | |
| २० | कासोदरीया अश्विन श्यामजी | २० | सुर्यकांत खंडोजी म्हात्रे | |
| २१ | जैन दिनेश तेजराज | २१ | सामंत प्रमोद जयराम | |
| २२ | जैन रमेश धरमचंद | २२ | रकवी सुहास माधवराव | |
| २३ | डॉ. राजेंद्र जैन | २३ | पांडे हसुकुमार कमलकुमार | |
| २४ | निलम हरिश्चंद्र ढवण | २४ | खण्डेलवाल सुरेश | |
| २५ | शुभांगी महिन कोटियन | २५ | डॉ. आसिफ शेख | |
| २६ | जयमाला किशोर पाटील | २६ | नरेश तुकाराम पाटील | |
| २७ | परमार अनिता भरत | ३७ | भोईर कमलेश यशवंत | |
| २८ | गावंड मंदाकिणी आत्माराम | २८ | रविंद्र भिमदेव माळी | |
| २९ | संध्या प्रफुल्ल पाटील | २९ | वंदना मंगेश पाटील | |
| ३० | म्हात्रे प्रभाकर प्रद्माकर | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| ३१ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | | |
| ३२ | हरिश्चंद्र रामचंद्र आमगावकर | | |
| ३३ | प्रविण मोरेश्वर पाटील | | |
| ३४ | शाह राकेश रतिशचंद्र | | |
| ३५ | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | | |
| ३६ | केळुसकर प्रशांत नारायण | | |
| ३७ | भोईर भावना राजू | | |
| ३८ | भोईर राजू यशवंत | | |
| ३९ | जाधव मोहन महादेव | | |
| ४० | ॲड. रवि व्यास | | |
| ४१ | दिप्ती शेखर भट | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. ०४/०९/२०१५

**प्रकरण क्र. ६९ :-** **मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मालकीचे स्ट्रीट लाईट पोल वार्षिक मुदतीने देखभाल दुरुस्ती करणे कामाच्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे.**

**ठराव क्र.** ४३:-

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात रिलायन्स इन्फ्रा मार्फत स्वखर्चाने स्ट्रीट लाईट पोल बसविण्यात येऊन त्यांची देखभाल व दुरूस्ती त्यांच्यामार्फत केली जाते. सन २००७ ते २०१० या काळात रिलायन्स इन्फ्रा लि. यांनी झोपडपट्टी व ३.०० मीटर रुंदीपेक्षा कमी असलेल्या रस्त्यांवर स्ट्रीट लाईट पोल बसविण्याचे काम बंद केल्याने त्या दरम्यान महानगरपालिकेमार्फत स्वतः खर्च करून स्ट्रीट लाईट पोल बसविण्यात आले आहेत. तसेच चेना, काजूपाडा भागात फाऊंटन हॉटेल ते ठाणे मनपा जकात नाका पर्यंतच्या रस्त्यावर महानगरपालिकेमार्फत स्ट्रीट लाईट पोल बसविण्यात आलेले आहेत.

सदर भागात महावितरणामार्फत वीज पुरवठा केला जात आहे. तसेच एम.एम.आर.डी.ए. मार्फत बांधलेले व महानगरपालिकेकडे हस्तांरीत केलेले स्काय वॉक वरील विद्युत दिव्यांची देखभाल दुरूस्ती महानगरपालिकेमार्फत करण्यात येते. अशाप्रकारे विविध ठिकाणी महानगरपालिकेचे २०२७ पोल व २३६३ फिटींग व इतर साहित्य आहे. सदर पोलची देखभाल व दुरूस्ती कामाची मुदत दि.१०/०८/२०१४ पर्यंत आहे. सदर स्ट्रीट लाईट पोलची देखाभाल दुरूस्ती कामी सक्षम मान्यता घेऊन निविदा मागवून कार्यादेश देणे आवश्यक आहे. सदर कामासाठी विभागवार खालील प्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मिरारोड (पूर्व) व पेणकरपाडा परीसरातील स्ट्रीट लाईट पोल देखभाल व दुरूस्ती करणे. | रु.२१,४२,०३६/- |
| २ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील भाईंदर (प.) अण्णानगर, शास्त्रीनगर, नेहरूनगर, कोठार झोपडपट्टी, आंबेडकर नगर, भोलानगर, गणेश देवल नगर, जय अंबे नगर १ व २ इत्यादी ठिकाणचे स्ट्रीट लाईट पोल देखभाल व दुरूस्ती करणे (एकूण फिटींग-५०८) | रु.१८,२२,७०४/- |
| ३ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील चौक, पाली, उत्तन, मुर्धा, राई, मोर्वा, डोंगरी, केशवसृष्टी इत्यादी ठिकाणचे स्ट्रीट लाईट पोल देखभाल व दुरूस्ती करणे (एकूण फिटींग-६३८) | रु.२२,८९,१४४/- |
| ४ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील चेना, काजुपाडा इत्यादी ठिकाणचे स्ट्रीट लाईट पोल देखभाल व दुरूस्ती करणे. (एकूण फिटींग-६२०) | रु.२२,२४,५६०/- |
| | **एकूण** | **रु.८४,७८,४४४/-** |

(2)

वरील कामांच्या खर्चाची तरतुद सन २०१५-१६ च्या वार्षिक अर्थसंकल्पात **"विजबिलाचा खर्च (पथदिवे)"** या लेखाशिर्षकात रु.१८००.०० लक्ष इतकी तरतुद करण्यात आली असून सद्यस्थितीत रु.१७,३०,१३,०४०/- इतकी तरतूद शिल्लक आहे.

सदर स्ट्रीट लाईट पोल मे. रिलायन्स एनर्जी लि. यांच्याकडे देखभाल व दुरुस्तीसाठी देण्यात यावेत. तसेच आवश्यकता असल्यास सर्व पोल मे. रिलायन्स एनर्जी लि. कडून नव्याने बसवून घ्यावेत. तोपर्यंत नव्याने वार्षिक मुदतीच्या निविदा मागविण्यास व वरील अंदाजपत्रकांना प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- सौ. जयमाला पाटील** **अनुमोदक :- सौ. अनिता परमार**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
# मा. महासभा दि. ०४/०९/२०१५

**प्रकरण क्र. ७१ :-** **महानगरपालिका हद्दीतील हॉटेल/दुकानांची अग्निशमन परवाना फी व नुतनीकरण फी कमी करणेबाबत फेरविचार करुन निर्णय घेणे.**

**ठराव क्र.** ४५ :-

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात विविध आस्थापनांना उदा. हॉटेल, भोजनालय, उपहारगृह इत्यादींना अग्निशमन विभागाचा नाहरकत दाखला देण्यात येतो. सदर नाहरकत दाखला दरवर्षी अग्निशमन विभागाकडून नुतनीकरण करुन घ्यावयाचा असतो. मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध हॉटेल, भोजनालय, उपहारगृह इत्यादींना नविन नाहरकत दाखला देणे तथा सदर नाहरकत दाखल्याचे नुतनीकरण करणे याकरिता खालील प्रमाणे फी निर्धारित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | तपशील | नवीन नाहरकत दाखला फी | दाखला नुतनीकरण फी |
|---|---|---|---|
| १ | हॉटेल, भोजनालय, उपहारगृह इत्यादींचे क्षेत्रफळ २००० चौ. फुटपेक्षा कमी असल्यास | रु. १,२००/- | रु. १,२००/- |
| २ | हॉटेल, भोजनालय, उपहारगृह इत्यादींचे क्षेत्रफळ २००० चौ. फुटपेक्षा अधिक परंतु ४००० चौ. फुटापेक्षा कमी असल्यास | रु. १,८००/- | रु. १,८००/- |
| ३ | हॉटेल, भोजनालय, उपहारगृह इत्यादींचे क्षेत्रफळ ४००० चौ. फुटापेक्षा अधिक असल्यास | रु. ३,५००/- | रु. ३,५००/- |

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध हॉटेल, भोजनालय, उपहारगृह इत्यादींना नाहरकत दाखला देणेकामी दि. ०१/१०/२०१५ रोजीपासून वरिल दरानुसार फी ची आकारणी करण्यात यावी. तसेच मिरा भाईंदर शहरात सर्वधर्मिय उत्सवांसाठी मंडप परवानगी घेते वेळी अग्निशमन विभागामार्फत एन.ओ.सी. घेणे असते सदरसाठी परवानाशुल्क आकारण्यात येते ते फार मोठे आहे. तरी सदर परवाना शुल्क सर्वधर्मियांच्या मंडप परवानगीसाठी नाममात्र १००/- रुपये घेण्यात यावे व सदर परवानगी एका दिवसाच्या आत देण्यात यावी असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. राकेश शाह** **अनुमोदक :- श्री. प्रशांत केळुसकर**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

# मा. महासभा दि. ०४/०९/२०१५

(१)

**प्रकरण क्र. ७२ :-** **आ. क्र. १०२ (बगीचा) आरक्षणामधून विद्यमान इमारतींना वगळणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार कार्यवाही करणेबाबत.**

ठराव क्र.४६ :-

सदर विषया संदर्भात सर्व नागरिकांना, पदाधिकारी व संबंधितांना मा. महापौर, उपमहापौर, गटनेते यांना सर्वांना सोबत घेऊन माहिती घेण्यात यावी तद्नंतर विषय पुन्हा घेण्यात यावा असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. नरेंद्र मेहता** **अनुमोदक :- श्रीम. निलम ढवण**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | मेहता नरेंद्र लालचंद | १ | ध्रुवकिशोर पाटील | |
| २ | शरद केशव पाटील | २ | डिमेलो बर्नड अल्बर्ट | |
| ३ | पाटील रोहिदास शंकर | ३ | शिल्पा भावसार | |
| ४ | म्हात्रे कल्पना महेश | ४ | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | |
| ५ | भानुशाली वर्षा गिरीधर | ५ | प्रभात प्रकाश पाटील | |
| ६ | मीरादेवी रामलाल यादव | ६ | पाटील सुनिता कैलास | |
| ७ | कोठारी सुमन रमेश | ७ | झिनत रऊफ कुरेशी | |
| ८ | डॉ. नयना मनोज वसाणी | ८ | विराणी रेखा अनिल | |
| ९ | सिमा कमलेश शहा | ९ | पुजारी कांचना शेखर | |
| १० | जैन गिता भरत | १० | पिसाळ मनिषा नामदेव | |
| ११ | अरोरा दिपिका पंकज | ११ | डिसा मर्लिन मर्विन | |
| १२ | रावल भगवती जयशंकर | १२ | बगाजी शर्मिला विल्सन | |
| १३ | मेहता डिंपल विनोद | १३ | इनामदार जुबेर | निरंक |
| १४ | मेघना दिपक रावल | १४ | वेतोसकर राजेश शंकर | |
| १५ | शर्मा सुनिला सत्येंद्र | १५ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | |
| १६ | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | १६ | सुर्यकांत खंडोजी म्हात्रे | |
| १७ | सुजाता रविकांत शिंदे | १७ | सामंत प्रमोद जयराम | |
| १८ | सिंग मदन उदितनारायण | १८ | रकवी सुहास माधवराव | |
| १९ | कांगणे यशवंत ठकाजी | १९ | पांडे हंसुकुमार कमलकुमार | |
| २० | अनिल बाबुराव भोसले | २० | खण्डेलवाल सुरेश | |
| २१ | कासोदरीया अश्विन श्यामजी | २१ | डॉ. आसिफ शेख | |
| २२ | जैन दिनेश तेजराज | २२ | नरेश तुकाराम पाटील | |
| २३ | जैन रमेश धरमचंद | २३ | भोईर कमलेश यशवंत | |
| २४ | डॉ. राजेंद्र जैन | २४ | वंदना मंगेश पाटील | |
| २५ | निलम हरिश्चंद्र ढवण | | | |
| २६ | शुभांगी महिन कोटियन | | | |
| २७ | जयमाला किशोर पाटील | | | |
| २८ | परमार अनिता भरत | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| २९ | गावंड मंदाकिणी आत्माराम | | |
| ३० | संध्या प्रफुल्ल पाटील | | |
| ३१ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | | |
| ३२ | प्रविण मोरेश्वर पाटील | | |
| ३३ | ठाकुर अरविंद दत्ताराम | | |
| ३४ | शाह राकेश रतिशचंद्र | | |
| ३५ | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | | |
| ३६ | केळुसकर प्रशांत नारायण | | |
| ३७ | मुन्ना सिंग | | |
| ३८ | दिप्ती शेखर भट | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

# मा. महासभा दि. ०४/०९/२०१५

(१)

**प्रकरण क्र. ७३ :-** **मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील रहिवास तसेच वाणिज्य वापराच्या इमारतींना जास्तीत जास्त उंची अनुज्ञेय करणेबाबत.**

**ठराव क्र.८७:-**

मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) दि. १४/०५/१९९७ रोजी मंजूर झालेली असून दि. १५/०७/१९९७ पासून अंमलात आलेले आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना दि. २५/०८/२००० रोजी मंजूर झालेली असून दि. १५/१०/२००० पासून अंमलात आलेली आहे.

मंजूर विकास नियंत्रण नियमावलीतील तरतूदी नुसार प्रस्तावित इमारतीसमोरील रस्ता + पुढील बाजूचे सामासिक अंतर या परिमाणाच्या १.५० पट (दिडपट) इतके इमारतीची कमाल उंची अनुज्ञेय आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील रहिवास तथा वाणिज्य वापराच्या नियमीत इमारत प्रस्तावास ४५.०० मी. उंचीपर्यंत अग्निशमन विभागाकडून नाहरकत दाखला देण्यात येत असून मा. शासनातील अग्निशमन सेवा संचालनालय यांचेकडील पत्र क्र. मअसे/३२एफ/२०१३/६६१, दि. १४/०५/२०१३ मधील निर्देशानुसार शहरातील विशिष्ट गृहनिर्माण प्रकल्प जसे भाडेतत्वावरील गृहनिर्माण योजना, म्हाडा प्रकल्प या स्वरुपाच्या जास्तीचे चटईक्षेत्र निर्देशांक असलेल्या प्रकल्पास अटीशर्तीच्या अधिन राहुन ७०.०० मी. उंचीपर्यंत अग्निशमन विभागामार्फत परवानगी देण्यात येते. सद्यस्थितीत मिरा भाईंदर शहरात भाडेतत्वावरील गृहनिर्माण योजने अंतर्गत एकूण १३ प्रस्ताव व म्हाडा गृहनिर्माण योजने अंतर्गत एकूण ०२ प्रस्ताव प्रगतीपथावर आहेत.

मिरा भाईंदर महानगरपालिका शहराचे एकूण क्षेत्रफळ ७९.४० चौ.कि.मी. असून आजमितीस शहराची लोकसंख्या अंदाजे १२ लक्ष इतकी आहे. आता शिल्लक क्षेत्र नाविकास क्षेत्र / सी.आर.झेड. मध्ये येत असून सद्यस्थितीत रहिवासी क्षेत्र अत्यल्प उपलब्ध आहे. शहरातील लोकसंख्या झपाट्याने वाढत असून वाढत्या लोकसंख्येचा विचार करता भविष्यात शहरामध्ये नविन घरांची मागणी वाढणार असल्याचे गृहीत धरुन विकासक ७०.०० मी. पेक्षा जास्तीच्या उंचीच्या इमारतीसाठी परवानगी मिळणेकरिता पाठपुरावा करुन मागणी करित आहेत. भविष्यात मिरा भाईंदर महानगरपालिकेकडे पुर्नःविकासाखालील भूखंडाचे क्षेत्र व मागणी विचारात घेता उंच इमारतींचे प्रस्ताव मोठ्या प्रमाणात प्राप्त होवू शकतात.

मिरा भाईंदर महानगरपालिकेकडे सद्यस्थितीत कमाल ३९.०० मी. उंचीसाठीचे Fire Engine उपलब्ध असून ६२.०० मी. उंचीसाठी Fire Engine मागविणेबाबतची कार्यवाही अग्निशमन विभागामार्फत सुरु आहे.

विद्यमान प्रचलीत पध्दत विचारात घेता उंच इमारतींना बांधकाम परवानगी देतांना अनुज्ञेय करावयाच्या उंचीबाबत विशिष्ट पध्दत अवलंबिने जरुरीचे वाटते. जेणे करुन भुकंपप्रणव क्षेत्र तसेच जमिनीचा दर्जा विचारात घेता उंच इमारतीच्या स्थैर्यतेच्या दृष्टीने तसेच आग प्रतिबंधक यंत्रणा व प्रतिबंधात्मक उपायांबाबत सर्वतोपरी विचार करणेसाठी मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात ७०.०० मी. पेक्षा जास्त म्हणजेच कमाल ९०.०० मी. पर्यंत उंच इमारतींना परवानगी देणेकरिता खालीलप्रमाणे समिती (High rise committee) गठीत करणे आवश्यक आहे.

१) आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका - अध्यक्ष
२) शहर अभियंता, मिरा भाईंदर महानगरपालिका - सदस्य
३) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका - सदस्य
४) नगररचनाकार, मिरा भाईंदर महानगरपालिका - सदस्य
५) अग्निशमन अधिकारी, मिरा भाईंदर महानगरपालिका - सदस्य
६) सार्वजनिक बांधकाम विभागाकडील पॅनलवरील नियुक्त संरचना अभियंता - २ प्रतिनिधी - सदस्य

सदर समितीची कार्यपध्दती पुढीलप्रमाणे असेल.

(2)

७) कुठल्याही वापराचे ७०.०० मी. पेक्षा जास्त उंचीचे इमारतीचे विकास नियंत्रण नियमावली, भारतीय इमारत संहिता (National Building Code) व अग्निशमन नियमावलीप्रमाणे तांत्रिकदृष्ट्या सविस्तर चर्चा करुन निर्णय घेणे.

८) नोंदणीकृत संरचना अभियंता यांचे सल्ल्याने प्रस्तावांवर स्थैर्यतेबाबत आवश्यक असल्यास अतिरिक्त बाबी सुचविणे.

९) भुकंपप्रणव क्षेत्र विचारात घेवून संरचनेच्या स्थैर्यतेचे अनुषंगाने Design इत्यादी बाबत संबंधीत प्रकल्पाचे नियुक्त संरचना अभियंता यांचेकडुन आवश्यक ते प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणे.

१०)प्रस्ताव योग्य असल्यास शिफारस करणे अन्यथा त्रुटींची पुर्तता करणेबाबत सुचविणे.

११)मा. अध्यक्षयांच्या सहमतीने इतर बाबींवर सारासार विचार करणे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील ७०.०० मी. पेक्षा जास्तीच्या उंच इमारतींसाठी द्यावयाच्या परवानगीबाबत वरिलप्रमाणेची समिती गठीत करणे व बांधकाम परवानगी देणेबाबत निर्णय होणेसाठी हि महासभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. अनिल भोसले** **अनुमोदक :- श्री. जयंतीलाल पाटील**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | मेहता नरेंद्र लालचंद | १ | ध्रुवकिशोर पाटील | १. खण्डेलवाल सुरेश |
| २ | शरद केशव पाटील | २ | डिमेलो बर्नड अल्बर्ट | |
| ३ | पाटील रोहिदास शंकर | ३ | शिल्पा भावसार | |
| ४ | म्हात्रे कल्पना महेश | ४ | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | |
| ५ | भानुशाली वर्षा गिरीधर | ५ | प्रभात प्रकाश पाटील | |
| ६ | मीरादेवी रामलाल यादव | ६ | पाटील सुनिता कैलास | |
| ७ | कोठारी सुमन रमेश | ७ | झिनत रऊफ कुरेशी | |
| ८ | डॉ. नयना मनोज वसाणी | ८ | विराणी रेखा अनिल | |
| ९ | सिमा कमलेश शहा | ९ | पुजारी कांचना शेखर | |
| १० | जैन गिता भरत | १० | पिसाळ मनिषा नामदेव | |
| ११ | अरोरा दिपिका पंकज | ११ | डिसा मर्लिन मर्विन | |
| १२ | रावल भगवती जयशंकर | १२ | अनिता जयवंत पाटील | |
| १३ | मेहता डिंपल विनोद | १३ | बगाजी शर्मिला विल्सन | |
| १४ | मेघना दिपक रावल | १४ | इनामदार जुबेर | |
| १५ | शर्मा सुनिला सत्येंद्र | १५ | वेतोसकर राजेश शंकर | |
| १६ | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | १६ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | |
| १७ | सुजाता रविकांत शिंदे | १७ | सुर्यकांत खंडोजी म्हात्रे | |
| १८ | पाटील प्रेमनाथ गजानन | १८ | सामंत प्रमोद जयराम | |
| १९ | सिंग मदन उदितनारायण | १९ | रकवी सुहास माधवराव | |
| २० | कांगणे यशवंत ठकाजी | २० | पांडे हंसुकुमार कमलकुमार | |
| २१ | अनिल बाबुराव भोसले | २१ | डॉ. आसिफ शेख | |
| २२ | कासोदरीया अश्विन श्यामजी | २२ | नरेश तुकाराम पाटील | |
| २३ | जैन दिनेश तेजराज | २३ | भोईर कमलेश यशवंत | |
| २४ | जैन रमेश धरमचंद | २४ | वंदना मंगेश पाटील | |
| २५ | डॉ. राजेंद्र जैन | | | |
| २६ | निलम हरिश्चंद्र ढवण | | | |
| २७ | शुभांगी महिन कोटियन | | | |
| २८ | जयमाला किशोर पाटील | | | |
| २९ | परमार अनिता भरत | | | |
| ३० | गावंड मंदाकिणी आत्माराम | | | |

(३)

| | | | |
|---|---|---|---|
| ३१ | संध्या प्रफुल्ल पाटील | | |
| ३२ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | | |
| ३३ | प्रविण मोरेश्वर पाटील | | |
| ३४ | ठाकुर अरविंद दत्ताराम | | |
| ३५ | शाह राकेश रतिशचंद्र | | |
| ३६ | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | | |
| ३७ | केळुसकर प्रशांत नारायण | | |
| ३८ | मुन्ना सिंग | | |
| ३९ | दिप्ती शेखर भट | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. ०४/०९/२०१५

**प्रकरण क्र. ७४ :-** महानगरपालिका हद्दीतील शाळेची आरक्षणे जॉईंट वेंचर पध्दतीने विकसित करणेबाबत.

ठराव क्र. ५८ :-

सदर विषय हा विस्तारीत अहवालासह परत सादर करण्यात यावा असा ठराव मांडत आहे.

सुचक :- श्री. प्रशांत केळुसकर          अनुमोदक :- श्री. शरद पाटील

ठराव सर्वानुमते मंजूर

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
# मा. महासभा दि. ०४/०९/२०१५



**प्रकरण क्र. ७६ :-** **मिरा भाईंदर शहराच्या मंजूर विकास योजनेतील मौजे घोडबंदर सर्व्हे क्र. ८/१ब, १क या जागेपैकी १८ मी. रुंद विकास योजना रस्त्याने बाधीत क्षेत्राचे भुसंपादन करणेकरीता झालेल्या ठरावात फेरबदल करणेबाबत.**

**ठराव क्र.५० :-**

सदर विषयाचा गोषवारा मिरा भाईंदर महानगरपालिकेने दिला नसल्याने आम्हा सदस्यांना या विषयाची माहिती नाही. विषय आम्हाला समजले नाही. बैठकीच्या दिवशी सुध्दा प्रशासनाने गोषवारा दिला नाही त्यामुळे प्रशासनाने गोषवारा दिला नाही त्यामुळे प्रशासनाने गोषवारा पुढील महासभेत देऊन मा. महासभेने प्रस्ताव पुढील महासभेत घ्यावा असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदक :- श्री. जबेर इनामदार**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | ध्रुवकिशोर पाटील | १ | मेहता नरेंद्र लालचंद | |
| २ | डिमेलो बर्नड अल्बर्ट | २ | शरद केशव पाटील | |
| ३ | शिल्पा भावसार | ३ | पाटील रोहिदास शंकर | |
| ४ | सँन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | ४ | म्हात्रे कल्पना महेश | |
| ५ | प्रभात प्रकाश पाटील | ५ | भानुशाली वर्षा गिरीधर | |
| ६ | पाटील सुनिता कैलास | ६ | मीरादेवी रामलाल यादव | |
| ७ | झिनत रऊफ कुरेशी | ७ | कोठारी सुमन रमेश | |
| ८ | विराणी रेखा अनिल | ८ | डॉ. नयना मनोज वसाणी | |
| ९ | पुजारी कांचना शेखर | ९ | सिमा कमलेश शहा | |
| १० | पिसाळ मनिषा नामदेव | १० | जैन गिता भरत | |
| ११ | डिसा मर्लिन मर्विन | ११ | अरोरा दिपिका पंकज | |
| १२ | काझी रशीदा जमील | १२ | रावल भगवती जयशंकर | |
| १३ | बगाजी शर्मिला विल्सन | १३ | मेहता डिंपल विनोद | निरंक |
| १४ | इनामदार जुबेर | १४ | मेघना दिपक रावल | |
| १५ | वेतोसकर राजेश शंकर | १५ | शर्मा सुनिला सत्येंद्र | |
| १६ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | १६ | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | |
| १७ | सुर्यकांत खंडोजी म्हात्रे | १७ | सुजाता रविकांत शिंदे | |
| १८ | सामंत प्रमोद जयराम | १८ | पाटील प्रेमनाथ गजानन | |
| १९ | रकवी सुहास माधवराव | १९ | सिंग मदन उदितनारायण | |
| २० | पांडे हंसुकुमार कमलकुमार | २० | कांगणे यशवंत ठकाजी | |
| २१ | खण्डेलवाल सुरेश | २१ | अनिल बाबुराव भोसले | |
| २२ | डॉ. आसिफ गुलाब शेख | २२ | कासोदरीया अश्विन श्यामजी | |
| २३ | नरेश तुकाराम पाटील | २३ | जैन दिनेश तेजराज | |
| २४ | भोईर कमलेश यशवंत | २४ | जैन रमेश धरमचंद | |
| २५ | वंदना मंगेश पाटील | २५ | डॉ. राजेंद्र जैन | |
| २६ | निलम हरिश्चंद्र ढवण | २६ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | |

(२)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २७ | शुभांगी महिन कोटियन | २७ | शाह राकेश रतिशचंद्र | |
| २८ | जयमाला किशोर पाटील | २८ | केळुसकर प्रशांत नारायण | |
| २९ | परमार अनिता भरत | २९ | मुन्ना सिंग | |
| ३० | गावंड मंदाकिणी आत्माराम | ३० | दिप्ती शेखर भट | |
| ३१ | संध्या प्रफुल्ल पाटील | | | |
| ३२ | प्रविण मोरेश्वर पाटील | | | |
| ३३ | ठाकुर अरविंद दत्ताराम | | | |
| ३४ | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. ०४/०९/२०१५

**प्रकरण क्र. ७७ :-** **सन्मा. सदस्या डॉ. नयना वसाणी यांचा दिनांक २६/०८/२०१५ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. --- मिरारोड (पू.) प्रभाग समिती क्र. ५ येथील बाह्यरुग्ण विभागाअंतर्गत निवासी सदनिकेमध्ये सुरु असलेल्या क्षयरोग दवाखाना अन्यत्र स्थलांतरीत करणेबाबत.**

**ठराव क्र.** ५१ :-

मिरा रोड (पूर्व) येथील प्रभाग समिती क्र. ५ अंतर्गत चालु असलेला बाहयरुग्ण दवाखाना आणि RNTCP (Revised National Tuberculosis Programme) अंतर्गत चालणारे क्षयरोग निवारण दवाखाना (DOT Clinic) हा एकाच इमारतीमध्ये, वास्तविकतः एकाच सदनिकेमध्ये चालु आहे. ही सदनिका निवासी इमारतीच्या तळमजल्यावर असुन त्याच्यावरील २ ते ५ मजल्यावर सदनिकांचा निवासी वापर होत आहे. तसेच त्याच्या बाजुला रसाज इंटरनॅशनल स्कूल ही शाळा आहे. क्षयरोग हा संक्रमणजन्य रोग असुन आपल्याकडे येणाऱ्या रुग्णांमध्ये सहसंक्रमण (HIV Aids, Hepatitis B, C) असल्याची शक्यता नाकारता येत नाही. जे सामाजिक आरोग्याच्या दृष्टीने तसेच बाहयरुग्ण विभागामध्ये एकच प्रतिक्षा कक्ष असुन क्षय हा थुंकी, खोकला या माध्यमाने संक्रमित होत असताना अन्य बालरूग्ण, गर्भवती महिला ज्यांची रोग प्रतिकारक शक्ती कमी असुन त्यांच्यामध्ये सहसंक्रमण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. हा क्षयरोग दवाखाना फक्त एका खोलीत रक्त तपासणी विभागाबरोबर चालविण्यात येतो. व तेथे हवा येण्या जाण्याची सोयही व्यवस्थित नसल्याने त्या विभागातील कर्मचारी व अन्य कर्मचारी यांना ही क्षयरोग संक्रमण होवू शकते.

उपरोक्त विषय हा आरोग्य कर्मचारी, येणारे अन्य रूग्ण आणि सामाजिक स्वास्थ्याशी निगडीत असल्याने हा क्षयरोग दवाखाना मिरा रोड (पूर्व) पुनमसागर येथे असलेल्या भारतरत्न इंदिरा गांधी रुगणालय येथे स्थालांतरीत करावा व जेथे HIV Aids चे उपचार सध्या सुरू आहेत. त्या इमारतीमध्ये राष्ट्रीय क्षयरोग निर्मुलन कार्यक्रम अंतर्गत सुचविलेल्या रचने आधारीत क्षयरोग रुग्ण विभागाचे निर्माण करून त्यास वेगळे प्रवेशद्वार द्यावे व मिरा भाईंदर शहराच्या मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अंतर्गत जेथे जेथे (DOT Clinic) असतील ते नियमाप्रमाणे रचना करुन स्थलांतरीत करावे जेणेकरून संक्रमक रोग विभाग हा वेगळा असुन सामाजीक स्वास्थ्यास हानिकारक न राहता रुग्णांना तसेच कर्मचाऱ्यांना सोयीस्कार होईल, असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- डॉ. नयना वसाणी** **अनुमोदक :- श्रीम. सिमा शाह**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगपालिका**

# मिरा-भाईदर महानगरपालिका
## मा.महासभा दि. ०४/०९/२०१५

॥ ज अन्वये प्रस्ताव॥

**प्रकरण क्र. ७९ आरक्षण क्र. ११०, भाईदर (पूर्व) येथील गुरुद्वारा शेजारच्या मैदानाजवळ कविता बिल्डींगच्या समोरच्या परिसराजवळील मोकळ्या जागेमध्ये तात्पुरत्या स्वरुपाची पार्किंगची सोय करणेबाबत...**

ठराव क्र. ५३

भाईदर (पूर्व) आरक्षण क्र. ११०, नवघर रोड परिसरांमध्ये पुर्वी कुठलेही नियोजन न करता बांधलेल्या इमारतीमुळे कुठल्याही इमारती खाली गाडी पार्किंगची सोय नाही. सध्या गाड्यांचे प्रमाणही वाढलेले असल्याने या गाड्या रस्त्याच्या बाजूला व आतल्या गल्लींमध्ये उभ्या केल्या जातात. परिणामी एखादी ॲम्ब्युलन्स किंवा दुसरी गाडी, फायर ब्रिगेडच्या गाड्या आतील रस्त्यावर नेऊ शकत नाही. त्यामुळे नागरिकांना विविध अडचणींना सामोरे जावे लागते.

वरील सर्व गोष्टींचा गांभीर्यपुर्वक विचार करता आतील बाजूस तात्पुरत्या स्वरुपाची पे ॲन्ड पार्क ची व्यवस्था करणे फार गरजेचे आहे. यासाठी गुरुद्वारा शेजारील मैदान किंवा सरस्वतीनगर पुढील कविता बिल्डींग समोरील परिसरामध्ये तात्पुरत्या स्वरुपात पे ॲन्ड पार्क ची व्यवस्था करण्यात यावी व सुरक्षा रक्षकाची नेमणूक करावी. असा ठराव मी मांडत आहे.

Dhawan

(निलम हरिश्चंद्र ढवण)

सुचक

श्री. अरविंद शेट्टी

अनुमोदक

ठराव सर्वानुमते / बहुमताने मंजूर

महापौर

मिरा-भाईदर महानगरपालिका

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २५ | डॉ. राजेंद्र जैन | २५ | प्रविण मोरेश्वर पाटील | |
| २६ | शाह राकेश रतिशचंद्र | २६ | ठाकुर अरविंद दत्ताराम | |
| २७ | केळुसकर प्रशांत नारायण | २७ | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | |
| २८ | मुन्ना सिंग | | | |
| २९ | दिप्ती शेखर भट | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगपालिका**

| | | | |
|---|---|---|---|
| २९ | परमार अनिता भरत | | |
| ३० | गावंड मंदाकिणी आत्माराम | | |
| ३१ | संध्या प्रफुल्ल पाटील | | |
| ३२ | प्रविण मोरेश्वर पाटील | | |
| ३३ | ठाकुर अरविंद दत्ताराम | | |
| ३४ | शाह राकेश रतिशचंद्र | | |
| ३५ | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | | |
| ३६ | केळुसकर प्रशांत नारायण | | |
| ३७ | मुन्ना सिंग | | |
| ३८ | दिप्ती शेखर भट | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. ०४/०९/२०१५

(२)

**प्रकरण क्र. ८२ :-** **सन्मा. सदस्य श्री. ध्रुवकिशोर पाटील यांचा दिनांक २७/०८/२०१५ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. --- सन्मा. पंतप्रधान यांनी सुरु केलेल्या "डिजीटल इंडिया वीक" मिरा भाईंदर महापालिकेचा कारभार पेपरलेस करणेबाबत.**

**ठराव क्र.५६ :-**

सदर विषयाबाबत सविस्तर लेखी माहिती सादर करुन सदर विषय प्रशासनामार्फत सादर करण्यात यावा असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत केळुसकर** **अनुमोदक :- श्री. शरद पाटील**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | मेहता नरेंद्र लालचंद | १ | ध्रुवकिशोर पाटील | निरंक |
| २ | शरद केशव पाटील | २ | डिमेलो बर्नड अल्बर्ट | |
| ३ | पाटील रोहिदास शंकर | ३ | शिल्पा भावसार | |
| ४ | म्हात्रे कल्पना महेश | ४ | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | |
| ५ | भानुशाली वर्षा गिरीधर | ५ | दक्षता राजेंद्र ठाकुर | |
| ६ | मीरादेवी रामलाल यादव | ६ | पाटील वंदना विकास | |
| ७ | कोठारी सुमन रमेश | ७ | पाटील सुनिता कैलास | |
| ८ | डॉ. नयना मनोज वसाणी | ८ | पुजारी कांचना शेखर | |
| ९ | सिमा कमलेश शहा | ९ | डिसा मर्लिन मर्विन | |
| १० | जैन गिता भरत | १० | वंदना रामदास चक्रे | |
| ११ | अरोरा दिपिका पंकज | ११ | इनामदार जुबेर | |
| १२ | रावल भगवती जयशंकर | १२ | वेतोसकर राजेश शंकर | |
| १३ | मेहता डिंपल विनोद | १३ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | |
| १४ | मेघना दिपक रावल | १४ | सुर्यकांत खंडोजी म्हात्रे | |
| १५ | शर्मा सुनिला सत्येंद्र | १५ | सामंत प्रमोद जयराम | |
| १६ | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | १६ | खण्डेलवाल सुरेश | |
| १७ | सुजाता रविकांत शिंदे | १७ | डॉ. आसिफ गुलाब शेख | |
| १८ | पाटील प्रेमनाथ गजानन | १८ | भोईर कमलेश यशवंत | |
| १९ | सिंग मदन उदितनारायण | १९ | अशोक तिवारी | |
| २० | कांगणे यशवंत ठकाजी | | | |
| २१ | अनिल बाबुराव भोसले | | | |
| २२ | कासोदरीया अश्विन श्यामजी | | | |
| २३ | जैन दिनेश तेजराज | | | |
| २४ | जैन रमेश धरमचंद | | | |
| २५ | डॉ. राजेंद्र जैन | | | |
| २६ | निलम हरिश्चंद्र ढवण | | | |
| २७ | शुभांगी महिन कोटियन | | | |
| २८ | जयमाला किशोर पाटील | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| २९ | परमार अनिता भरत | | |
| ३० | गावंड मंदाकिणी आत्माराम | | |
| ३१ | संध्या प्रफुल्ल पाटील | | |
| ३२ | प्रविण मोरेश्वर पाटील | | |
| ३३ | ठाकुर अरविंद दत्ताराम | | |
| ३४ | शाह राकेश रतिशचंद्र | | |
| ३५ | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | | |
| ३६ | केळुसकर प्रशांत नारायण | | |
| ३७ | मुन्ना सिंग | | |
| ३८ | दिप्ती शेखर भट | | |

(2)

**ठराव बहुमताने मंजूर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका



# मा. महासभा दि. ०४/०९/२०१५

| २२ | भाईंदर (पुर्व) शिवशक्ती नगर संत निरकारी आश्रमाच्या डी.पी. रस्त्यालगत येथे शौचालयाचे बांधकाम करणे. | रु.१५,००,०००/- |
| २३ | भाईंदर (पुर्व) शिवशक्ती नगर येथील जय अंबे चाळ येथे शौचालयाचे बांधकाम करणे. | रु.२५,००,०००/- |
| २४ | भाईंदर (पुर्व) आर.एन.पी. पार्क येथील बंगा संगा (नारायण नगर झोपडपट्टी) येथे शौचालयाचे बांधकाम करणे. | रु.१५,००,०००/- |
| २५ | भाईंदर (पुर्व) पानटेकडी स्मशानभूमी येथे शौचालयाचे बांधकाम करणे. | रु.१५,००,०००/- |
| २६ | रा.म.क्र. ०८ जवळील घोडबंदर मॉडर्न कंपनी झोपडपट्टी जवळ शौचालयाचे बांधकाम करणे. | रु.१५,००,०००/- |
| २७ | प्रभाग क्र.३१ बाळासाहेब ठाकरे मैदानाजवळ शौचालय बांधणे. | रु.२५,००,०००/- |
| २८ | हटकेश १५ नं. बस स्टॉप जवळ शौचालय बांधणे. | रु.२५,००,०००/- |
| २९ | जी.सी.सी. क्लब नवीन बिल्डींग समोर हटकेश येथे शौचालय बांधणे. | रु.२५,००,०००/- |
| ३० | एस.के. स्टोन समोरील पेट्रोल पंपच्या बाजूला सुंदर दर्शन जवळ शौचालय बांधणे. | रु.२५,००,०००/- |
| ३१ | हटकेश झंकार फॅक्ट्री च्या बाजूला शौचालय बांधणे. | रु.२५,००,०००/- |
| ३२ | सिल्वर पार्क सिग्नल जवळ शौचालय बांधणे. | रु.२५,००,०००/- |
| ३३ | सृष्टी पोलिस चौकीच्या बाजूला शौचालय बांधणे. | रु.२५,००,०००/- |
| ३४ | एम.आय.डी.सी. हायवे येथे शौचालय बांधणे. | रु.२५,००,०००/- |
| ३५ | फाऊंटन हॉटेल समोर शौचालय बांधणे. | रु.२५,००,०००/- |
| ३६ | भाईंदर (पुर्व) नवघर स्मशानभूमी मागे शौचालय बांधणे. | रु.२५,००,०००/- |
| ३७ | भाईंदर (पुर्व) इंदिरानगर येथे महिलासाठी शौचालय बांधणे. | रु.२५,००,०००/- |
| ३८ | भाईंदर (प.) जय बजरंग नगर येथे शौचालय बांधणे. | रु.५०,००,०००/- |
| ३९ | भाईंदर (प.) आनंद नगर येथे शौचालय बांधणे. | रु.५०,००,०००/- |
| ४० | भाईंदर (प.) क्रांती नगर येथे शौचालय बांधणे. | रु.५०,००,०००/- |
| ४१ | मुर्धा ब्रम्हदेव नगरच्या शेवटी शौचालय बांधणे. | रु.२५,००,०००/- |
| ४२ | मुर्धा खाडी धनराज माच्छी यांच्या घराजवळ शौचालय बांधणे. | रु.२५,००,०००/- |
| ४३ | मुर्धा बस स्टॉप मागे शौचालय बांधणे. | रु.२५,००,०००/- |
| ४४ | मुर्धा शिवप्रसाद आगर येथे शौचालय बांधणे. | रु.२५,००,०००/- |
| ४५ | भाईंदर (प.) नाझरेथ आागर झोपडपट्टी येथे शौचालय बांधणे. | रु.२५,००,०००/- |
| | **एकुण** | **रु.११,६५,००,०००/-** |

वरील सर्व शौचालयाचा एकुण खर्च रु.११,६५,००,०००/- इतका खर्च येणार आहे.
सार्वजनिक शौचालय बांधण्यासाठी केंद्र व राज्य शासन खालील प्रमाणे अनुदान देणार आहेत.

| | | |
|---|---|---|
| **केंद्र शासन अनुदान -** | **४०% -** | **रु.४,६६,००,०००/-** |
| **राज्य शासन अनुदान -** | **१०% -** | **रु.१,१६,५०,०००/-** |
| **१४ वा वित्त आयोग प्राप्त निधी मधून** | **प्रती सिट्स रु.२५,०००/- X ९३२ सिट्स** | **रु.२,३३,००,०००/-** |
| | **एकुण** | **रु.८,१५,५०,०००/-** |

उर्वरित रु.१,८४,५०,०००/- इतकी रक्कम आवश्यक असून "शहर स्वच्छता आराखडा" या लेखाशिर्षकामधून रक्कम रु.९०,००,०००/- व अन्य अखर्चित लेखाशिर्षामधून वर्ग करणेस मान्यता देण्यात येत आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेने शौचालये, दैनंदिन साफसफाई, निगा व देखभालीसाठी रु. २०,०००/- प्रति शौचालय प्रति महिना दराने खाजगी संस्थांना कामे दिली आहेत. सदर संस्था समाधानकारक काम करीत नसल्यास अशा संस्थांकडून कामे रद्द करुन इतर संस्थांना मंजूर दराने कामे देण्यात यावीत. सर्व शौचालयाचे विजबील, पाणीबील व दुरुस्ती महानगरपालिका निधीतून करावी यासाठी अर्थसंकल्पात आवश्यक तरतुद करावी.

तरी, वरील प्रमाणे येणाऱ्या खर्चास व अनुषंगीक सर्व कार्यवाही करणेस मा. महासभेची प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे. तसेच आवश्यक कार्यवाही व अंमलबजावणी करण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना देण्यात येत आहेत. वरील कामांच्या निविदा तातडीने मागविण्यात याव्यात. सदरकामी अनुदान व्यतिरिक्त खर्च महानगरपालिका निधीतून करावा.

**सुचक :- श्री. नरेंद्र मेहता** **अनुमोदक :- श्री. शरद पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा-भाईंदर महानगरपालिका
## मा. विशेष महासभा दि.१५/१०/२०१५

**प्रकरण क्रमांक ( १०३ ) :-** छत्रपती शिवाजी महाराज मार्ग रुंदीकरण, सुशोभिकरण करणे कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे

**ठराव क्र. (७३) :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेत राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ छत्रपती शिवाजी महाराज पूतळा ते स्वातंत्रवीर सावरकर चौक (गोल्डन नेस्ट जंक्शन) पर्यतचा छत्रपती शिवाजी महाराज पथ ४५.०० मीटर रुंदीचा दर्शविण्यात आलेला आहे. सदर रस्त्याचे रुंदीकरणे, दोन्ही बाजूस नाले व दुभाजक बांधण्याचे काम २००५ मध्ये पूर्ण झालेले असून सदर रस्त्याचा तीन वर्षाचा सुरक्षा कालावधी संपलेला आहे. सदर रस्ता हा नाल्यासहीत ३९.०० मीटर रुंदीचा तयार केलेला असून नाल्यालगत दोन्ही बाजूस विविध यंत्रणेच्या केबल्स, जलवाहिनी टाकण्यासाठी ३.०० मीटर रुंदीचा सर्व्हीस रस्ता ठेवलेला आहे. सद्यस्थितीत सदर रस्त्यावर प्रचंड प्रमाणात वाहतूकीचा ताण पडत असून रस्त्याची रुंदी कमी पडत आहे. नाल्याच्या स्लॅब ची लेव्हल खाली घेऊन व उर्वरीत ३.०० मीटर जागेसह रुंदीकरण करणे तसेच संपूर्ण रस्त्याचे सुशोभिकरण करणे इ. कामे करणे आवश्यक असल्याने मा. महासभा दि.११/१२/२०१३ ठराव क्र. ७२ अन्वये सदरील रस्ता सुशोभिकरण करण्यासाठी आराखडा व सविस्तर प्रकल्प तयार करणेकरीता अनुभवी सल्लागार नेमण्यास प्रशासकिय व आर्थिक मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानूसार मे. के.के. टेक्नो ट्रेड या सल्लागाराची नेमणूक करण्यात आली. मे. के.के. टेक्नो ट्रेड या सल्लागाराने सदरील कामाचे सविस्तर आराखडे व अंदाजपत्रक तयार करुन खालीलप्रमाणे सादर केलेले आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | | कामाची लांबी | कामाचा अंदाजित खर्च |
|---|---|---|---|---|
| १ | Option-1 | मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील छत्रपती शिवाजी महाराज पथ सुशोभिकरण करणे. | ३७४०.०० मी. | रु.१४,९७,७२,०६०/- |
| २ | Option-2 | मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील छत्रपती शिवाजी महाराज पथ सुशोभिकरण करणे. | ७८५.०० मी. | रु.३,५६,५५,३७५/- |

सदरील सर्व्हीस रस्त्याची रुंदी ३.०० मी. एवढी आहे. सदरील सर्व्हीस रस्त्यामध्ये यापूर्वी माती भरावाचेच काम करण्यात आले होते. प्रस्तावित कामामध्ये सर्व्हीस रस्त्याचे खडीकरण, डांबरीकरण करून बांधकाम करणे तसेच सर्व्हीस रस्त्यालगत फुटपाथच्या स्लॅबची लेव्हल खाली घेऊन रस्त्याचे रुंदीकरण करणे इ. कामाचा समावेश आहे.

मा. महासभा दि.२३/०३/२०१५ ठराव क्र. ८१ अन्वये छत्रपती शिवाजी महाराज मार्गावर (काशिमिरा रोड) उन्नत मार्ग व अंडरपास बांधणे कामासाठी रु.३८०.९१ कोटी रक्कमेचा सुधारीत अंदाजपत्रकास मंजूरी दिलेली आहे. सदरील कामामध्ये १) भाईंदर (पूर्व) भागातील वाहनांना जाण्यासाठी वीर सावरकर चौक (गोल्डन नेस्ट सर्कल) व दिपक हॉस्पीटल जंक्शन येथे उन्नत मार्ग (फ्लाय ओव्हर ब्रीज) बांधणे २) सिल्वहर पार्क जंक्शन, हटकेश जंक्शन व प्लेझंट पार्क जंक्शन येथे उन्नत मार्ग (फ्लाय ओव्हर ब्रीज) बांधणे ३) एस.के. स्टोन जंक्शन, कनकिया जंक्शन व शिवार उद्यान जंक्शन (एन.एच. हायस्कूल रस्ता व सरदार

पटेल रस्ता) या ठिकाणी एक उन्नत मार्ग (फ्लाय ओव्हर ब्रीज) बांधणे. ४) काशिमिरा नाका येथे पादचारी पुल बांधणे कामांचा समावेश आहे. सदरील उन्नत मार्गांच्या दोन्ही बाजूस असलेल्या फुटपाथवरील स्लॅबची लेव्हल खाली घेऊन सर्व्हीस रस्त्याचे रुंदीकरण करणे कामाचा अंर्तभाव केलेला आहे.

वरील प्रमाणे मे. के.के. टेक्नो ट्रेड यांनी तयार करण्यात आलेल्या Option-1 मधील अंदाजपत्रकात ३७४०.०० मी. लांबी घेऊन **रु. १४,९७,७२,०६०/-** रक्कमेचे अंदाजपत्रक तयार केलेले असून Option-2 नूसार सर्व्हीस रस्त्याची लांबी ७८५.०० मी. घेऊन (उन्नत मार्गामधील दोन्ही बाजूच्या सर्व्हीस रस्त्यांची लांबी वगळून) **रु.३,५६,५५,३७५/-** रक्कमेचे अंदाजपत्रक तयार केलेले आहे.

सदरील नियोजित उन्नत मार्ग बांधण्याच्या कामास एकूण रु.३८०.९१ कोटी खर्च येणार असून सदरील काम खर्च उभारणी करून टप्प्या टप्प्याने पूर्ण करावयाचे आहे. प्रस्तावित काम सद्यस्थितीत प्रलंबित असून सदरील काम पूर्ण होण्यास बराच अवधी लागणार आहे व सदरील उन्नत मार्गाचे काम पूर्ण होण्याचा कालावधी अद्याप निश्चित नाही. तथापी उन्नत मार्ग बांधताना त्याच्या शेजारील सर्व्हीस रस्ते व नाला खाली करून रस्ता रुंदीकरण करता येईल. प्रथम टप्प्यात Option-2 नूसार काम केल्यास रस्ता रुंद होऊन वाहतूक सुरळीत होऊ शकेल.

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील छत्रपती शिवाजी महाराज पथ सुशोभिकरण करणे कामी सन २०१५-१६ या वर्षाच्या अर्थसंकल्पात "श्री. छत्रपती शिवाजी महाराज रोड रुंदीकरण/ सुशोभिकरण" या लेखाशिर्षकात रु. ७०० लक्ष एवढी तरतूद केलेली असून रु. ७०० लक्ष एवढी तरतूद शिल्लक आहे. तरी वरील प्रमाणे प्रस्तावित रु.३,५६,५५,३७५/- रक्कमेच्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :-** श्री. नरेंद्र मेहता

**अनुमोदन :-** श्री. प्रशांत दळवी

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**पिठासन अधिकारी**

PC-2/15-16/DK/MT-8

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मा.महासभा दि. १५/१०/२०१५

**प्रकरण क्र.१०४ - मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील आरक्षण क्र. २२१, (आदरणीय बाळासाहेब ठाकरे उद्यान) इंद्रलोक प्रभाग क्र. ३१ भाईंदर पूर्व येथे लॉन लावुन सुशोभिकरण (Landscaping) करणेकामी मंजुरी मिळणेबाबत.**

**ठराव क्र.७८**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील आरक्षण 221, इंद्रलोक प्रभाग क्र. 31 भाईंदर पूर्व येथे असून सदर परिसरामध्ये मोठया प्रमाणात नविन गृहसंकुले तयार झाल्याने लोकसंख्या मोठया प्रमाणात वाढलेली आहे. या परिसरामध्ये एवढया मोठया क्षेत्रफळाचे दुसरे आरक्षण नसल्यामुळे आरक्षण क्र. 221 विकसीत करण्यात यावे. याकरीता, सदर आरक्षणाचे क्षेत्रफळ मिळणेबाबत मा. शहर अभियंता, सार्व. बांधकाम विभाग यांना कळविले असता सार्व. बांधकाम विभाग मा.कार्यकारी अभियंता, सार्व. बांधकाम विभाग यांचेकडून सरासरी 141 मीटर लांबी व 138.50 मीटर रुंदी या प्रमाणे एकुण 19528.50 चौ.मी. एवढे क्षेत्रफळ दिलेले आहे.

सदर ठिकाणी खालील तक्त्यात नमुद प्रमाणे लॉन लावल्यास मैदान खेळण्यायोग्य होवून सौंदर्यीकरणात वाढ होण्यास मदत होणार आहे.

| Sr. .No. | Items | Unit | Approval Rate | Total Amount |
|---|---|---|---|---|
| 1. | Preparing Lawn (30) cm. depth) :- Excavating the ground to a required depth of 30 cms, removing & conveying unwanted stuff to a required distance as directed. Filling fresh garden soil/silt & manure in excavated area in 3:1 proportion to a height of 30 cms, Mixing garden soil and manure thoroughly well, leveling watering on previous night. Planting required variety of lawn grass as directed and maintaining till well established by watering weeding, clipping, rolling, etc complete. | 18968.50 sq. mtr | Rs. 650/- sq. mtr | Rs. 1,23,29,525/- |
| 2. | Preparing flower Bed :- Excavating the ground to a required depth of 30 cms, removing & conveying unwanted stuff to a required distance as directed. Filling fresh garden soil/silt & manure in excavated area in 3:1 proportion to a height of 30 cms, Mixing garden soil and manure thoroughly well, leveling watering on previous night. Planting seedling of required annuals 25 cms. Apart Maintaining till well established by watering weeding, Stirring replacing of casualties etc, complete. | 560 sq. mtr | Rs. 638/- sq. mtr | Rs. 3,57,280/- |
| | Total | | | Rs.1,26,86,805/- |

ई-टेडरींग On-line प्रणालीद्वारे तसेच जाहिर वृत्तपत्रांत प्रसिध्दी देवुन **वार्षिक निविदा** मागविण्यात आल्या होत्या. सदर वार्षिक निविदा स्विकारण्यास मा.आयुक्त सो., यांनी **दि. 06/06/2015 रोजी मंजुरी** दिलेली सदर निविदेस **मा. स्थायी समिती सभा ठराव क्र.42 दि.17/06/2015** अन्वये **मान्यता** दिलेली असुन त्यानुसार **मे. गणेशकृपा ट्रांन्सपोर्ट** यांच्या समवेत करारनामा करून **वार्षिक कार्यादेश** देण्यात आलेला आहे.

**सन 2015-16** या वर्षाच्या अर्थसंकल्पात **"उद्याने /दुभाजक सुशोभिकरण करणे"** या शिर्षाखाली **रु. 4,50,00,000/-** (रु. चार कोटी पन्नास लाख मात्र) रक्कमेची तरतुद करण्यात आलेली आहे.

तरी उपरोक्त नमुद ठिकाणी लॉन लावून सुशोभिकरण (Landscaping) करणेकामी अंदाजीत एकुण **रु. 1,26,86,805/-/-** (रु. एक कोटी सव्विस लाख श्याऐंशी हजार आठशे पाच फक्त) खर्च अपेक्षित आहे. याकामी

मागविण्यात आलेल्या वार्षिक निविदेस मा.स्थायी समितीने मंजुरी दिलेली असून **मे. गणेशकृपा ट्रांन्सपोर्ट** यांना दरमंजुरी बाबत **वार्षीक कार्यादेश** देण्यात आलेला आहे. त्यानुसार **आरक्षण 221, (आदरणीय बाळासाहेब ठाकरे उद्यान) इंद्रलोक प्रभाग क्र. 31 भाईंदर (पु.)** येथे लॉन लावून सुशोभिकरण (Landscaping) **करणेकामी वार्षिक मंजुर दराने कार्यादेश देणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास ही महासभा सर्वानुमते आर्थिक व प्रशासकिय मान्यता देत आहे.**

सुचक - श्री. नरेंद्र मेहता

अनुमोदक- श्री. हरिश्चंद्र आमगावकर

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १५/१०/२०१५

**प्रकरण क्र. १०५ :- महानगरपालिकेतील सामान्य प्रशासन, आरोग्य विभाग, अग्निशमन विभाग, रुग्णवाहीका, शववाहिनी व इतर वाहनांवार कंत्राटी पध्दतीवरील (ठेक्यावरील) वाहनचालक पुरवठा करणेबाबत वार्षिक निविदा मागविणेस आर्थिक व प्रशासकिय मंजुरी मिळणेबाबत.**

**ठराव क्र.** ७५

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मालकीची एकुण ६५ वाहने असुन सदर वाहने आवश्यकतेनुसार विविध विभागात उदा.अग्नीशमन, पाणीपुरवठा, आरोग्य, रुग्णवाहिका, शववाहिनी, फिरता दवाखाना, इ. वाहनांवर स्थायी वाहनचालक याची संख्या अपुरी असल्याने ठेका पध्दतीने वाहन चालक पुरवठा करणे आवश्यक आहे. सदर वाहनावर मनपाकडुन आवश्यकतेनुसार वार्षिक ठेका पध्दतीने वाहनचालक /ऑपरेटर यांचा पुरवठा करण्यात येतो.

सन १०१४-१५ या आर्थिक वर्षात सदर कामी निविदा मागविण्यात आल्या असुन सदर ठेक्याची मुदत दि.१५/९/२०१५ रोजी संपत आहे. मुदती पुर्व निविदा प्रक्रिया पुर्ण करुन नविन ठेकेदारास कार्यादेश देणे आवश्यक आहे. सन २०१५-१६ या वर्षात अंदाजपत्रकिय तरतुदीत वाहन चालक पुरवठा करणे कामी खालील प्रमाणे तरतुद करण्यात आलेली आहे.

| अ.क्र | लेखाशिर्ष | सन २०१५-१६ करीता उपलब्ध तरतुद |
|---|---|---|
| १. | अस्थायी अस्थापना ठेका वाहनचालक (सा.प्र/कर/अग्नीशमन,आरोग्य व इतर) | ७५,००,०००/- |
| २. | अग्नीशमन अस्थायी अस्थापना | ७५,००,०००/- |
| | शिल्लक तरतुद | ८५,००,०००/- |

तरी मनपाच्या वाहनांवर, अत्यावश्यक सेवा व इतर विभागात आवश्यकतेनुसार कंत्राटी (ठेका) पद्धतीवरील वाहनचालक/ऑपरेटर पुरवठा करणे तसेच परिवहन विभागास बसेस चालविण्यासाठी बस चालक (H.P.M.V. लायसन्स सहित, आर.टी.ओ. यांचेकडील बॅच, प्राप्त करुन घेतलेले) बस वाहक, तिकीट तपासनीस व प्रवर्तक पुरवठा करणेकामी वर्तमानपत्रात व on-line निविदा सुचना प्रसिद्ध करून संबंधितांकडुन निविदा मागविणेच्या प्रस्तावास ही सभा आर्थिक व प्रशासकिय मंजुरी देत असुन सदरची नविन निविदा प्रक्रीया त्वरीत पुर्ण करुन संबधितास कार्यादेश देण्यांत यावे सदर कामी होणारा कालावधी लक्षात घेता मागील ठेकेदारास ३० दिवसाकरीता मुदतवाढ देण्यात येत असून मागील ठेकेदारास देय असलेली रक्कम अदा करणेपूर्वी संबधित ठेकेदाराकडुन शासकिय कर / निमशासकिय कर (PF, ESI, PT) व इतर देय रक्कमेचा पूर्ण भरणा करुन घेणेत यावा तद्नंतरच संबधित ठेकेदाराची देय रक्कम अदा करावी असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :- श्री. नरेंद्र मेहता    अनुमोदक :- श्रीम. डिम्पल शाह

**ठराव सर्वानुमते मंजुर**
**ठराव वाचुन कायम करण्यात आला.**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(1)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा.महासभा दि. १५/१०/२०१५

**प्रकरण क्र (१०६) - मिरा भाईंदर शहराची विकास योजना सुधारीत करणेबाबत इरादा जाहीर करणे.**

**ठराव क्र. (७६) -**

मिरा भाईंदर, नगरपरिषदेची स्थापना दि.१२ जून, १९८५ रोजी झालेली असून दि.२८ फेब्रुवारी २००२ रोजी नगरपालिकेचे रुपांतर महानगरपालिकेमध्ये झालेले आहे. शहराचे एकूण क्षेत्र ७९.४० चौ.कि.मी. आहे.

मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) शासन अधिसूचना क्र. टीपीएस-१२९६/८४७/सीआर-१६२/९६/युडी-१२, दि.१४/०५/९७ अन्वये मंजूर करण्यात आलेली असून दि.१५/०७/९७ पासून अंमलात आलेली आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना शासन अधिसूचना क्र. टीपीएस-१२९८/९४१/सीआर-८९/९८/युडी-१२, दि.२५/०८/२००० अन्वये मंजूर झालेली असून दि.१५/१०/२००० पासून अंमलात आलेली आहे. मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत शासन निर्णय क्र. टिपीएस-१२०८/१३४६/प्र.क्र.२६७/०८/नवि-१२, दि.२९/०८/२००९ अन्वये फेरबदल मंजूर झाले आहेत.

महानगरपालिका क्षेत्रातील मोर्वा, डोंगरी, तारोडी, चौक, पाली व उत्तन या महसुली गावासाठी दि.०१/१२/२००७ पासून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांची विशेष नियोजन प्राधिकरण (Special Planning Authority) म्हणून शासनाने नियुक्ती केली आहे व मुंबई महानगर विकास प्राधिकरणाने अधिसुचित क्षेत्रासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ नुसार (काही भाग वगळून) दि.१३/०५/२०१३ रोजी मंजूर झालेली आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३८ नुसार विकास योजना लागु झालेनंतर किमान २० वर्षाहुन एकदा किंवा शासन निर्देश देईल त्यावेळेस नियोजन प्राधिकरणाने विकास योजना सुधारीत करणे आवश्यक आहे.

नियोजन प्राधिकरणाने विकास योजना तयार करणे व त्यासंबंधी कार्यपध्दती याबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ मध्ये तरतुदी विहीत करण्यात आलेल्या आहेत. या वैधानिक तरतुदी पुढीलप्रमाणे आहेत.

अधिनियमाचे कलम ३८ नुसार नियोजन प्राधिकरणाने विकास योजना अंमलात आलेनंतर वीस वर्षातुन किमान एकदा किंवा शासन निर्देश देईल त्यावेळेस आपल्या क्षेत्रासाठी सुधारीत विकास योजना तयार केली पाहिजे व अधिनियमातील विकास योजना तयार करणेचे कार्यपध्दतीबाबत तरतुद अंतर्भुत असलेले कलम २२ ते ३१ मधील तरतुदी अशी सुधारीत विकास योजना तयार करतांना शक्य तितक्या प्रमाणात लागु राहतील.

कलम २३ नुसार नियोजन प्राधिकरणाने आपल्या क्षेत्राचे सर्वेक्षण करुन विद्यमान जमीन बाबत नकाशा तयार करणेपुर्वी आपल्या ठरावाद्वारे विकास योजना तयार करणे संबंधी इरादा जाहीर केला पाहिजे व अशा ठरावासह विकास योजनेत समाविष्ट करावयाच्या क्षेत्राचे हद्द दर्शविणारा नकाशा शासनाकडे सादर केला पाहिजे. त्याचप्रमाणे नियोजन प्राधिकरणाने इराद्याबाबत आपली अधिसुचना शासन राजपत्र व

... स्थानिक वर्तमानपत्रात प्रसिध्द ... नागरीकांकडुन ... हरकती ...
... मागविणे आवश्यक आहे.

अधिनियमाच्या वर नमूद तरतुदी विचारात घेवून महानगरपालिकेने नियोजन प्राधिकरण ... महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ... तरतुदीनुसार महानगरपालिका क्षेत्रासाठी सुधारीत विकास योजना तयार करणेसंबंधी इरादा जाहीर करणेसाठी महासभेपुढे खालीलप्रमाणे प्रस्ताव मान्यतेसाठी ठेवत आहे.

1. महानगरपालिकेने नियोजन प्राधिकरण म्हणून अधिनियमाचे कलम २३ व ३८ नुसार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील (मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे क्षेत्र वगळून) सुधारीत विकास योजना तयार करणेचा इरादा जाहीर करणेस मान्यता देणे.
2. सुधारीत विकास योजनेत सामाविष्ट करावयाच्या क्षेत्राच्या नकाशासह ... शासनाकडे ... मान्यता देणे.
3. सुधारीत विकास योजना तयार करणेच्या इरादा संबंधी कलम २३ प्रमाणे शासन राजपत्र, स्थानिक वर्तमानपत्रात सूचना प्रसिध्द करुन नागरीकांकडुन हरकती व सूचना मागविणे.

तसेच कलम २४ प्रमाणे उक्त क्षेत्राचे ... विद्यमान जमीन वापर नकाशा ... तयार करुन व त्या क्षेत्रासाठी विकास योजनेचे प्रस्ताव तयार करुन महानगरपालिकेकडे सादर करणेसाठी नगररचना अधिकारी (TPO) नियुक्त करणे.

वरीलप्रमाणे महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३८ ... तरतुदीनुसार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सुधारीत विकास योजना तयार करणेबाबतचा इरादा जाहीर करणेसाठी ही महासभा मंजुरी देत आहे.

तसेच विकास योजनेमध्ये समाविष्ट करावयाच्या आरक्षणाबाबत ... प्रस्तावानुसार ... रोजीच्या महासभेने पारित केलेला ठराव ... मधील मौजे भाईंदर सर्व्हे क्र.४९४, ... जागेवर असलेले ग्राऊंड, मार्केट हे आरक्षण ... ठराव रद्द करणेत येत असून ... चटई क्षेत्रप्रमाणे ... जागा मालकाकडुन विनामूल्य बांधून ... महासभा मंजुरी देत आहे.

सूचक ... अनुमोदक ...

ठराव मंजूर

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा.महासभा दि. १५/१०/२०१५

**प्रकरण क्र (१०७) - मिरा भाईंदर शहराच्या मंजूर विकास योजनेमधील मौजे घोडबंदर, स.क्र. ८/१ब,१क या जागेपैकी १८.०० मी. रुंद विकास योजना रस्त्याने बाधीत क्षेत्राचे भूसंपादन करणेबाबत**

**ठराव क्र. (७७) -**

मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेल्या भाग सोडून) दि.१४/०५/१९९७ रोजी मंजूर झालेली असून दि.१५/०७/१९९७ पासून अंमलात आलेली आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना दि.२५/०८/२००० रोजी मंजूर झालेली असून दि.१५/१०/२००० पासून अंमलात आलेली आहे. सदरच्या विकास योजनेमध्ये एकूण १९ महसूली गावांचा समावेश आहे.

सदरच्या मंजूर विकास योजनेमधील मौजे घोडबंदर, स.क्र. ६/६, ७/६, ८/१अ, १०/१, २०४/१० या जागेसाठी महानगरपालिकेचे पत्र क्र. मनपा/नर/२५८८/२०१२-१३, दि.०६/१०/२०१२ अन्वये रेखांकन नकाशा मंजूरीसह भूखंड प्रकार बी च्या मर्यादित बांधकाम परवानगी देण्यात आलेली आहे.

सदरच्या मंजूर रेखांकनामधील १८.०० मी. रुंद विकास योजना रस्ता, स.क्र. २०४/११, ८/१ब व ८/१क या जागेमधून जात असून स.क्र. २०४/११ या जागेमधील विकास योजना रस्त्याने बाधीत क्षेत्र महानगरपालिकेस हस्तांतरीत झालेले आहे तथापि स.क्र. ८/१ब व ८/१क या जागेतील विकास योजना रस्त्याने बाधीत क्षेत्र महानगरपालिकेस हस्तांतरीत झालेले नाही.

स.क्र. ८/१ब व ८/१क या जागेमधील विकास योजना रस्त्याने बाधीत क्षेत्र महानगरपालिकेच्या ताब्यात मिळालेले नसल्यामुळे स.क्र. ६/६, ७/६, ८/१अ, १०/१ व २०४/१० या जागेसाठी जाणेकरिता रस्ता उपलब्ध होत नसल्यामुळे सदर जागेचे विकासक श्री. धर्मेंद्र जयंतीलाल शहा यांनी महानगरपालिकेने नकाशामध्ये दर्शविल्याप्रमाणे विकास योजना रस्त्याचे बांधकाम करणेस महानगरपालिकेस आदेशित करावे म्हणून मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र. ७४१९/२०१३ दाखल केलेली आहे.

सदर याचिकेमधील मा. उच्च न्यायालयाच्या आदेशामधील परिशिष्ठ क्र. ८ व ९ मध्ये नमुद केल्याप्रमाणे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ मध्ये नमुद केल्याप्रमाणे (१) परस्पर वाटाघाटी, (२) विकास हक्क प्रमाणपत्राद्वारे जागा हस्तांतरित करणेबाबत संबंधित जागामालकास सुनावणीसाठी वारंवार बोलावण्यात आले असता, संबंधित जागामालक सुनावणीसाठी / वाटाघाटीसाठी समक्ष हजर राहिलेले नाहीत तसेच त्यांनी सदरच्या जागेसाठी विकास हक्क प्रमाणपत्र मिळणेसाठीचाही प्रस्ताव महानगरपालिकेकडे सादर केलेला नाही.

मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे विहीत मुदतीत कार्यवाही करणे आवश्यक असल्यामुळे व जागामालकांनी परस्पर वाटाघाटीस व विकास हक्क प्रमाणपत्रान्वये जागा हस्तांतरीत करणेस प्रतिसाद दिलेला नसल्यामुळे मौजे घोडबंदर, स.क्र. ८/१ब व ८/१क या जागेपैकी १८.०० मी. रुंद विकास योजना रस्त्याने बाधीत अंदाजित क्षेत्र ६८०.०० चौ.मी. साठी भूसंपादन करणेसाठीचा आगाऊ प्रस्ताव महानगरपालिकेचे पत्र क्र. मनपा/नर/७९३/२०१४-१५, दि.२१/०६/२०१४ अन्वये मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे सादर करणेत आलेला आहे.

सबब मिरा भाईंदर शहराच्या मंजूर विकास योजनेमधील मौजे घोडबंदर, स.क्र. ८/१ब व ८/१क या जागेपैकी १८.०० मी. रुंद विकास योजना रस्त्याने बाधीत जागा ताब्यात घेण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ नुसार व मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांचेमार्फत भूसंपादन कायदा १९४८ चे कलम ६ नुसार भूसंपादन करण्याकरिता व सदर भूसंपादन करणेकामी येणा-या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मंजूरी मिळणेकरीता महासभे समोर विषय सादर केला असता दि.१९/०७/२०१४ रोजीच्या महासभेने सदरच्या विषयांकित जागेसाठी पोहोंच रस्ता नसल्यामुळे व सदर जागेच्या परवानगीची मुदत संपलेली असल्यामुळे सदरची बांधकाम परवानगी रद्द करणेसह सदरची जागा विशेष औद्योगिक विभागामध्ये (Special Industrial Zone) सामाविष्ठ असल्यामुळे तसेच मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीमधील विकास योजना रस्ते विकसित करताना या रस्त्याने बाधित जागेमधील, औद्योगिक गाळे; दुकान;

इ. धारकांना पुर्नवसन करुन देणेसाठी सदरची जागा महानगरपालिकेने ताब्यात घेऊन विकसित करणेसाठी सदर जागेच्या भुसंपादनासाठी लागणाऱ्या खर्चासाठी अर्थिक व प्रशासकीय मान्यता ठराव क्र. १६ अन्वये दिलेली आहे. सदर जागेबाबत विकासकाने मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका क्र. २५९५५/२०१४ दाखल केलेली आहे.

तथापी सदरच्या जागेसाठी जागा मालक/विकासक यांना देण्यात आलेली परवानगी मंजुर विकास नियंत्रण नियमावली प्रमाणे दिलेली असून सदरचा ठराव हा प्रशासनामार्फत सादर करणेत आलेल्या टिप्पणीनुसार अनुसरुन करणेत आलेला नसल्याने उक्त ठराव महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५१ अन्वये विखंडीत करणेकरीता महानगरपालिकेचे पत्र क्र. मनपा/नर/१९९८/२०१५-१६ दि.११/०८/२०१५ अन्वये मा. शासनास सादर करणेत आलेला आहे.

सदरच्या जागेमधून २५% प्रमाणेचे बांधीव क्षेत्र महानगरपालिकेस हस्तांतरीत होणार असून त्याप्रमाणे क्षेत्र दर्शविणारी इमारत रेखांकनामध्ये दर्शविलेली आहे. तसेच संपुर्ण क्षेत्राचे भूसंपादन करावयाचे झाल्यास भूसंपादनासाठी येणारा खर्च महानगरपालिकेस परवडणारा नाही यास्तव दि.१९/०७/२०१४ रोजीच्या महासभेने केलेला ठराव क्र. १६ रद्द करणेत येत असून सदरच्या विषयांकित जागेतील १८.०० मी. रुंद ेकास योजना रस्त्याखालील स.क्र.८/१ब व ८/१क ही जागा भुसंपादन करणेकरीता यापूर्वी हानगरपालिकेमार्फत मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे प्रस्ताव सादर केलेला आहे. यास्तव मा. जल्हाधिकारी, ठाणे यांचेमार्फत भूसंपादन कायदा १९४८ चे कलम ६ नुसार भूसंपादन करण्याकरिता व ादर भूसंपादन करणेकामी येणा-या खर्चास तसेच आरक्षण क्र.२२२ हाऊस फॉर डिसहाऊस या आरक्षातील त्र सर्व्हे क्र.२१९/५ जुना, या जागेतील जागाधारकांना देखील सदर आरक्षणात नगररचना नियमाप्रमाणे ोग्य ती बांधकाम परवानगी देण्यास ही सभा मंजुरी देत आहे असा ठराव मांडत आहे.

सुचक - श्री. नरेंद्र मेहता

अनुमोदक - श्रीम. सुमन कोठारी

**ठराव मंजूर**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. विशेष महासभा दि. १५/१०/२०१५

**दुःखवठा ठराव क्र. ७९ :-**

माजी खासदार राम कापसे राज्यपाल आमदार आणि ह्या शहराचे ज्यांनी शैक्षणिक क्रांती घडवली असे आपले लाडके माजी खासदार राम कापसे ह्यांचे निधन झालेले आहे ह्या शहरासाठी त्यांचे मोठे योगदान आहे त्यांचा शोक प्रस्ताव मांडत आहे. त्याचबरोबर हरिश्चंद्र केशव पाटील, माजी सरपंच जे माधवराव नावाने प्रसिध्द होते. त्यांचेही दुःखद निधन झाले आहे. त्यांचाही शोकप्रस्ताव मांडत आहे. श्री. यशवंत अनंत म्हात्रे ह्यांचा मुलगा विजय यशवंत म्हात्रे ह्यांचेही दुःखद निधन झालेले आहे. हरेश्वर म्हात्रे आणि उमरावबाई सोहनराव जैनजी मा. महापौर मॅडम यांची काकी व वसंत बाळकृष्ण पाटील, खारीगाव ह्यांचा शोकप्रस्ताव मांडत आहे.

**सुचक :- श्री. रोहिदास पाटील** **अनुमोदक :- श्री. शरद पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
# मा. विशेष महासभा दि. १५/१०/२०१५

**प्रकरण क्र. १०८ :-** रस्ते. चौक, उद्याने व इतर वास्तुंना नावे देण्याबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**ठराव क्र. ७८ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील रस्ते. चौक, उद्याने व इतर वास्तुंना नावे देण्याकरीता सन्मानीय नगरसेवक / नगरसेविका यांना पत्र देऊन प्रस्ताव मॅागविण्यास आले होते. त्यांच्याकडुन प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. यापुर्वी झालेले नामकरण वगळात खालील प्रस्ताव सादर करण्यात येत आहेत.

| अ.क्र | ठिकाणाचे नाव | प्रस्तावित नाव |
|---|---|---|
| १ | मिरारोड (पूर्व) शांतीनगर सेक्टर नं. ६ मधील सर्वेश्वर मंदिरा शेजारी उद्यान | जैन साध्वी श्री विनीत मालाजी |
| २ | भाईंदर (पूर्व) प्रभाग कार्यालय क्र. ०३ व ४ चे कार्यालयाच्या हद्दीत उद्यान व तलावास | स्वर्गीय गजानन परशुराम पाटील उदयान |
| ३ | मिरारोड (पूर्व) सेक्टर क्र. ०१ शांतीनगर येथील आर.जी जागेत असलेले उद्यान | स्व. मिनाताई बाळासाहेब ठाकरे उद्यान |
| ४ | मिरारोड स्टेशन पासुन रेल्वे समांतर पुनम सागर शांतीनाथ एम्प्रेस पर्यतचा रस्ता | स्वर्गवासी श्री. गौरीदत्त बिनवाल मार्ग |
| ५ | मिरारोड (पूर्व) तन्वर हॉस्पीटलकडुन क्वीनर्स पार्क समोरुन टाटा डोकोमोच्या शोरुमकडे जाणारा रस्ता | ओम साईधाम मंदिर मार्ग |
| ६ | मिरारोड (पूर्व) बाळा साहेब ठाकरे उद्यान ते ऑरेंज हॉस्पीटल येथील चौक | लाल बाल पाल चौक |
| ७ | भाईंदर (प.) उड्डाणपुल जवळ आरक्षण क्र. १०० उद्यान | सालासर हनुमान उद्यान |
| ८ | भाईंदर (पूर्व) स्पोर्टस कॉम्पलेक्स ते गॅस गोडाऊन रस्ता | कै. मुंकूद घरत मार्ग |
| | भाईंदर (पूर्व) न्यु गोल्डन नेस्ट मधील मुख्य रस्ता व चौक | हनुमान मंदिर चौक |
| | भाईंदर (पूर्व) गोडदेव मच्छि मार्केट ते विमल डेरी पर्यतचा रस्ता | स्व. यशवंत म्हात्रे मार्ग |
| ९ | भाईंदर (प.) महेश्वरी मार्गा वरील डिवाईन यर्सी स्कुल ते प्लॅनेटरीया कॉम्पलेक्स मार्ग | स्व. जोजफ नि. रॉड्रीक्स मार्ग |
| १० | मिरारोड (पूर्व) हटकेश विभागात मंगल नगर, गौरव सिटी, शांती विद्यानगरी व जी.सी.सी क्लब | हिंदु ह्रदय सम्राट बाळासाहेब ठाकरे चौक |
| ११ | भाईंदर (पूर्व) नवघर येथील गांवदेवी मंदिरा जवळील रंगमंच | श्री. गांवदेवी रंगमंच व मैदान |
| १२ | भाईंदर (पूर्व) प्रभाग क्र. १२ मधील नवघर येथे नवघर आदर्श इंदिरानगर पाण्याच्या टाकीजवळ असलेले मैदान | स्व. आनंद दिघे मैदान |
| १३ | भाईंदर (प.) मोर्वा गाव तलावा जवळील उद्यानास | सुर्यनारायण उद्यान |
| १४ | राई गांव येथील मैदान | कै. पाडुरंग वामन पाटील मैदान |
| १५ | मिरारोड (पूर्व) सेक्टर नं. ३ येथे खेळाचे मैदान | श्री माता पदमावती मैदान |
| १६ | प्रभाग क्र. २८ भाईंदर शॉपिंग सेंटर ते मनोगज अपार्टमेट पर्यत जाणाऱ्या रस्ता | श्री. कृष्णराव म्हात्रे मार्ग |
| १७ | मिरारोड (पूर्व) शांतीनगर सेक्टर नं. १व ४ मधील नव्याने रस्ता | श्री नाकोडा भैरव मार्ग |
| १८ | मिरारोड (पूर्व) मधील सेक्टर नं. ७ येथील रस्ता | वैदीक मार्ग |
| १९ | भाईंदर (पूर्व) मधील सेक्टर ५ येथील उद्यान व खेळाचे मैदान | सरदार वल्लभाई पटेल उद्यान व मैदान |
| २० | भाईंदर (पूर्व) मधील सेक्टर ११ च्या समोरील सेक्टर ५ मधील रस्ता | नायर समाज मार्ग |
| २१ | मिरारोड (पूर्व) सेवन स्केअर हॉस्पीटल समोरील चौक | आई माता चौक |
| २२ | मिरारोड (पूर्व) सेक्टर ६ चे उद्यान | स्वामी विवेकानंद उद्यान |
| २३ | भाईंदर (पूर्व) ओस्तवाल पार्क ते चंदन पार्क रस्ता | सरदार वल्लभ भाई पटेल |
| २४ | भाईंदर (पूर्व) हरिचंद्र नगर येथे असलेल्या समाज मंदिर | रामभाऊ म्हाळगी समाज मंदिर |

| | | |
|---|---|---|
| २५ | भाईंदर (पूर्व) नवघर रोड येथील<br>१) साईबाबा नगर<br>२) कस्तुरी पार्क<br>३) स्नेहा हॉस्पिटल | साईबाबा नगर मार्ग<br>कस्तुरी पार्क मार्ग<br>स्नेहा हॉस्पीटल मार्ग |
| २६ | मिरारोड (पूर्व) मनी पॅलेस हॉटेल अंतपुरा लॉज, भारती पार्क, युनिटी अपार्टमेंट, आर.के.इन हॉटेल ते पुढे शिवार गार्डन सिग्नल पर्यत रस्ता | श्री. लक्ष्मी नारायण भजन मंदिर मार्ग |
| २७ | काशिगाव येथील ग्रीन व्हिलेज कॉम्लेक्स समोरील चौक | श्री. धर्मवीर आनंद दिघे चौक |
| २८ | मिरारोड (पूर्व) रिलायन्स फ्रेश समोरील चौकास | बापा सिताराम चौक |
| २९ | भाईंदर (पूर्व) आझाद नगर गल्ली नं. १ | मो. रफिक शाह मार्ग |
| ३० | भाईंदर (पूर्व) गोल्डन नेस्ट ते क्विन्स मेरी स्कुल मार्ग | श्याम ज्वालामुखी मार्ग |
| ३१ | भाईंदर (पूर्व) केबिन रोड प्रिंस प्लाझा बिल्डींग समोरील प्राथमिक आरोग्य केंद्र | स्वातंत्रविर शहीद मंगल पांडे आरोग्य केंद्र |
| ३२ | भाईंदर (पूर्व) आरक्षण क्र. १०२ बगीचा | कै. प्रमोद महाजन उदयान |
| ३३ | भाईंदर (पूर्व) नवघर रोड येथील आरक्षण क्र. १२२ सी मैदान | भारतरत्न सचिन तेंडुलकर मैदान |
| ३४ | भाईंदर (पूर्व) नवघर शाळेच्या मागे मैदान | मा.श्री. धर्मविर आनंद दिघे मैदान |
| ३५ | भाईंदर (पूर्व) नवघर रोड वरील गीता भवन व कुमार अपार्टमेंट पासुन शिवमंदिर पर्यत रस्ता | स्वतंत्र सैनिक श्री. आत्माराम राजाराम भोईर मार्ग |
| ३६ | मिरारोड (पूर्व) फेज ३ पुनम नगर चे उद्यान | स्व.हर्षद भाई पुनमचंद दोशी उद्यान |
| ३७ | मिरारोड (पूर्व) १) गौरव रिजन्सी २) १५ नं. सेकंड लास्ट बस स्टॉप ३) हटकेश जवळ कोर्टाच्या शेजारी येथे असणारे चार रस्ते | स्व. मिनाताई ठाकरे चौक |
| ३८ | मिरारोड (पूर्व) १) ओस्तवाल हाईट्स बिल्डींग, नागोबा फाऊडेशन दुर्गामाता मंदिर बाजुला, गॅलेक्सी हॉस्पिटल जवळ, २) शालोम गार्डन ३) प्रथमेश टॉवर ४) ओसवाल आर्चिड चार रस्ते चौक | शहीद तुकाराम गोपाळ ओंबळे चौक |
| ३९ | मिरारोड (पूर्व) १) रश्मी प्राईम कॉर्नर, पी पॉवर व्यायाम शाळा (एच.डी.एफ.सी.बँक) २) ईराइसा टॉवर ३) कनकिया पोलिस स्टेशनच्या बाजुला असणारे चार रस्ते | श्री. धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज चौक |
| ४० | मिरारोड (पूर्व) विजय पार्क येथील आर.एन.ए पार्क ते हेतल पार्क हा रस्ता | कै. श्री. दिनकर शंकर सावंत (बाबा) मार्ग |
| ४१ | मिरारोड (पूर्व) ते शांतीपार्क विभागातील शिवाली ते रश्मी इमारतीपर्यंतच्या रस्त्यास | श्री. वल्लभाचार्यजी मार्ग |
| ४२ | मिरारोड (पूर्व) शितलनगर परिसरात उद्यान | नायब राज्यपाल स्व. राम कापसे उद्यान |
| ४३ | मिरारोड (पूर्व) माधव टॉवर्स इमारतीच्या पाठीमागील उद्यान | महावीर स्वामी उद्यान |
| ४४ | मिरारोड (पुर्व) प्रभाग क्र.३९ शांती नगर सेक्टर १० बिल्डींग सी-३९ समोर आर.जी. येथील योगासन केंद्र. | संत सच्चिदानंद योगासन हॉल. |
| ४५ | मिरारोड (पुर्व) सिल्वर पार्क येथे जांगीड सर्कल हे पुर्ण परिसराचे मेन सर्कल | स्वर्गीय श्रीम. गंगादेवी सगताराम जांगीड |
| ४६ | मिरारोड (पुर्व) प्रभाग क्र.३७ येथे सेक्टर नं.०३ बिल्डींग नं.सी/६१ येथे आर.जी जागा | जीवदया रामरोटी समाज मंदिर |
| ४७ | मिरारोड (पुर्व) प्रभाग क्र.३७ येथे सेक्टर नं.०७ बिल्डींग नं.डी/१, २, ३ येथे आर.जी जागा | श्री बहूचर माताजी समाज मंदिर |
| ४८ | मिरारोड (पुर्व) प्रभाग क्र.३७ येथे सेक्टर नं.०७ बिल्डींग नं.अे/२ येथे समाज मंदिर | श्री नाकोडा भैरव धाम समाज मंदिर |
| ४९ | भाईंदर (पूर्व) प्रभाकर दत्तु म्हात्रे मार्गावरील तीन रस्ता | गुरु अंबेश- सौभाग्य चौक |
| ५० | भाईंदर (पूर्व) न्यू गोल्डन नेस्ट फेस-१४, १५, १६ मिठालाल जैन बंगलो समोर चौक | श्री. आदेश्वर चौक |
| ५१ | मिरारोड (पूर्व) सेक्टर क्र. १, बी-१७, १८, १९, २०, २१, २२, २३ मध्ये मैदान | पं. दिनदयाल उपाध्याय मैदान |
| ५२ | मिरारोड (पूर्व) सेक्टर क्र. १, बी-४८, ४९, ५० बाजुस उद्यान | शास्त्रीजी महाराज उद्यान |
| ५३ | वेस्टर्न हायवे ते जेसलपार्क रस्ता | पं. दिनदयाल उपाध्याय मार्ग |

| | | |
|---|---|---|
| ५४ | खाडी ते मिरारोड कडे जाणारा नविन लिंक रोड | डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग |
| ५५ | कनकिया रोड ते जेसलपार्क घोडबंदर रस्त्यावरील चौक | सेवन ईलेव्हन चौक |
| ५६ | वेस्टर्न हॉटेल ते कनकियाकडे जाणारा रस्ता | बाकेराम तिवारी मार्ग |
| ५७ | रामदेव पार्क रामनगर आरक्षण क्र. २३५ उद्यान | कै. रामभाऊ म्हाळगी उद्यान |
| ५८ | सेव्हन ईलेव्हन हॉस्पीटल च्या मागील आरक्षण क्र. २१६ मधील उद्यान | कै. अरविंद पेंडसे उद्यान |
| ५९ | जेसल पार्क सब-वे | शहिद भगतसिंह भुयारी मार्ग |
| ६० | मौजे भाईदर स.क्र. ४७४, ४७७, ४८१, ४८७ या जागेतील महानगरपालिकेची इमारत | भारतरत्न माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी भवन |
| ६१ | अमृतवाणी रोड जवळील आरक्षण क्र. ९३ मधील गार्डन | अमृतवाणी उद्यान |
| ६२ | रसाज येथील चौक | मेजर संदीप उन्नी कृष्णन चौक |
| ६३ | आरक्षण क्र. २६९ कडुन सेव्हन ईलेव्हन हब पर्यंत जाणारा रस्ता | शहित राजगुरु मार्ग |
| ६४ | आरक्षण क्र. ३०० मधील मैदान | शहिद सुखदेव मैदान |
| ६५ | आरक्षण क्र. ३०० मैदान शेजारील उद्यान | असफा उल्ला खान उद्यान |
| ६६ | महाजनवाडी येथील तरण तलाव | मिल्खा सिंग तरण तलाव |
| ६७ | भाईदर पश्चिम येथील आरक्षण क्र. १३२ मधील अग्निशमन केंद्र | कल्पना चावला अग्निशमन केंद्र |
| ६८ | कनकिया मिरारोड येथील अग्निशमन केंद्र | कनकिया अग्निशमन केंद्र |
| ६९ | आरक्षण क्र. २६४-अ कनकिया येथील वाहनतळ | सय्यदना अलीकदर मुफदल सैफुद्दीन साहेब वाहनतळ |
| ७० | प्र. क्र. ३७ येथील सेक्टर ८ शांतीनगर मधील इमारत क्र. ५ , ६ लगत असलेल्या मोकळया जागेत तयार होणारे उद्यान | आचार्य बाळशास्त्री जांभेकर उद्यान |
| ७१ | प्रभाग क्र. ३८ मिरारोड येथील सेक्टर क्र. १ बी-२७, २८ समोरील उद्यान | तिरुपती बालाजी उद्यान |
| ७२ | प्रभाग क्र. ३८ मिरारोड येथील सेक्टर क्र. १ बी-३४,३५,६४,६५ च्या बाजूला असलेले उद्यान | इन्फंट जिसस उद्यान |
| ७३ | मिरारोड शांतीनगर सेक्टर क्र. १ च्या अंतर्गत इमारत क्र. १६,१७,१९ च्या समोरील उद्यान | श्री नाकोडा भैरव धाम उद्यान |
| ७४ | नवघर चालघर मार्ग व श्री संत तुकाराम मार्ग ताराबाई टॉवर समोरील असलेल्या चौकास | कै. मोरेश्वर हरिश्चंद्र पाटील चौक |
| ७५ | भाईंदर पूर्व प्रभाग क्र. ११ गोडदेव नाका ते गोडदेव गांव रस्ता | स्व. विनायक धर्मण घरत मार्ग |
| ७६ | भाईंदर (पूर्व) प्रभाग क्र. ३० उड्डाणपुलाखालील उद्यान | कै. मायरा गिल्बर्ट मेन्डोसा उद्यान |
| ७७ | भाईंदर (पूर्व) प्रभाग क्र. ३० मिरारोड स्टेशन ते गोल्डन नेस्ट सिग्नल हा रस्ता | साने गुरुजी मार्ग |
| ७८ | भाईंदर (पूर्व) प्रभाग क्र. १३ इंद्रलोक नाका | स्व. डॉ. प्रफुल्ल काशीनाथ पाटील चौक |
| ७९ | भाईंदर (पूर्व) प्रभाग क्र. ७ बाजार मंडई | स्व. मिनाताई ठाकरे बाजार मंडई |
| ८० | भाईंदर (पश्चिम) रेल्वे टीकीट काउंटर, बस डेपो व जय अंबे नगर, चौपाटी कडे जाणारा रस्तावरील चौक | श्री नरसिंम्हा देव चौक |
| ८१ | प्रभाग क्र.३८ येथील मिरारोड (पु.) सेक्टर क्र.२ येथील मैदान | स्वामी श्री अखंडानंद सागर मैदान |
| ८२ | मिरा MIDC येथील तलाव | सातकरी (तुलसी) तलाव |
| ८३ | मिरारोड सेक्टर क्र. १० इमारत क्र. बी-३०, बी-१ च्या शेजारील समाज मंदीर | अचलगच्छ जैन संघ समाज मंदीर |
| ८४ | सेक्टर क्र. ११ व सेक्टर क्र. ४ च्या मधील चौक | जय श्री झुलेलाल चौक |
| ८५ | सेक्टर क्र. २ बी-४, बी-३ च्या मधील समाज मंदीर | श्री गणेश समाज मंदीर |
| ८६ | मुर्धा गावातील राम मंदीरा जवळील मैदान व सभागृह | माजी सरपंच कै. हरिश्चंद्र केशव पाटील (माधवराव) मैदान/ सभागृह |
| ८७ | भाईंदर (पश्चिम) येथील प्रभाग क्र. १ मधील जय बजरंग नगरकडे जाणरा रस्ता | जय बजरंग नगर मार्ग |
| ८८ | भाईंदर (पश्चिम) येथील प्रभाग क्र. १ मधील गणेश देवल नगर बालवाडी ते हनुमान मंदीर कडे जाणारा रस्ता | हनुमान मंदीर मार्ग |

| | | |
|---|---|---|
| ८९ | भाईंदर (पश्चिम) येथील प्रभाग क्र. १ मधील जय बजरंग नगर नाला ते बालवाडी पर्यंत जाणारा रस्ता | गणेश देवल नगर मार्ग |
| ९० | भाईंदर ते उत्तन - गोराईकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यावर मोर्वाखाडीवरील नविन पुल | श्री नारायण गुरु पुल |
| ९१ | गोडदेव नाका ते गोडदेव गाव रस्ता | स्व. विनायक धर्मण घरत मार्ग |
| ९२ | प्रभाग क्र. १३ भाईंदर (पूर्व) येथील इंद्रलोक नाका | स्व. डॉ. प्रफुल्ल काशिनाथ पाटील मार्ग |
| ९३ | आर. एन. पी. पी. पार्क, भाईंदर (पूर्व) | काशी विश्वनाथ नगर |
| ९४ | प्रभाग क्र. १७ मधील जागृति बिल्डींग ते रामगोपाल सदन | स्व. श्री. चंदुभाई रामशंकर रावल मार्ग |
| ९५ | प्रभाग क्र. ३९ येथे मिरारोड (पूर्व) सेक्टर क्र. १०, सी-६०/६१ व डी – ३८ समोरील उद्यान | भगवान परशुराम उद्यान |
| ९६ | भाईंदर (प.) व्हेज सागर हॉटेल गल्ली ते श्वेता रत्न रेसिडेन्सी परिसराचा रस्ता | आदिनाथ जैन मंदिर मार्ग |
| ९७ | भाईंदर (प.) स्पेन हाईट ते अग्निशमन बिल्डींग पर्यंत रस्ता | श्री. विजय वल्लभ सुरीजी मार्ग |
| ९८ | मिरारोड (पूर्व) मिरारोड स्टेशन भाजी मार्केट येथील मनपा शाळा क्र. २१ | हरजी के. माछी शाळागृह इमारत |
| ९९ | मिरारोड (पूर्व) शांतीनगर सेक्टर क्र. ९ डी/७८, ८०, डी/८४, ८५ च्या मागील आर.जी. जागा | कलावती आई उद्यान |
| १०० | भाईंदर (पूर्व) नवघर गावातील "विश्वकर्मा वंश सुतार चेरीटेबल ट्रस्ट" या मंदिरामध्ये जाणारा रस्ता | विश्वकर्मा मंदिर मार्ग |
| १०१ | मिरारोड (पूर्व) पुनमसागर आरक्षण क्र. १९६ | भारतरत्न डॉ. एपीजे अब्दुल कलाम उद्यान |

वरीलप्रमाणे नामकरण करण्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची 'ड' मधील प्रकरण ११ (२) अन्वये मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर नामकरणाचे फलक बसविणेकामी वार्षिक दराच्या निवीदा मागविण्यात याव्यात. सदर कामासाठी येणाऱ्या खर्चास ही सभा प्रशासकीय व आर्थिक मान्यता देत आहे.

**सुचक :- श्री. नरेंद्र मेहता** **अनुमोदक :- श्री. दिनेश जैन**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. ०४/१२/२०१५

**प्रकरण क्र. १०९ :-** दि. २३/०३/२०१५, दि. ३०/०३/२०१५, दि. ३०/०३/२०१५ (दि. २३/०३/२०१५ रोजीची तहकुब सभा), दि. १३/०५/२०१५ दि. १७/०६/२०१५ दि. ०१/०७/२०१५, व दि. ०१/०७/२०१५ (दि. ०१/०७/२०१५ रोजीची तहकुब सभा) रोजींच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

ठराव क्र. ८० :-

दि. २३/०३/२०१५, दि. ३०/०३/२०१५, दि. ३०/०३/२०१५ (दि. २३/०३/२०१५ रोजीची तहकुब सभा), दि. १३/०५/२०१५ दि. १७/०६/२०१५ दि. ०१/०७/२०१५, व दि. ०१/०७/२०१५ (दि. ०१/०७/२०१५ रोजीची तहकुब सभा) रोजीच्या मा. महासभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

सुचक :- श्री. रोहिदास पाटील      अनुमोदक :- श्री. शरद पाटील

ठराव सर्वानुमते मंजूर

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

# मा. महासभा दि. ०४/१२/२०१५

**प्रकरण क्र. ११० :-** **मिरारोड (पू.) आरक्षण क्र. १७८ खेळाचे मैदान आणि आरक्षण क्र. १७० आला हजरत खेळाचे मैदान येथे आमदारांच्या स्थानिक विकास कार्यक्रम २०१५-१६ अंतर्गत सामाजिक सभागृह बांधणे कामाबाबत.**

ठराव क्र. ८७ :-

१) मिरारोड (पूर्व) नयानगर आरक्षण क्र. १७८, खेळाचे मैदानात राज्य शासनाच्या प्राथमिक मुलभुत सोयी सुविधा योजनेअंतर्गत मल्टीपर्पज हॉल बांधण्याचे रु.२.०१ कोटी रकमेचे काम प्रस्तावित असल्याने सदर ठिकाणी स्थानिक विकास कार्यक्रमातंर्गत सामाजिक सभागृह बांधण्याची आवश्यकता नाही.

२) मिरारोड (पूर्व) आरक्षण क्र. १७० आला हजरत खेळाचे मैदान असून सदर आरक्षणाच्या असलेल्या एकूण जागेपैकी मोठ्या जागेत एस.टी.पी. प्लांट बांधल्याने सदर मैदान लहान झाले आहे. त्यामुळे सदर मैदानात स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत सामाजिक सभागृह बांधणे योग्य होणार नाही. त्यामुळे सदर काम करण्यात येऊ नये.

३) मिरारोड (पूर्व) शांतीनगर सेक्टर नं. ९ लोकमान्य टिळक खेळाचे मैदान येथे राज्य शासनाच्या प्राथमिक मुलभुत सोयी सुविधा कार्यक्रम अंतर्गत मल्टीपर्पज बांधण्यासाठी रु.२.०१ कोटी रकमेचे काम प्रस्तावित असल्याने सदर जागेत स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत सामाजिक सभागृह बांधणे योग्य होणार नाही. त्यामुळे सदर काम करण्यात येऊ नये.

४) मिरारोड (पूर्व) शांतीनगर सेक्टर क्र. ०२ वॉर्ड क्र. ३८ मध्ये डी/३, डी/४, सी/५, सी/६ इमारती जवळ असलेल्या मैदानालगतचा स्टेज हे कमी पडत असल्याने सदर जागेत स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत सामाजिक सभागृह बांधणे कामास मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत दळवी** **अनुमोदक :- श्रीम. दिप्ती भट्ट**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | शरद केशव पाटील | १ | कॅटलीन ऍन्थोनी परेरा | |
| २ | पाटील रोहिदास शंकर | २ | सय्यद नुरजहाँ नझर हुसेन | |
| ३ | सिमा कमलेश शहा | ३ | ध्रुवकिशोर पाटील | |
| ४ | जैन गिता भरत | ४ | डिमेलो बर्नड अल्बर्ट | |
| ५ | अरोरा दिपीका पंकज | ५ | ग्रिटा स्टिफन फॅरो | |
| ६ | रावल भगवती जयशंकर | ६ | असेन्ला मेन्डोंसा परेरा | |
| ७ | मेहता डिंपल विनोद | ७ | शिल्पा भावसार | निरंक |
| ८ | मेघना दिपक रावल | ८ | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | |
| ९ | शर्मा सुनिला सत्येंद्र | ९ | रॉड्रीक्स बाबरा डॉनल्ड | |
| १० | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | १० | दक्षता राजेंद्र ठाकूर | |
| ११ | सुजाता रविकांत शिंदे | ११ | पाटील वंदना विकास | |
| १२ | पाटील प्रेमनाथ गजानन | १२ | शबनम लियाकत शेख | |
| १३ | सिंग मदन उदितनारायण | १३ | झिनत रऊफ कुरेशी | |
| १४ | कांगणे यशवंत ठकाजी | १४ | विराणी रेखा अनिल | |
| १५ | अनिल बाबुराव भोसले | १५ | पुजारी कांचना शेखर | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १६ | कासोदरीया अश्विन श्यामजी | १६ | पिसाळ मनिषा नामदेव | |
| १७ | जैन दिनेश तेजराज | १७ | डिसा मर्लिन मर्विन | |
| १८ | जैन रमेश धरमचंद | १८ | वंदना रामदास चक्रे | |
| १९ | निलम हरिश्चंद्र ढवण | १९ | अनिता जयवंत पाटील | |
| २० | तारा विनायक घरत | २० | गोविंद हेलन जॉर्जी | |
| २१ | शुभांगी महिन कोटियन | २१ | काझी रशीदा जमील | |
| २२ | जयमाला किशोर पाटील | २२ | इनामदार जुबेर | |
| २३ | परमार अनिता भरत | २३ | वेतोसकर राजेश शंकर | |
| २४ | पाटील प्रणाली संदिप | २४ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | |
| २५ | गावंड मंदाकिणी आत्माराम | २५ | सुर्यकांत खंडोजी म्हात्रे | |
| २६ | म्हात्रे प्रभाकर प्रद्माकर | २६ | सामंत प्रमोद जयराम | |
| २७ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | २७ | रकवी सुहास माधवराव | |
| २८ | हरिश्चंद्र रामचंद्र आमगावकर | २८ | पांडे हंसुकुमार कमलकुमार | |
| २९ | प्रविण मोरेश्वर पाटील | २९ | खण्डेलवाल सुरेश | |
| ३० | शाह राकेश रतिशचंद्र | ३० | वेंचर गिल्बर्ट मेन्डोंसा | |
| ३१ | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | ३१ | डॉ. आसिफ शेख | |
| ३२ | केळुसकर प्रशांत नारायण | ३२ | भोईर कमलेश यशवंत | |
| ३३ | भोईर भावना राजू | ३३ | रविंद्र भिमदेव माळी | |
| ३४ | भोईर राजू यशवंत | | | |
| ३५ | जाधव मोहन महादेव | | | |
| ३६ | मुन्ना सिंग | | | |
| ३७ | ॲड. रवि व्यास | | | |
| ३८ | दिप्ती शेखर भट | | | |
| ३९ | मयेकर सरस्वती रजनीकांत | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ०४/१२/२०१५

**प्रकरण क्र. १११ :- करार तत्वावरील बहुउद्देशीय आरोग्य (M.P.W.) कर्मचारी यांच्या ठोक मानधनात वाढ करणेबाबत.**

ठराव क्र. :- ८२

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात रुग्णांना प्राथमिक वैद्यकीय सेवा पुरविण्यासाठी ११ नागरी आरोग्य केंद्र व १ रुग्णालय कार्यरत आहे. वैद्यकीय आरोग्य विभागांतर्गत सुरु असलेल्या आरोग्य केंद्रामार्फत सर्व राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रम राबविण्यात येतात. सदर कार्यक्रमापैकी "राष्ट्रीय किटकजन्य आजार नियंत्रण कार्यक्रम" हा एक महत्वाचा आरोग्य कार्यक्रम आहे. सदर कार्यक्रमात घरोघरी सर्वेक्षण करुन डास अळीसाठी पाण्याचे साठे तपासणे, डास अळी असलेल्या साठ्याची विल्हेवाट लावणे, तापाचे रुग्ण शोधून रक्त तपासणी करणे, समुळ औषधोपचार देणे इ. कामे केली जातात.

सदर कार्यक्रम राबविणेसाठी विहित निकषानुसार ४१ बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी आवश्यक आहेत.

आवश्यक ४१ कर्मचाऱ्यांपैकी सद्यस्थितीत ३२ बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी कार्यरत आहेत. सदर कर्मचाऱ्यांची शासन निर्णयानुसार विहित भरती प्रक्रियेचा अवलंब करुन भरती केली आहे. सदर कर्मचाऱ्यांना मा. महासभा दि.१४/१२/२०१२, ठराव क्र.२७ अन्वये ठोक मानधन प्रतीमाह रु.७०००/- यावर नियुक्ती केली आहे.

बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (M.P.W.) वर्ग-३ यांची वेतनश्रेणी रु.५२००-२०२०० ग्रेड वेतन रु.२४००/- असुन, प्रसविका या पदाची वेतनश्रेणी रु.५२००-२०२०० ग्रेड वेतन रु.२४००/- आहे. परंतु बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी यांना मा. महासभा दि.१४/१२/२०१२, ठराव क्र.२७ अन्वये रु.७०००/- प्रतीमहा मानधन आहे व प्रसविका या वैद्यकीय आरोग्य विभागातील पदासाठी मा. महासभा दि.१५/०१/२०१३, ठराव क्र.३७ अन्वये यामध्ये मानधन वाढ करुन, रु.१२०००/- प्रतीमहा ठोक मानधन अदा करण्यात येत आहे.

बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी या पदासाठी असलेले मानधन अतिशय कमी आहे. बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी व प्रसविका या दोन्ही वर्ग-३ चे स्थायी पदास रु.५२००-२०२०० ग्रेड पे रु.२४००/- अशी एकच वेतन श्रेणी आहे. अस्थायी प्रसविका कर्मचाऱ्यांना मा. महासभा दि.१५/०१/२०१३, ठराव क्र.३७ अन्वये १२०००/- ठोक मानधन प्रतीमहा देणेबाबत मंजुर असुन, त्यानुसार त्यांना सदरचे ठोक मानधन देणेत येत आहे. त्याच धर्तीवर करार तत्वावरील ३२ बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (M.P.W.) यांना रु.९०००/- प्रतीमहा ठोक मानधन देणेस हि सभा मंजुरी देत आहे.

सुचक :- (सही) अनुमोदक :- (सही)

श्री. शरद पाटील श्रीम. डिंपल मेहता

ठराव सर्वानुमते मंजुर

(सही)

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. महासभा दि.०४/१२/२०१५**

OK

**प्रकरण क्र.११२ :- आकृती बंधास मंजुरी मिळणेबाबत.**

**ठराव क्र.** ८३ :-

सदर विषयाचा गोषवारा उशिरा प्राप्त झाल्यामुळे सदर विषयाबाबत संबंधीत विभागप्रमुखांशी चर्चा विनिमय करुन अभ्यास करता आला नाही. यामुळे सदर विषयातील तांत्रिक बाबींची माहिती अवगत झाली नसल्याकारणाने सदरचर विषय सविस्तर माहितीसह पुढील मा. महासभेत घेण्यात यावा असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :- सौ. [illegible] अनुमोदक:- [illegible]

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ०४/१२/२०१५

**प्रकरण क्र. ११३ :- राज्यातील अल्पसंख्यांक बहुल क्षेत्रात मुलभुत नागरी सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी क्षेत्रविकास कार्यक्रमांतर्गत विकास कामांबाबत.**

ठराव क्र. ८४:-

राज्यातील अल्पसंख्यांक व बहुल क्षेत्रात मुलभुत नागरी सुविधा उपलब्ध करुन देणेकामी शासन निर्णय क्र. क्षेविका-२०१५/प्र.क्र.७६/का.९, दि. १८/०६/२०१५ अन्वये अल्पसंख्याक क्षेत्रामध्ये मुलभूत सुविधा पुरविणे कामी संपूर्ण मिरा-भाईंदर शहरातील अल्पसंख्याक वस्त्यांमध्ये करावयाच्या कामांचे प्रस्ताव तयार करुन एकत्रित प्रस्ताव पुढील महासभेपुढे सादर करण्यात यावा.

**सुचक :- श्री. रोहिदास पाटील** **अनुमोदक :- श्री. प्रशांत केळूसकर**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | शरद केशव पाटील | १ | कॅटलीन ॲन्थोनी परेरा | निरंक |
| २ | पाटील रोहिदास शंकर | २ | सय्यद नुरजहॉ नझर हुसेन | |
| ३ | कोठारी सुमन रमेश | ३ | ध्रुवकिशोर पाटील | |
| ४ | सिमा कमलेश शहा | ४ | डिमेलो बर्नड अल्बर्ट | |
| ५ | जैन गिता भरत | ५ | ग्रिटा स्टिफन फॅरो | |
| ६ | अरोरा दिपीका पंकज | ६ | असेन्ला मेन्डोंसा परेरा | |
| ७ | रावल भगवती जयशंकर | ७ | शिल्पा भावसार | |
| ८ | मेहता डिंपल विनोद | ८ | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | |
| ९ | मेघना दिपक रावल | ९ | रॉड्रीक्स बाबरा डॉनल्ड | |
| १० | शर्मा सुनिला सत्येंद्र | १० | दक्षता राजेंद्र ठाकूर | |
| ११ | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | ११ | पाटील वंदना विकास | |
| १२ | सुजाता रविकांत शिंदे | १२ | शबनम लियाकत शेख | |
| १३ | पाटील प्रेमनाथ गजानन | १३ | झिनत रऊफ कुरेशी | |
| १४ | सिंग मदन उदितनारायण | १४ | विराणी रेखा अनिल | |
| १५ | कांगणे यशवंत ठकाजी | १५ | पुजारी कांचना शेखर | |
| १६ | अनिल बाबुराव भोसले | १६ | पिसाळ मनिषा नामदेव | |
| १७ | कासोदरीया अश्विन श्यामजी | १७ | डिसा मर्लिन मर्विन | |
| १८ | जैन दिनेश तेजराज | १८ | वंदना रामदास चक्रे | |
| १९ | जैन रमेश धरमचंद | १९ | अनिता जयवंत पाटील | |
| २० | निलम हरिश्चंद्र ढवण | २० | गोविंद हेलन जॉर्जी | |
| २१ | तारा विनायक घरत | २१ | काझी रशीदा जमील | |
| २२ | शुभांगी महिन कोटियन | २२ | बगाजी शर्मिला विल्सन | |
| २३ | जयमाला किशोर पाटील | २३ | इनामदार जुबेर | |
| २४ | परमार अनिता भरत | २४ | वेतोसकर राजेश शंकर | |
| २५ | पाटील प्रणाली संदिप | २५ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | |
| २६ | गावंड मंदाकिणी आत्माराम | २६ | सुर्यकांत खंडोजी म्हात्रे | |
| २७ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | २७ | सामंत प्रमोद जयराम | |
| २८ | हरिश्चंद्र रामचंद्र आमगावकर | २८ | रकवी सुहास माधवराव | |
| २९ | प्रविण मोरेश्वर पाटील | २९ | पांडे हंसुकुमार कमलकुमार | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३० | शाह राकेश रतिशचंद्र | ३० | खण्डेलवाल सुरेश | |
| ३१ | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | ३१ | वेंचर गिल्बर्ट मेन्डोंसा | |
| ३२ | केळुसकर प्रशांत नारायण | ३२ | डॉ. आसिफ शेख | |
| ३३ | भोईर भावना राजू | ३३ | भोईर कमलेश यशवंत | |
| ३४ | भोईर राजू यशवंत | ३४ | रविंद्र भिमदेव माळी | |
| ३५ | जाधव मोहन महादेव | | | |
| ३६ | मुन्ना सिंग | | | |
| ३७ | ॲड. रवि व्यास | | | |
| ३८ | दिप्ती शेखर भट | | | |
| ३९ | मयेकर सरस्वती रजनीकांत | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**महापौर**
**मिरा भाईदर महानगरपालिका**

# मिरा-भाईदर महानगरपालिका
# मा.महासभा दि. ०४/१२/२०१५

**प्रकरण क्र. :- ११४ जे.एच.पोद्दार मार्ग नो पार्किंग, नो फेरिवाला म्हणून घोषित करणेबाबत...**

**सुचना. :-**

मिरा-भाईदर महानगरपालिका क्षेत्रातील भाईदर (प.) येथील जे.एच.पोद्दार मार्ग नो पार्किंग, नो फेरिवाला म्हणून घोषित करणेबाबतचा विषय आलेला असून सन २००८ मध्ये याबाबतचा ठराव पारित झाला असून अशा ना फेरीवाला क्षेत्र म्हणून घोषित केलेल्या ठिकाणी आजमितीपर्यंत मोठ्या प्रमाणात फेरीवाले बसत असल्यामुळे त्या फेरीवाल्यांवर कार्यवाही न झाल्याच्या अनुषंगाने मिरारोड (पूर्व) प्रभाग क्र. ३८ मध्ये सुध्दा सेक्टर क्र. १ व ४ मधील रस्ताही ना फेरीवाला क्षेत्र म्हणून घोषित केलेला असूनही मा. महासभेपुढे वारंवार याबाबतीत कल्पना देवून सुध्दाही आजमितीपर्यंत प्रभाग कार्यालय क्र. ०५ मधील प्रभाग अधिकाऱ्यांनी कोणत्याही प्रकारची कार्यवाही केलेली दिसून येत नाही. तरी संबधित प्रभाग अधिकाऱ्याला कार्यवाही न केल्याबद्दल तात्काळ निलंबित करण्यांत यावे, अशी सुचना मी मांडत आहे.

[redacted] जसेल पार्क की entry से शिवसेना शाखा तक

नाफेरीवाला झोन Declare करे। वहां चार स्कूल

है, दुसरीतरफ रिक्षा Stand है, और रेलवे सामंतर सारे

फेरीवाले बैठे रहते है    स्थान हेरुकुमार पोले.

दि.ना		04/12/15

प्र. 114 → (1) S.K. Stone to Rassaz Chowk. (2) MTNL Road.

No parking zone.

Dsa

सूचक – Mrs. Merlyn D'Sa

પ્રકરણ ૩૩ ગદ્યે બધુ સરખુ ક્રમાંકના ને
ગોઠવીને ગુલિસ્તાન ગ્રંથ ના પરીવાળા રીતે
ઘોષિત કરવામાં આવે

સૂચક

वार्ड क्र 23 मध्ये दिनांक गल्ली मध्ये वाहन उभी करण नये
असे नागरिकांची मागणी आहे.

सूचना

हाटकेश येथील शांतीविद्यानगरी ते हाटकेश्वर महादेव मंदिर चौक ना फेरीवाला झोन जाहीर करणे

सौ. सुजाता शिंदे

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ०४/१२/२०१५

**प्रकरण क्र. ११४ :- जे.एच. पोद्दार मार्ग नो पार्किंग, ना फेरीवाला म्हणुन घोषित करणे.**

ठराव क्र.८५:-

मिरा भाईंदर क्षेत्रातील भाईंदर (प.), शिवसेना गल्ली, जे.एच. पोद्दार मार्ग मोठ्या प्रमाणात वर्दळीचा व रहदारीचा आहे. सदर परिसरात असलेल्या शाळेमुळे या मार्गावर विद्यार्थ्यांची सतत रेलचेल आहे. सदरचा रस्ता अतिशय अरुंद असुन सदर परिसरातील गणेश देवल नगर परिसरात जवळ जवळ ५०,००० पेक्षा लोकवस्ती आहे. सदर परिसरातील नागरीकांकरीता जे.एच. पोद्दार मार्ग ये-जा करण्याकरीता एकमेव मार्ग असल्याने रस्त्यावर मोठ्या प्रमाणात फेरीवाले बसत असुन नागरीक आपली वाहने रस्त्यावर पार्किंग करीत असल्यामुळे सदर रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर वाहनांची कोंडी होत आहे. यामुळे सदर रस्त्यावर वाहनांना तसेच नागरीक व विद्यार्थ्यांना ये-जा करण्यास अतिशय त्रासदायक होत आहे. सदरचा रस्ता अतिशय अरुंद असून सदर रस्त्याचे रुंदीकरण होणे शक्य नाही.

सदर परिसरातील रस्त्यावर बसणाऱ्या फेरीवाल्यांमुळे तसेच वाहनांच्या पार्किंगमुळे वाहतुकीस व नागरीकांना होणारी अडचण लक्षात घेता जे.एच.पोद्दार रस्ता व जे.एच.पोद्दार क्रॉस रस्ता हा नो पार्किंग झोन व ना फेरीवाला क्षेत्र घोषित करण्यात येत आहे व प्रत्येक नगरसेवकांचे त्यांच्या त्यांच्या प्रभागातील सदर विषयासंदर्भात मोठ्या प्रमाणात तक्रारी अर्ज प्राप्त होत आहेत. याकरीता सदर विषय संदर्भात सर्वपक्षीय गटनेते यांची बैठक आयोजित करुन शहरातील प्रत्येक क्षेत्रातील रस्त्यांबाबत विचार विनीमय करुन निर्णय घेणे योग्य होईल तसेच सर्व सदस्यांनी सदर विषयाबाबत मा. महापौर यांना आपआपल्या प्रभागातील समस्यांबाबत लेखी निवेदन सादर करावे व त्या संदर्भात ठरलेला निर्णयासाठी वरील विषय मंजुर करुन बाकी शेष विषय पुढील सभेत सादर करण्यात यावा असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :- 

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
# मा. महासभा दि. ०४/१२/२०१५

**प्रकरण क्र. ११५ :- रविवार / सोमवार मार्केट बंद करणेबाबत.**

ठराव क्र. ८६ :-

मिरा भाईंदर शहर झपाट्याने वाढत असून शहराची लोकसंख्या जवळजवळ १५ लाखाच्या घरात पोहोचलेली आहे. शहराची शहरीकरण झाले असून शहरात विविध प्रकारचे मॉल, डीपार्टमेंटल स्टोर स्थापित झालेले आहेत त्यामुळे शहरवासीयांना आवश्यक असलेल्या दैनंदिन व घरगुती वापरातील सर्व वस्तु रास्त दराने सहज उपलब्ध होत आहेत. मिरा भाईंदर क्षेत्र पुर्वी ग्रामीण क्षेत्र असल्याकारणाने आठवड्याचा बाजार रविवार/सोमवार यारित्या सुरु होते. शहरीकरणामुळे लोकवस्तीत व वाहतुकीत मोठ्या प्रमाणात वाढ झाली. सदर आठवडा बाजारामुळे मोठ्या प्रमाणात गर्दी होत असून वाहतुकीची कोंडी होत आहे तसेच रहदारीस मोठ्या प्रमाणात अडथळा निर्माण होत आहे. सदर बाजाराच्या गर्दीमुळे चैन स्नॅचिंग, पाकीटमार, महिला व मुलींची छेडछाड इ. गैरप्रकार घडत आहेत.

याकरीता रविवार आठवड्याच्या बाजारात बसणारे "स्थानिक मच्छी विक्रेते, स्थानिक दैनंदिन व घरगुती वापरातील खाद्यपदार्थ, भाजीपाला इ." विक्री करणाऱ्यांना वगळून इतर लोकांना उठविण्यात यावे व सदरचा बाजार नेताजी सुभाषचंद्र बोस मैदानाच्या रस्त्यावरील एका बाजुस वाहतुकीस व रहदारीस अडथळा निर्माण होणार नाही याची दक्षता घेवून सदरचा बाजार स्थलांतरीत करण्यात यावा व सोमवारचा आठवडा बाजार बंद करण्यात यावा असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत केळूसकर　　　अनुमोदक :- श्रीम. सुमन कोठारी**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | शरद केशव पाटील | १ | कॅटलीन ॲन्थोनी परेरा | |
| २ | कोठारी सुमन रमेश | २ | सय्यद नुरजहॉं नझर हुसेन | |
| ३ | सिमा कमलेश शहा | ३ | ध्रुवकिशोर पाटील | |
| ४ | जैन गिता भरत | ४ | डिमेलो बर्नड अल्बर्ट | |
| ५ | अरोरा दिपीका पंकज | ५ | ग्रिटा स्टिफन फॅरो | |
| ६ | रावल भगवती जयशंकर | ६ | शिल्पा भावसार | |
| ७ | मेहता डिंपल विनोद | ७ | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | |
| ८ | मेघना दिपक रावल | ८ | रॉड्रीक्स बाबरा डॉनल्ड | निरंक |
| ९ | शर्मा सुनिला सत्येंद्र | ९ | पाटील वंदना विकास | |
| १० | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | १० | प्रभात प्रकाश पाटील | |
| ११ | सुजाता रविकांत शिंदे | ११ | झिनत रऊफ कुरेशी | |
| १२ | पाटील प्रेमनाथ गजानन | १२ | पुजारी कांचना शेखर | |
| १३ | सिंग मदन उदितनारायण | १३ | पिसाळ मनिषा नामदेव | |
| १४ | कांगणे यशवंत ठकाजी | १४ | डिसा मर्लिन मर्विन | |
| १५ | अनिल बाबुराव भोसले | १५ | वंदना रामदास चक्रे | |
| १६ | कासोदरीया अश्विन श्यामजी | १६ | अनिता जयवंत पाटील | |
| १७ | जैन दिनेश तेजराज | १७ | गोविंद हेलन जॉर्जी | |
| १८ | जैन रमेश धरमचंद | १८ | काझी रशीदा जमील | |

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## महासभा दि :- ०४/१२/२०१५

प्रकरण क्र.११६ : - मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण विभागातील काळजीवाहक यांचे वेतन काळजीवाहकाचे मानधन अंध व अपंग कल्याण योजने लेखाशिर्षातुन अदा करण्याबाबत.

ठराव क्र.८७: -

उपरोक्त विषयान्वये मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण विभागामधील सर्व शिक्षण अभियान अंतर्गत मनपा शाळेमध्ये अपंग विशेष गरजाधारक विदयार्थ्यांची (अपंग मुलांची) काळजी घेण्यासाठी ६ काळजीवाहक नेमण्यात आले होते. परंतु महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद येथे झालेल्या दि.०८/०४/२०१५ रोजीच्या झालेल्या समावेशित शिक्षण समन्वयकाच्या बैठकीमध्ये शासनाकडुन सन २०१५-१६ या वर्षासाठी काळजीवाहक यांच्या मानधनासाठी निधी मंजुर करण्यात आलेला नाही. त्या अन्वये शिक्षण विभागाने सदर काळजीवाहक यांची बैठक घेवुन काळजीवाहन यांना कार्यमुक्त करण्यात आलेले आहे.

तरी विशेष गरजाधारक विदयार्थ्यांची काळजी घेणे अत्यावश्यक आहे व तसेच विशेष गरजाधारक विदयार्थ्यांची गरज लक्षात घेता खालील काळजीवाहकांची सदर मनपा शाळेमध्ये आवश्यकता आहे.

| अ.क्र. | नाव | पद | प्रति माह मानधन |
|---|---|---|---|
| १ | श्रीम. मेघा सावळकर | काळजीवाहक | ४०००/- |
| २ | श्रीम. सायली चव्हाण | काळजीवाहक | ४०००/- |
| ३ | श्रीम. दिपा भोईर | काळजीवाहक | ४०००/- |
| ४ | श्रीम. गुलाब दिवेकर | काळजीवाहक | ४०००/- |
| ५ | श्रीम. सुनिता गोसावी | काळजीवाहक | ४०००/- |
| ६ | श्रीम. राजश्री शर्मा | काळजीवाहक | ४०००/- |

तरी वरील प्रमाणे सर्व काळजीवाहकांचे माहे-एप्रिल २०१५ पासुन ठोक मानधनावर दरमहा वेतन अंध व अपंग कल्याण योजनेच्या "अपंग व मतिमंद मुलांसाठी शासकीय व निमशासकीय हॉस्पिटल मधुन Therapy /शिक्षणासाठी आर्थिक मदत" या लेखाशिर्षातुन अदा करणेस धोरणात्मक निर्णय घेत आहे. सदर योजनेस आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

सुचक :- श्री. शाबद पाटील

अनुमोदन :- श्री. अनिल भोसले

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. ०४/१२/२०१५

**ठराव क्र. ८८ :-**

आज दि. ०४/१२/२०१५ रोजीची सभा तहकुब करण्यात येत आहे, असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत केळूसकर** **अनुमोदक :- श्री. राकेश शाह**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.१८/०१/२०१६

## (दि. ०४/१२/२०१५ रोजीची तहकुब सभा)

**प्रकरण क्र. ११९ :-** सन्मा. सदस्य श्री. ध्रुवकिशोर पाटील यांचा दिनांक २५/११/२०१५ पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. --- महापालिकेच्या वन विभागामार्फत केलेल्या ४५० झाडांचे पुनःरोपण बाबत.

ठराव क्र.९० :-

सदरचा विषय फेटाळण्यात यावा असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. शरद पाटील** **अनुमोदक :- राकेश शहा**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | मेहता नरेंद्र लालचंद | १ | ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | निरंक |
| २ | शरद केशव पाटील | २ | डिमेलो बर्नड अल्बर्ट | |
| ३ | पाटील रोहिदास शंकर | ३ | ग्रिटा स्टिफन फॅरो | |
| ४ | मॉरस जोसेफ रॉड्रीक्स | ४ | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | |
| ५ | म्हात्रे कल्पना महेश | ५ | रॉड्रीक्स बाबरा रॉनल्ड | |
| ६ | मीरादेवी रामलाल यादव | ६ | पाटील सुनिता कैलास | |
| ७ | कोठारी सुमन रमेश | ७ | पुजारी कांचना शेखर | |
| ८ | डॉ. नयना मनोज वसाणी | ८ | पिसाळ मनिषा नामदेव | |
| ९ | सिमा कमलेश शहा | ९ | वंदना रामदास चक्रे | |
| १० | जैन गिता भरत | १० | काझी रशीदा जमील | |
| ११ | अरोरा दिपिका पंकज | ११ | इनामदार जुबेर | |
| १२ | रावल भगवती जयशंकर | १२ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | |
| १३ | मेहता डिंपल विनोद | १३ | सामंत प्रमोद जयराम | |
| १४ | मेघना दिपक रावल | १४ | खण्डेलवाल सुरेश | |
| १५ | शर्मा सुनिला सत्येंद्र | १५ | वेंचर गिल्बर्ट मेन्डोंसा | |
| १६ | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | १६ | अशोक तिवारी | |
| १७ | पाटील प्रेमनाथ गजानन | १७ | म्हात्रे परशुराम पद्माकर | |
| १८ | सिंग मदन उदितनारायण | | | |
| १९ | कांगणे यशवंत ठकाजी | | | |
| २० | अनिल बाबुराव भोसले | | | |
| २१ | कासोदरीया अश्विन श्यामजी | | | |
| २२ | जैन दिनेश तेजराज | | | |
| २३ | जैन रमेश धरमचंद | | | |
| २४ | डॉ. राजेंद्र जैन | | | |
| २५ | निलम हरिश्चंद्र ढवण | | | |
| २६ | शुभांगी महिन कोटियन | | | |
| २७ | परमार अनिता भरत | | | |
| २८ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | | | |
| २९ | हरिश्चंद्र रामचंद्र आमगावकर | | | |
| ३० | प्रविण मोरेश्वर पाटील | | | |
| ३१ | शाह राकेश रतिशचंद्र | | | |
| ३२ | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | | | |
| ३३ | केळुसकर प्रशांत नारायण | | | |
| ३४ | मुन्ना सिंग | | | |
| ३५ | ॲड. रवि व्यास | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

**मा. महासभा दि.१८/०१/२०१६**

१२। (दि. ०४/१२/२०१५ रोजीची तहकूब सभा)

**प्रकरण क्र. ( ) – अनाधिकृत फेरीवाल्यांवर कार्यवाही करणे बाबत.**

**ठराव क्र. –** ६२

उपरोक्त विष्यांबाबत मा. स्थायी समिती, मा. प्रभाग समितीच्या बैठकीत तसेच मा. महासभेत सन्मा. सदस्यांनी चर्चा घडवून आणली व अनाधिकृत फेरीवाल्यांवर कायदेशीर कार्यवाही करणे बाबत प्रशासनाला सुचीत केले पण अद्याप प्रशासनाकडुन कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आलेली नाही व फेरीवाले बिनधास्तपणे धंदा करतात.

अनाधिकृत फेरीवाल्यांना हटवण्या करीता अनेक वेळा सन्मा. सदस्यांचे, पालिका कर्मचा-यांचे व फेरीवाल्यांच्या मध्ये भांडण झाले आहे. या बाबत तक्रारी पोलिस ठाण्यामध्ये नोंद आहे. फेरीवल्यांच्या गुंडांकडुन सन्मा. सदस्यांना जिवे ठार मारण्याचा धमक्या मिळाल्या या बाबत, पालिका कर्मचारी व अधिकारी यांच्यावर गुन्हे दाखल होऊन आरोप-प्रत्यारोप झाले आहे. शहराच्या प्रथम नागरीक मा. महापौर, मा. आमदार, मा. उपमहापौर यांना फेरीवाले हटवीण्याकरीता आंदोलन करावे लागले तातपूर्ती कार्यवाही संबंधीत प्रभागा मध्ये झाली असून संपूर्ण शहरामध्ये कोण्तेहि कार्यवाही झालेली नाही. नुकतेच भाईंदर (प.) येथील जनता नगर येथील रस्त्यावर अनाधिकृतपणे बसणा-या फेरीवाल्यांच्यावर कार्यवाही करते वेळी मनपा कर्मचारी, फेरीवाले व सन्मा. सदस्य यांच्यात वाद झाला व या बाबत पोलिस ठाण्यामध्ये फौजदारी गुन्हा दाखल झालेला आहे.

दररोज संध्याकाळी "मेरी मेन्शन बिल्डींग ते नागेश्वर बिल्डींग पर्यंत" व "बद्रीनाथ बिल्डींग ते देवछाया बिल्डींग ६० फूट रोड पर्यंत" गेल्या काही दिवसापासून मोठ्या प्रमाणात नवीन फेरीवाले बसत आहेत. भाईंदर पश्चिमेस रहदारी करीता छत्रपती शिवाजी महाराज मार्ग (स्टेशन रोड) व डॉ. बाबासाहेब आंबेड्कर मार्ग (६० फूटी रोड) दोनच रस्ते प्रमुख असल्यामुळे वाहतुकीस मोठ्या प्रमाणात अडथळा निर्माण होऊन वाहतुकीची कोंडी व अडथळा होऊन बिकट परिस्थीती झाली आहे. या बाबत मा. प्रभाग अधिकारी, मा. विभाग प्रमुख, अतिक्रमण व बेकायदेशीर बांधकाम नियंत्रण कक्ष यांच्याकडे अनेक वेळा तक्रारी करून देखील कोणतीही कार्यवाही प्रशासनाद्वारे झालेली नाही. मिरारोड पूर्व व भाईंदर (प.) येथे फेरीवाल्यांचा बाबत झालेली घटना पुन्हा डॉ. बाबासाहेब आंबेड्कर मार्ग (६० फूटी रोड) येथे होण्याची शक्यता नाकारता येत नाहीत तसेच असे घटना घड्ल्यास प्रशासन पूर्ण जबाबदार राहील, याची स्पष्ट नोंद घ्यावी.

दि. ०४/०९/२०१५ रोजीच्या मा. महासभेत उपरोक्त विषयाबाबत "ज" अन्वये प्रस्ताव आणला होता त्यावेळी सदरचा विषय पुढील मा. महासभेत रितसरपणे घेण्यात येईल असे ठराव सर्वानुमते मंजूर झाला होता परंतु आजनितीस दि. ०४/१२/२०१५ च्या मा. महासभेत उपरोक्त विषय प्रशासनाकडून आलेला नाही. मिरा-भाईंदर शहरातील अनाधिकृत फेरीवाल-यांवर कडक कार्यवाही करावी व प्रभाग अधिका-यांच्या वर जबाबदारी निश्चित करावी व त्यांनी कार्यवाही न केल्यास त्यांच्यावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनीयम, १९४९ चे कलम ५६ अनव्ये कर्तव्यात हयगय, निषकाळजीपणा बद्दल कायदेशीर कार्यवाही करावी असा मी ठराव मांडत आहे.

**सूचक :-** श्री. ध्रुवकिशोर पाटिल

**अनुमोदक :-** श्री. सुरेश खंडेलवाल

**ठराव सर्वानुमते मंजूर व वाचुन कायम करण्यात आला.**

**महापौर**

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

**मा. महासभा दि.१८/०१/२०१२**

(दि. ०४/१२/२०११ रोजीची तहकूब सभा)

**प्रकरण क्र. (१२३) – भाईंदर (पूर्व) परिसरातील व रेल्वे स्थानक समोरील अनाधिकृत लॉजवर कार्यवाही करणे बाबत .**

**ठराव क्र. –** ९४

मा. महासभा, मा. स्थायी समिती व मा. प्रभाग समिती मध्ये अनेक वेळा भाईंदर (पूर्व) परिसरातील अनाधिकृत लॉजवर कायदेशीर कार्यवाही करणे संबंधीत चर्चा झाली प्रशासनाने तत्वतः त्यावेळी मान्य ही केले परंतु आजतागायत कोणतीही ठोस कार्यवाही झाली नसल्यामुळे अनाधिकृत लॉजेस सर्रास सुरु आहेत.

या लॉजेस मधील गैर प्रकारांमुळे तेथील स्थानिक महिलांना खुपच त्रास सोसावा लागत असून तो त्यांना असह्य झाल्याने हजारों महीलांनी स्वयंस्फुर्ती ने पोलीस स्टेशन वर मोर्चा काढला होता. तेथील परिसरात नागरीकांमध्ये असंतोष पसरला आहे. महापालिके तर्फे भाईंदर (पूर्व) परिसरातील अनाधिकृत लॉजेसचे परवाने रद्द करणे, वाढीव, बेकायदेशीर व अनाधिकृत बांधकाम पाडणे, पाण्याचे नळ जोडणी खंडीत करणे तसेच विज पुरवठा खंडीत करण्याबाबत मेसर्स रिलायन्स इन्फ्रा कं, टाटा पॉवर ई. कंपनीला लेखी कळविणे अश्या प्रकारची ठोस कार्यवाही करण्यात यावी व मा. महासभा दि. २९/०९/२०११ रोजी सुचनेस सर्वानुमते मंजूर झालेला ठराव क्र ६२ चे तंतोतंत पालन करण्यात यावे असे मी जनहितार्थ व कळकळीने ठराव मांडत आहे.

**सूचक :-** श्री. ध्रुवकिशोर पाटील

**अनुमोदक :-** श्री. सुरेश खंडेलवाल

**ठराव सर्वानुमते मंजूर व वाचून कायम करण्यात आला.**

**महापौर**

**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि.१८/०१/२०१६

१२४६ (दि. ०८/१२/२०१५ रोजीची तहकुब सभा)

**प्रकरण क्र. ( ) – अतिक्रमण, अनाधिकृत व बेकायदेशीर बांधकामांचा सुळसुळाट.**

**ठराव क्र. –** ८५

मिरा-भाईंदर मनपा हद्दीत अतिक्रमण, बेकायदेशीर व अनाधिकृत बांधकामात मोठ्या प्रमाणामध्ये वाढ झालेली आहे. बेकायदेशीर व अनाधिकृत बांधकाम तोडण्या बाबत थातुर-मातुर कार्यवाही होते. नुकताच दि. १९ नोव्हेंबर २०१५ रोजी दै. लोकसत्ता च्या अंकात "अनाधिकृत झोपड्यांवर कार्यवाहीचा देखावा" फोटो सहीत बातमी प्रसिध्द झाली आहे. तसेच दैनिक व स्थानीक दैनिक, साप्ताहीक मध्ये बेकायदेशीर व अनाधिकृत बांधकाम संबंधीत बातम्या सतत प्रसिध्द होत असतात.

केंद्र व राज्य शासन, महानगरपालिकेच्या आरक्षणातील जमीनीवर, खाजगी, आदिवासी, CRZ बाधीत, ना विकास क्षेत्रात इत्यादि. जमीनीवर अतिक्रमण, बेकायदेशीर व अनाधिकृत बांधकामे सर्रास व राजरोसपणे सुरु आहेत. केंद्र व राज्य शासनाचा जमीनीवर झोपड्या, चाळी, जुन्या गाळांच्या वाढीव बांधकाम, इमारतींच्या बेकायदेशीर व अनाधिकृत बांधकामांच्या बाबत असंख्य तक्रारी महानगरपालिका, विभाग प्रमुख, अतिक्रमण व बेकायदेशीर बांधकाम नियंत्रण कक्ष तसेच प्रभाग अधिका-यांकडे येत असतात. तरी देखील कोणतीही ठोस कार्यवाही प्रशासनाकडुन होत नाही. मा. उच्च न्यायालय व मा. जिल्हा न्यायालय, ठाणे, यांच्याकडुन अनेक दाव्यांमध्ये स्थगिती आदेश ऊठलेली असले तरी प्रशासनाकडुन बेकायदेशीर व अनाधिकृत बांधकाम तसेच अतिक्रमण काढण्याची व पाडण्याची कार्यवाही होत नाही.

तत्कालीन आयुक्त श्री. विक्रम कुमार (भा.प्र.से) यांनी मिरा-भाईंदर शहरातील व राष्ट्रीय महामार्ग पट्टयातील बेकायदेशीर बांधकाम तोडण्यात आलेला होता त्यावेळी मेसर्स रिलायन्स एनर्जी यांनी दिलेला विज पुरवठा खंडीत करून मीटर काढ़ण्यात आले होते. परंतु पुन्हा प्रशासनाला हाताशी धरून सदर बेकायदेशीर बांधकामांना विद्युत पुरवठा देण्यास शिफारस करण्यात आलेली आहे. अनेक वेळा तक्रारदारांच्या तक्रारी नंतर नोटीस काढुन त्यांना मा. न्यायालयामधुन स्टे आणण्यासाठी संधी दिली जाते. महानगरपालिकेच्या विधी विभागाकडुन केवीयट मा. न्यायालयांमध्ये दाखल करण्यात येत नाही त्यामुळे बेकायदेशीर व अनाधिकृत बांधकाम करणा-यांना स्टे मिळुन जाते व अनेकवेळा मनपाचे वकील देखील

[illegible]

[illegible] प्रभाग अधिकारी हे अतिक्रमण [illegible] अनाधिकृत [illegible]

[illegible]

[illegible]

सूचक

अनुमोदक

ठराव सर्वानुमते मंजूर

[illegible]

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.१८/०१/२०१६
## (दि. ०४/१२/२०१५ रोजीची तहकुब सभा)

**प्रकरण क्र. १२५ :-** **सन्मा. सदस्य श्री. मदन उदितनारायण सिंह यांचा दिनांक २७/११/२०१५ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. --- महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश-२०१५ ची अंमलबजावणी करणेबाबत.**

ठराव क्र.९६:-

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश-२०१५ नुसार नागरीकांच्या सेवेच्या अनुषंगाने संबंधित विभाग प्रमुखांनी आवश्यक ती कार्यवाही मुदतीत पूर्ण करणे क्रमप्राप्त असून याबाबत मा. आयुक्त महोदय, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी जा.क्र.मनपा/सा.प्र./७२८/२०१५-१६, दि. ०७/०७/२०१५ रोजी प्रसिध्द केलेल्या अधिसुचनेची अंमलबजावणी विहित मुदतीत न केल्यास सदर अधिकाऱ्यांवरती ५६ खाली कारवाई करण्यात यावी असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. मदन उदितनारायण सिंह**      **अनुमोदक :- श्रीम. दिपीका अरोरा**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १८/०१/२०१६
## (दि. ०४/१२/२०१५ रोजीची तहकुब सभा)

प्रकरण क्र. १२७ :- सन्मा. सदस्य श्री. दिनेश जैन यांचा दिनांक ३०/११/२०१५ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- शहरातील खाजगी शाळा तसेच महापालिका शाळेत सी.सी.टीव्ही यंत्रणा बसविणेबाबत.

(सदरचा प्रस्ताव मागे घेण्यात आला.)

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १८/०१/२०१६

प्रकरण क्र. १२९ :- दि. १३/०७/२०१५ व दि. २२/०७/२०१५ रोजीच्या मा. विशेष महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

ठराव क्र.९७ :-

दि. १३/०७/२०१५ व दि. २२/०७/२०१५ रोजींच्या मा. विशेष महासभांचे इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

सुचक :- अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजूर

श्री. रोहिदास पाटिल श्री. शरद पाटिल

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १८/०१/२०१६

प्रकरण क्र. १३१ **भारतरत्न पंडित भिमसेन जोशी रुग्णालयासाठी वैद्यकीय अधिकारी संवर्गातील पदांकरीता निवड केलेल्या उमेदवारांच्या नियुक्तीस मान्यता मिळणेबाबत...**

**ठराव क्र. ९९:-**

मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या आदेशानुसार भाईंदर (प.) येथील भारतरत्न पंडित भीमसेन जोशी रुग्णालय हे मिरा भाईंदर महानगरपालिकेने तातडीने कार्यान्वित करणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने विविध संवर्गातील वैद्यकीय अधिकारी (वर्ग-०१) पदावर भरती करणेकरीता दि. ०८/१२/२०१५ रोजी दै. लोकसत्ता, दै. लोकमत, दै. दि फ्री प्रेस जनरल व दै. महाराष्ट्र जनमुद्रा वृत्तपत्रात व महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर जाहिरात प्रसिद्धी केलेली होती.

त्यानुसार पात्र उमेदवारांची दि. २३/१२/२०१५ रोजी थेट मुलाखत घेऊन गुणानुक्रमे उमेदवारांची निवड केलेली आहे. सदर निवड केलेल्या उमेदवारांची निवड व प्रतिक्षा यादी त्याच दिवशी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. या निवड व प्रतिक्षा यादीमधील उमेदवारांची नावे खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | निवड झालेल्या उमेदवारांचे नाव | पद | प्रवर्ग |
|---|---|---|---|
| १. | डॉ. निखाते शरद शामराव | वैद्यकीय अधिकारी (शस्त्रक्रिया) (वेतनश्रेणी – १५६००-३९१०० ग्रे.पे.६६००) | खुला |
| | प्रतिक्षा यादी | | |
| १. | डॉ. अमोल सुरेश पाटील | वैद्यकीय अधिकारी (शस्त्रक्रिया) | - |
| | निवड यादी | | |
| १. | डॉ. सोमाणी मिथुन प्रकाशचंद्र | वैद्यकीय अधिकारी (बालरोग तज्ञ) (वेतनश्रेणी – १५६००-३९१०० ग्रे.पे.६६००) | खुला |
| | प्रतिक्षा यादी | | |
| १. | डॉ. मानसी अर्पित देऊळकर | वैद्यकीय अधिकारी (बालरोग तज्ञ) | - |
| | निवड यादी | | |
| १. | डॉ. आनंदकुमार मंगलदास पंचाल | अस्थिव्यंग शल्य चिकित्सक (वेतनश्रेणी – १५६००-३९१०० ग्रे.पे.६६००) | खुला |
| | प्रतिक्षा यादी | | |
| १. | डॉ. अमित साहेबराव वाघ | अस्थिव्यंग शल्य चिकित्सक | - |
| २. | डॉ. राहूल भास्करराव पाटील | अस्थिव्यंग शल्य चिकित्सक | - |
| ३. | डॉ. आकाश प्रेमलाल रंगारी | अस्थिव्यंग शल्य चिकित्सक | - |
| ४. | डॉ. जितेंद्र नंदकिशोर इरकल | अस्थिव्यंग शल्य चिकित्सक | - |
| | निवड यादी | | |
| १. | डॉ. चैताली विजय धुरी | मनोविकृती चिकित्सक (वेतनश्रेणी – १५६००-३९१०० ग्रे.पे.६६००) | खुला |
| | निवड यादी | | |
| १. | डॉ. रिया उज्वल राठोड | वैद्यकीय अधिकारी (वेतनश्रेणी – १५६००-३९१०० ग्रे.पे.५४००) | खुला |

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १८/०१/२०१६

**प्रकरण क्रमांक १३२ :-** **मिरा भाईंदर महानगरपालिकेची विकास योजना सुधारित करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २४ अन्वये नगररचना अधिकाऱ्याची नियुक्ती करण्याबाबत.**

**ठराव क्रमांक १०० :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्राची विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३८ नुसार सुधारीत करण्याबाबत मा. महासभा ठराव क्र. ७६, दि. १५/१०/२०१५ अन्वये मंजूरी दिलेली असून कलम २३(१) नुसार तसा इरादा जाहिर केल्यासंबंधी स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द करुन शासन राजपत्रासाठी पाठविलेली आहे.

नियोजन प्राधिकरण म्हणून मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सुधारीत विकास योजना तयार करण्याकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २४ प्रमाणे "नगररचना अधिकारी" ची नेमणूक करण्याचा ठराव करणे आवश्यक आहे. सबब शासनाकडून प्रतिनियुक्तीवर असलेले महानगरपालिकेचे विद्यमान नगररचनाकार यांना शासनाच्या पुर्वमंजूरीने "नगररचना अधिकारी" म्हणून नेमणूक करण्यासाठी ही सभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत केळूसकर** **अनुमोदन :- श्री. राकेश शाह**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | अ.क्र. | तटस्थ |
|---|---|---|---|---|---|
| १ | नरेंद्र एल. मेहता | १ | प्रभात प्रकाश पाटील | १ | कॅटलीन ॲन्थोनी परेरा |
| २ | शरद केशव पाटील | २ | पाटील सुनिता कैलास | २ | ध्रुवकिशोर पाटील |
| ३ | पाटील रोहिदास शंकर | ३ | झिनत रऊफ कुरेशी | ३ | डिमेलो बर्नड अल्बर्ट |
| ४ | म्हात्रे कल्पना महेश | ४ | विराणी रेखा अनिल | ४ | ग्रिटा स्टिफन फॅरो |
| ५ | भानुशाली वर्षा गिरीधर | ५ | पुजारी कांचना शेखर | ५ | असेन्ला मेन्डोंसा परेरा |
| ६ | मिरादेवी रामलाल यादव | ६ | पिसाळ मनिषा नामदेव | ६ | शिल्पा भावसार |
| ७ | कोठारी सुमन रमेश | ७ | डिसा मर्लिन मर्विन | ७ | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स |
| ८ | डॉ. नयना मनोज वसाणी | ८ | काझी रशीदा जमील | ८ | रॉड्रीक्स बाबरा डॉनल्ड |
| ९ | सिमा कमलेश शहा | ९ | इनामदार जुबेर | ९ | दक्षता राजेंद्र ठाकूर |
| १० | जैन गिता भरत | १० | वेतोसकर राजेश शंकर | १० | पाटील वंदना विकास |
| ११ | अरोरा दिपीका पंकज | ११ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | ११ | शबनम लियाकत शेख |
| १२ | रावल भगवती जयशंकर | १२ | सामंत प्रमोद जयराम | १२ | वंदना रामदास चक्रे |
| १३ | मेहता डिंपल विनोद | १३ | पांडे हंसुकुमार कमलकुमार | १३ | अनिता जयवंत पाटील |
| १४ | मेघना दिपक रावल | | | १४ | गोविंद हेलन जॉर्जी |
| १५ | शर्मा सुनिला सत्येंद्र | | | १५ | खण्डेलवाल सुरेश |
| १६ | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | | | १६ | वेंचर गिल्बर्ट मेन्डोंसा |
| १७ | पाटील प्रेमनाथ गजानन | | | १७ | मेन्डोंसा स्टिवन जॉन |
| १८ | सिंग मदन उदितनारायण | | | १८ | डॉ. आसिफ शेख |
| १९ | कांगणे यशवंत ठकाजी | | | १९ | नरेश तुकाराम पाटील |
| २० | अनिल बाबुराव भोसले | | | २० | भोईर कमलेश यशवंत |
| २१ | कासोदरीया अश्विन श्यामजी | | | २१ | रविंद्र भिमदेव माळी |
| २२ | जैन दिनेश तेजराज | | | २२ | वंदना मंगेश पाटील |
| २३ | जैन रमेश धरमचंद | | | २३ | अशोक तिवारी |
| २४ | डॉ. राजेंद्र जैन | | | | |
| २५ | तारा विनायक घरत | | | | |
| २६ | जयमाला किशोर पाटील | | | | |
| २७ | परमार अनिता भरत | | | | |
| २८ | पाटील प्रणाली संदिप | | | | |

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. विशेष महासभा दि.१८/०१/२०१६

**प्रकरण क्रमांक ( १३३ )** :- राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ वर दिल्ली दरबार नाल्यावर सर्व्हीस रस्ता रुंदीकरणासाठी कल्वर्ट बांधणे कामाच्या खर्चास प्रशासकिय व आर्थिक मान्यता देणे.

**ठराव क्र. ( ९०१ ) :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ वरील दहिसर चेक नाका ते काशिमीरा नाल्यापर्यंत रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर वाहतुक होत असून सदर रस्त्यावरील दोन्ही बाजुतील सर्व्हीस रस्त्याचे रुंदीकरण करण्याचे काम महानगरपालिकेमार्फत हाती घेण्यात आलेले आहे. सदर कामांतर्गत दिल्ली दरबार येथील नाल्यावर कल्वर्ट बांधुन रस्ता रुंद करावयाचा आहे. त्यासाठी रु.१,३२,६३,०००/- रकमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. सदर कामाच्या खर्चास प्रशासकिय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :-** श्री. प्रशांत दळवी

**अनुमोदक :-** श्री. प्रभाकर म्हात्रे

**ठराव सर्वानुमते मंजुर.**
**ठराव वाचुन कायम केला आहे.**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

PC-2/15-16/DK/MT-15

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.१८/०१/२०१६

**प्रकरण क्र. १३४ :-** **मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत विविध सेवा संस्थाना डक्ट/ केबलसाठी आकारण्यात येणाऱ्या रस्ता फोड फी दर सुधारीत करणेबाबत.**

**ठराव क्र. १०२ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सार्वजनिक रस्ते विविध सेवा वाहीन्या टाकण्यासाठी सेवा संस्था मार्फत खोदण्यात येतात. त्यासाठी महानगरपालिकेमार्फत ठरलेले दर आकारुन परवानग्या देण्यात येतात व सदर रस्ते महानगरपालिकेमार्फत दुरुस्ती करण्यात येतात सद्यस्थितीत आकारण्यात येणाऱ्या दरात वाढ करण्याची आवश्यकता असुन ठाणे महानगरपालिकेच्या धर्तीवर इतर अत्यावश्यक कामे व दंड रक्कम आकारण्याचा प्रस्ताव खालील प्रमाणे सादर करण्यात आला आहे.

| अ.क्र | रस्त्याचा प्रकार/ पुर्नपृष्ठीकरण पृष्ठभाग | प्रस्तावित दर |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १. | रस्त्याखालुन भुयारी मार्गाने ड्रिलींग करणे | रु. २०००/-प्रति रनिंग मिटर |
| २. | ग्राऊंटीग केलेला रस्ता | रु. ३९००/-प्रति चौ.मी |
| ३. | कच्चा रस्ता | रु. २०९०/-प्रति चौ.मी |
| ४. | डब्ल्यु बी.एम.रस्ता | रु. ३३००/-प्रति चौ.मी |
| ५. | कॉक्रीट रस्ता | रु. ११७००/-प्रति चौ.मी |
| ६. | डांबरी रस्ता | रु. ९६००/-प्रति चौ.मी |
| ७. | कॉक्रीट पदपथ | रु. ५५००/-प्रति चौ.मी |
| ८. | फ्लायओव्हर | रु. १३००००/-प्रति चौ.मी |
| ९. | सब-वे | रु. ७८००००/-प्रति चौ.मी |
| १०. | कल्व्हर्ट | रु. ५७२००/-प्रति चौ.मी |
| ११. | पदपथ<br>१) पेव्हर ब्लॉक वगळता इतर पृष्ठभाग (पुर्नपृष्ठीकरण पेव्हर ब्लॉक)<br>२) पेव्हर ब्लॉक वगळता इतर पृष्ठभाग (पुर्नपृष्ठीकरण लॅक कॉटेड पेव्हर ब्लॉक)<br>३) पेव्हर ब्लॉक<br>४) लॅकर कॉटेड पेव्हर ब्लॉक (पुर्नपृष्ठीकरण लॅकर कॉटेड पेव्हर ब्लॉक) | सर्व पदपथासाठी रु. ५५००/- प्रति चौ.मी |
| १२. | रस्ता<br>१) मास्टीक अस्फाल्ट<br>२) डांबरी ६०/७० ग्रेड<br>३) डांबरी ३०/४० ग्रेड<br>४) पेव्हर ब्लॉक ८०मी.मी<br>५) पेव्हर ब्लॉक १००मी.मी | <br>रु.७९००/- प्रति चौ.मी<br>रु.९६००/-प्रति चौ.मी<br>रु.९६००/-प्रति चौ.मी<br>रु.५५००/-प्रति चौ.मी<br>रु.५५००/-प्रति चौ.मी |
| १३. | केबल अंथरण्यासाठी अस्तीत्वातील डक्ट वापरणे | रु. ३०००/- प्रति मी/ प्रति केबल |
| १४. | जास्त क्षेत्रफळाच्या डक्ट केबलसाठीचे दर | ६ इंच (१८२.३२ चौ.सेमी) साठी वरील प्रमाणे प्रमाणीत दर त्यापुढील क्षेत्रफळासाठी रस्ता खोदाईमध्ये प्रो रेटा प्रमाणे येणारे अतिरीक्त रस्ता |

| | | |
|---|---|---|
| | | खोदाई आकारणी |
| १५. | एच.डी.डी /ओपन कट मधील चेंबर्स | वरील अ क्र २ ते १२ प्रत्यक्ष मोजमापाप्रमाणे अधिक ५०% |
| १६. | शिवाजी महाराज मार्ग | रु.१०,३३०/- |
| १७. | रस्त्याची खोलीचे खोदाईचे दर | १) १ मी किंवा त्यापेक्षा कमी खोली खोदाईसाठी – १मी खोली खोदाईप्रमाणे असणारे वरीलप्रमाणे प्रमाणीत दर<br>२) १ मी पेक्षा जास्त खोली खोदाईसाठी वरील १ मी प्रमाणे प्रमाणीत दर अधिक वाढीव खोलीसाठी प्रो रेटा प्रमाणे वाढीव दर |
| १८. | रस्त्याच्या रुंदीकरीता दर | १) १ मी किंवा त्या पेक्षा कमी रुंदीसाठीचे खोदाईसाठी १ मी रुंदी प्रमाणे असणारे वरील प्रमाणे प्रमाणीत दर<br>२) १ मी पेक्षा जास्त रुंदी खोदाईसाठी वरील १ मी प्रमाणे प्रमाणीत दर अधि वाढीव रुंदीसाठी प्रो रेटा प्रमाणे येणारे वाढीव दर |
| १९. | दोषदायित्व कालावधीमध्ये आकारावयाचे दर, | १) दोषदायित्व कालावधीचे १ ले वर्ष वरील दराप्रमाणे येणारी रक्कम अधिक १०० % जास्त<br>२) दोषदायित्व कालावधीचे २ रे वर्ष वरील दराप्रमाणे येणारी रक्कम अधिक ५०% जास्त<br>३) दोषदायित्व कालावधीचे ३ रे वर्ष वरील दराप्रमाणे येणारी रक्कम अधिक २५% जास्त |
| २०. | दंडात्मक आकारणी<br>१) पुर्नपृष्ठीकरण फी चा भरणा केला नाही / परंतु विना परवानगी रस्ते खोदाई केली नाही. (बदल नाही)<br>२) पुर्नपृष्ठीकरण फी चा भरणा केला आहे. / परवानगी पत्र दिले नाही / परंतु विना परवानगी रस्ते खोदाई केली आहे (बदल नाही)<br>३) पुर्नपृष्ठीकरण फी चा भरणा केला आहे. / परवानगी पत्र दिले आहे. / परंतु विहीत मुदतीत काम पुर्ण केले नाही.<br>४) डक्ट केबल टाकण्याचे काम झाले आहे. परंतु अतिरीक्त माती उचलण्यात आलेली नाही<br>५) रस्ता खोदाई परवानगी मधील अटी व शर्ती नियमांचे पालन न केल्यास<br>६) दंडात्मक रक्कम न भरल्यास | १) पुर्नपृष्ठीकरण फी अधिक पुर्नपृष्ठीकरण फी च्या ५०% दंडात्मक रक्कम<br>२) पुर्नपृष्ठीकरण फी च्या २५% दंडात्मक रक्कम<br>३) मुदत संपल्यानंतर रु. १३००/- प्रति दिन<br>४) प्रति ट्रक / डंपर फेऱ्यास रु.२६००/- प्रमाणे दंड आकारणी<br>५) सुरक्षा अनामत रक्कमेपासुन वसुल करण्यात येईल<br>६) सुरक्षा अनामत रक्कमेपासुन वसुल करण्यात येईल |
| २१. | भुईभाडे आकारणी | रु. १०/- प्रति वर्ष प्रति मीटर या प्रमाणे २० वर्षासाठी एकरकमी रु २००/- प्रति मीटर |
| २२. | मायक्रोट्रेन्चींग | मायक्रोटेन्चींगव्दारे परवानगी देऊ नये |
| २३. | सुरक्षा अनामत | एकूण आय आय चार्जेसच्या १० टक्के |
| २४. | पर्यवेक्षक फी | एकुण आर आय चार्जेसच्या १५ टक्के |

वर नमुद केलेल्या रस्त्याचे प्रकारात तसेच उपरोक्त नविन प्रस्तावित केलेल्या दरात इतर स्वायत्त संस्था आकारत असलेल्या दराप्रमाणे दर आकारल्यास महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ होणार आहे व विना परवानगी तसेच अटीशर्ती व सुरक्षीततेच्या नियमांचे पालन न करात खोदाई कामे करणाऱ्यावर दंडात्मक कारवाई करता येऊ शकेल. जे रस्ते नव्याने तयार करण्यात आले

आहेत. त्यावर खोदाई करणेस शक्यतो मनाई करण्यात यावी. तथापी अपवादात्मक स्थितीमध्ये परवानगी देणे आवश्यक असल्यास दोषदायित्वाचा कालावधीस अनुसरून रक्कम आकारणी करावी.

वरील कामामध्ये खोदाईसाठी सरासरी १.०० मीटर रुंदीसाठी दर आकारण्यात यावेत. विविध सेवा संस्थामार्फत डक्ट/ केबल साठी आकारण्यात येणाऱ्या रस्ता फोड फी मधील सुरक्षा अनामत ही १ वर्षानंतर परत करण्यात यावी.

वरीलप्रमाणे दर आकारण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- सौ. निलम ढवण अनुमोदक :- सौ. अनिता परमार**

**सदर ठरावामध्ये सुचक श्री. जुबेर इनामदार व अनुमोदक श्री. ध्रुवकिशोर पाटील ह्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत विविध सेवा संस्थाना डक्ट/ केबलसाठी आकारण्यात येणाऱ्या रस्ता फोड फी दर सुधारीत करणेबाबत महानगरपालिकेच्या प्रस्तावित गोषवाऱ्यामध्ये अनुक्रमांक २१ "भुईभाडे" या शिर्षकामध्ये उल्लेखनिय बाबींचा समावेश करावा.

विविध कंपनीच्या माध्यमातून केबलच्या तांत्रिक बाबीसाठी बांधण्यात येणाऱ्या चेंबर्सवर प्रतीवर्ष प्रतीमिटर रु. २४,०००/- शुल्क आकारण्यात यावे. १ मीटर ते २ मीटर पर्यंत रु. ४८,०००/- व याचप्रमाणे अधिक क्षेत्रफळानुसार वाढीव शुल्क आकारण्यात यावे. तसेच तुटलेल्या चेंबर्सची डागडुजी करण्याची व त्याच्यावरती झाकणे बदलण्याची जबाबदारी संबंधीत संस्थांनी काटेकोरपणे करावी व सदर कामामध्ये त्यांनी हलगर्जीपणा केल्यास त्यांच्यावर प्रतीदिन रु. ३,०००/- प्रमाणे दंडाची रक्कम आकारावी, अशी मी सुचना मांडत आहे. तसेच सदर कंपनीने या अगोदर तयार केलेल्या डक्ट (चेंबर्स) चे शुल्क उपरोक्त दराप्रमाणे आकारुन वसुल करण्यात यावेत.

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजुर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
# मा. महासभा दि.१८/०१/२०१६

**प्रकरण क्र.१३६ :** **मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध शाळांमध्ये सी. सी. टी.व्ही. यंत्रणा कार्यान्वित करणेबाबत.**

**ठराव क्र. १०४ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात महानगरपालिकेच्या एकूण ३५ शाळा कार्यान्वित आहेत. या शाळांमधील विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने शाळांमध्ये सी. सी. टी. व्ही. यंत्रणा कार्यान्वित केलेस देखरेख ठेवणे सोईचे होईल. याकामी सी. सी. टी. व्ही. कॅमेरे, डी. व्ही. आर खरेदी व इन्स्टॉलेशन याकामी अंदाजे ५० लाखापर्यंत खर्च अपेक्षित आहे. उपरोक्त कामी संगणक विभागाच्या "संगणक सॉफ्टवेअर, हार्डवेअर साहित्य खरेदी" या लेखाशिर्षा अंतर्गत रू. २.५० कोटी इतकी तरतूद करण्यात आलेली आहे. प्राप्त तरतूदीतून मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या ३५ शाळांमध्ये सी. सी. टी. व्ही. यंत्रणा कार्यान्वित करणेकामी होणाऱ्या खर्चास ही महासभा मंजुरी देत आहे.

याशिवाय महानगरपालिका क्षेत्रातील सर्व अनुदानित, विना-अनुदानित, खाजगी शाळा, संस्था संचलित शाळा, महाविद्यालये व लहान-मोठ्या सर्व शाळांमध्ये सी. सी. टी. व्ही. कॅमेरे लावणे महानगरपालिकेने बंधनकारक करावे. तसेच महानगरपालिकेच्या ताब्यातील सर्व इमारतींमध्ये देखिल महानगरपालिकेने सी. सी. टी. व्ही. यंत्रणा कार्यान्वित करावी.

**सुचक :- श्री. रोहिदास पाटील** **अनुमोदक :- श्री. नयना वसाणी**

**सदर ठरावामध्ये सुचक श्री. ध्रुवकिशोर पाटील व अनुमोदक श्री. जुबेर इनामदार ह्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

३५ शाळेंच्या सर्व वर्गात कॅमेरे बसवावेत, त्यामध्ये आवाज रेकॉर्ड करण्याची सुविधापण असावी. सर्व कॅमेऱ्यांचे नेटवर्कींग करुन मा. शिक्षण अधिकारी व मा. आयुक्त यांना त्यांच्या कार्यालयात बसून पहाता येईल अशी व्यवस्था करावी. यामुळे शिक्षक कसे शिकवतात व त्यांची उपस्थिती, शाळेचा कारभार कसा चालत आहे हे पहाता येईल, याने शिक्षणाचा दर्जा सुधारणेस मदत होईल अशी मी सुचना मांडत आहे.

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजुर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.१८/०१/२०१६

**प्रकरण क्रमांक ( १३७ )** :- महापौर चषक २०१६ आयोजित करणेसाठी खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणेबाबत...

**ठराव क्रमांक ( १०५ )** :-

मिरा भाईंदर महानगरपालिका शहरातील विविध शाळा, विद्यालये, महाविद्यालयातील होतकरू खेळाडूंच्या सुप्त गुणांना प्रोत्साहन मिळावे तसेच सदर खेळाडूंना एक नविन व्यासपीठ उपलब्ध होऊन त्यामधील काही खेळाडू पुढे येऊन राज्य, राष्ट्रीय तसेच जागतिक स्तरावर आपले, आपल्या शहराचे नाव गौरांन्वित करतील या हेतूने मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत महापौर चषक क्रिडा स्पर्धा अंतर्गत शालेय क्रिडा स्पर्धेचे आयोजन करण्यासाठी मा. महापौर यांनी कळविलेले आहे.

सदर स्पर्धेचे मोठ्या स्वरूपात व अतिशय कमी वेळेत आयोजन करावयाचे असल्याने या कामाच्या आयोजनाचा अनुभव असलेल्या संस्थांना सर्व कामासाठी नेमावे लागेल (Sport's Event Management Agency)

सदर महापौर चषक स्पर्धेतंर्गत खालील खेळ आयोजित करावयाचे आहेत.

१) कबड्डी
२) खो-खो
३) बास्केट बॉल
४) व्हॉली बॉल
५) फुटबॉल
६) लंगडी
७) क्रिकेट
८) बुध्दीबळ
९) टेबल टेनिस
१०) बँडमिन्टन
११) शरीर सौष्ठव
१२) गायन
१३) चित्रकला
१४) नाच
१५) एकांकीका स्पर्धा
१६) धावणे (Athlatyics)
१७) कुस्ती
१८) वकृत्व स्पर्धा

वरील स्पर्धाच्या आयोजनासाठी सर्व साधारणपणे रोख बक्षिसे, ट्रॉफी यावर रु.१२.०० लक्ष, पंच, रेफरी, जज यांच्यावर रु.२३.०० लक्ष एवढा खर्च होईल. तसेच स्टेशनरी, स्कोअर शीट, खेळाचे साहित्य यावर रु.६.०० लक्ष एवढा तर खानपान, चहापाण्यावर रु.३.०० लक्ष, मिडीया पब्लीसीटी वर रु.१०.०० लक्ष, मंडप, खुर्च्या, माईक सिस्टीम व इतर साहित्य, फोटोग्राफी, व्हिडीयो शुटींग, टी-शर्ट कॅप, इ. वर रु.१३.०० लक्ष असे मिळून ६७.०० लक्ष एवढा खर्च होऊ शकेल. सदर कामावर होणा-

त्या खर्चासाठी सन २०१५-१६ या वर्षाच्या अर्थसंकल्पात "महापौर चषक" या लेखाशिर्षातर्गत रु.१.०० कोटी तरतूद उपलब्ध आहे. तथापी (Sport's Event Management) ची नेमणूक करुन त्यांच्यामार्फत व स्पर्धेच्या आयोजनाची जबाबदारी टाकण्यासाठी निविदा मागवाव्या लागतील व सदर निविदा मा. स्थायी समितीने मान्य केल्यानंतर संस्थेस कार्यादेश देऊन पुढील कामे करावी लागतील. तसेच स्पर्धेच्या विविध स्तरावरील नियंत्रणासाठी विविध विभागप्रमुख, अधिकारी कर्मचारी यांना कामे नेमून द्यावी लागतील.

महापौर चषक - २०१६ स्पर्धेतील प्रत्येक खेळातील विजेता खेळाडूंना बक्षिस स्वरुपात रोख रक्कम देणेस्तव अग्रीम रक्कम उपलब्ध करुन देणे व बक्षिसाची रक्कम ठरविण्याचे अधिकार मा. आयुक्त सो. यांना देण्यात येत आहेत. सदर महापौर चषक - २०१६ याकरीता अंदाजित रक्कम रु.६७ लक्ष किंवा त्यापेक्षा अधिक खर्च अपेक्षित असून येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. शरद पाटील** **अनुमोदक :- श्रीम. वर्षा भानुशाली**

**सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्य श्री. प्रेमनाथ पाटील ह्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

२०१५/१६ मध्ये होणाऱ्या महापौर चषकामध्ये क्रिकेट स्पर्धेमध्ये पोलीस, नगरसेवक, सी.ए. डॉक्टर, मनपा कर्मचारी, पत्रकार, वकील यांचे सामने समाविष्ट करावे अशी माझी सुचना आहे.

**सदर ठरावामध्ये सुचक श्री. ध्रुवकिशोर पाटील व अनुमोदक श्री. जुबेर इनामदार ह्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

मिरा भाईंदर शहरातील बहुतेक खाजगी शाळांमध्ये विद्यार्थ्यांना विविध खेळामध्ये मार्गदर्शन करण्याकरीता प्रशिक्षित शिक्षक असतात व ते विद्यार्थ्यांना विविध खेळ शिकवून नित्यनियमाने सराव करुन घेतात. तसेच त्या विद्यार्थ्यांना विविध स्पर्धेमध्ये त्यांच्या शाळेच्या माध्यमातून जिल्हा, राज्य व राष्ट्रीय स्पर्धेत खेळविले जाते. अशाप्रकारची सुविधा आपल्या महानगरपालिकेच्या शाळेमध्ये नाही त्यामुळे महानगरपालिकेतर्फे आयोजित केलेल्या मनपा चषकात त्यांचा ठिकाव लागणार नाही असे दिसते. त्यामुळे मनपा शाळेच्या विद्यार्थ्यांना याच स्पर्धे बरोबर स्वतंत्र महापौर चषक या विद्यार्थ्यांकरीता आयोजित करावा. जेणेकरुन त्यांना दोन्ही स्पर्धेत भाग घेता येईल अशी मी सुचना मांडत आहे.

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजुर.**
**ठराव वाचुन कायम केला आहे.**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १८/०१/२०१६

प्रकरण क्र. १३८ :- विविध विकास कामांना प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे.

(सदरचा प्रस्ताव मागे घेण्यात आला.)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि.१८/०१/२०१६

**प्रकरण क्र.१३९ :-** **महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या विविध लाभाच्या दरात वाढ/सुधारणा करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**ठराव क्र.१०६ :-**

महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील विविध पदावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना विविध वेतनेतर लाभ देण्यात येतात. महानगरपालिकेतील कर्मचाऱ्यांना सहावा वेतन आयोग लागू झाल्यानंतर वेतनेतर लाभाच्या दरात वाढ/सुधारणा करणे आवश्यक होते. याबाबत कर्मचारी यांचेकडून तसेच कर्मचारी संघटनेकडून सदर लाभाच्या दरात वाढ करणेबाबत वारंवार मागणी होत आहे. या अनुषंगे महानगरपालिकेतील कर्मचाऱ्यांना खालीलप्रमाणे वेतनेतर लाभाच्या दरात वाढ/सुधारणा करणेचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | वेतनोत्तर लाभाचा प्रकार | ज्या कर्मचाऱ्यांना सदरचा लाभ देण्यात येतो त्याचा तपशिल | सध्या देण्यात येत असलेला दर | वाढ/सुधारणा करावयाचे लाभाचे दर |
|---|---|---|---|---|
| १. | धुलाई भत्ता | अग्निशमन विभागातील अधिकारी /कर्मचारी, वाहन चालक, व्हॉलमन, प्लंबर, फिटर, शिपाई, मजूर, वैद्यकीय सेवेतील कर्मचारी इत्यादी. ज्या कर्मचाऱ्यांना गणवेश देण्यात येतो ते अधिकारी/कर्मचारी | रु.३०/- प्रती महिना | रु.१५०/- प्रती महिना |
| २. | घाण भत्ता | प्रत्यक्ष साफसफाईचे काम करतात अशा सफाई कामगारांना | रु.३०/- प्रती महिना | रु.१००/- प्रती महिना |
| ३. | फिरती भत्ता | महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील तृतीय व चर्तुथ श्रेणी या संवर्गातील कर निरिक्षक, वरिष्ठ लिपीक, सर्व्हेअर, स्वच्छता निरिक्षक, इमारत निरिक्षक, कनिष्ठ अभियंता, तसेच शिपाई व इतर चर्तुथ श्रेणी कर्मचारी यांना महानगरपालिकेच्या कामकाजानिमित्त, कार्यालय सोडून मनपा क्षेत्रात अथवा मनपा क्षेत्राच्या बाहेर मुंबई, ठाणे येथे ज्या कर्मचाऱ्यांना फिरती करावी लागते तसेच ज्या कर्मचाऱ्यांना वाहन उपलब्ध करुन दिले जात नाही, अशा कर्मचाऱ्यांना. | रु.१०००/-प्रती महिना | रु.१२००/- प्रती महिना |
| ४. | सायकल भत्ता | पाणीपुरवठा विभागातील व्हॉलमन, प्लंबर,फिटर इत्यादी व सार्वजनिक बांधकाम विभागातील चर्तुथ श्रेणी कर्मचारी यांना दैनंदिन कामानिमित्त महानगरपालिकेच्या क्षेत्रात फिरावे | सद्यस्थितीत सायकल भत्ता अदा केला जात नाही. | रु.२००/- प्रती महिना |

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा.महासभा दि.१८/०१/२०१६

प्रकरण क्र. (१४०) :- मिरा भाईंदर शहरातील आरक्षण क्र. ३०२ (म्युनिसिपल हॉस्पिटल ) विकसीत करणेबाबत व चालविणेबाबतचा प्रस्ताव राज्य शासनास पाठविणेबाबत.

ठराव क्र. :- १०५

मिरा भाईंदर शहराच्या मंजूर विकास योजनेमध्ये मौजे नवघर, स.क्र. (जुना) ४५२पै., ३९२पै., ३९०पै., ३९१पै., ३९३पै. (नविन) १५२पै., १५३पै., १५४पै., १६१पै., १६२पै. या जागेमध्ये आ.क्र. ३०२ (म्युनिसिपल हॉस्पिटल ) हे आरक्षण दर्शविलेले असून मंजूर विकास योजनेप्रमाणे सदर आरक्षणाचे एकूण क्षेत्र १३६०० चौ.मी. आहे. यापैकी महानगरपालिकेच्या ताब्यातील क्षेत्र ९५०.०३ चौ.मी. असून उर्वरीत क्षेत्र खाजगी मालकीचे आहे.

सदरचे आरक्षण समावेशक आरक्षणाच्या तरतुदी अन्वये जागामालकास विकसीत करणेसाठी यापुर्वी जा.क्र. मनपा/नर/८६०/२००७-०८, दि.११/०६/२००७ अन्वये रेखांकन नकाशे मंजूरीसह अकृषिक परवानगी प्राप्त करण्यासाठी नाहरकत दाखला दिलेला असून सदरच्या परवानगीसाठी दि.१७/१०/२००८ रोजी १ वर्षाची मुदतवाढ दिलेली आहे. सदरच्या परवानगीची मुदत संपलेली असून परवानगी व्यपगत झालेली आहे.

मिरा भाईंदर शहरासाठीच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीप्रमाणे आरक्षणाच्या क्षेत्राच्या २५% प्रमाणेचे बांधीव क्षेत्र महानगरपालिकेस हस्तांतरीत करणेच्या अटीवर जागामालक / अधिकारपत्रधारक आरक्षणाचा विकास करु शकतो.

तसेच विकास योजनेमधील आरक्षणे समावेशक आरक्षणाच्या माध्यमातून विकास योजनेची अंमलबजावणी संदर्भात नविन विनियम अंतर्भुत करण्यासाठी शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार दि.३०/०४/२०१५ अन्वये प्रस्तावित केलेले असून त्याप्रमाणे आ.क्र. ३०२ (म्युनिसिपल हॉस्पिटल ) या आरक्षणाच्या क्षेत्रापैकी ५०% प्रमाणेचे बांधीव क्षेत्र जागामालकांनी महानगरपालिकेस हस्तांतरीत करणे आवश्यक आहे तथापि सदरचे फेरबदल अद्याप मंजूर झालेले नाहीत.

वरील दोन्ही प्रमाणे पैकी जागामालक / अधिकारपत्रधारक यांनी महानगरपालिकेस बांधीव क्षेत्र महानगरपालिकेस हस्तांतरित केल्यास महानगरपालिकेस फक्त बांधीव इमारत मिळणार आहे. त्यानंतर सदर इमारतीमध्ये अंतर्गत सजावटीसह यंत्र सामुग्री व अधिकारी, कर्मचारी वर्ग लागणार असून त्यासाठीचा खर्च महानगरपालिकेस परवडणारा नाही.

यास्तव आ.क्र.३०२ (म्युनिसीपल हॉस्पिटल) या आरक्षणाने बाधीत जागा महानगरपालिकेने ताब्यात घेऊन त्या जागेवर शासनामार्फत हॉस्पिटल बांधून चालविण्यासाठीचा प्रस्ताव शासनास सादर करणेस व सदर आरक्षण क्र. ३०२ (म्युनिसीपल हॉस्पिटल) या जागेत बांधण्यात आलेल्या वास्तुस स्व. श्री. धर्मवीर आनंद दिघे असे नाव देण्यात येत आहे.

मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेने भारतरत्न पंडित भीमसेन जोशी रुग्णालय हे टप्पाटप्प्याने चालू करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार सद्यस्थितीत रुग्णालयातील १०० खाटा कार्यान्वित करण्यात आल्या आहेत. उर्वरित १०० खाटा मार्च २०१८ पर्यंत कार्यान्वित करावयाच्या आहेत. सदर रुग्णालयाच्या बांधकामापोटी आजपर्यंत रु. १८.३६ कोटी खर्च झाला असून उपकरणे व साहित्य यासाठी रु. ५.४० कोटी खर्च झाला आहे. सदर २०० खाटांचे रुग्णालय चालविण्यासाठी महानगरपालिकेस वार्षिक अंदाजे रु. २०-२५ कोटी खर्च अपेक्षित आहे. सद्यस्थितीत स्थानिक संस्था कर बंद झाल्याने महानगरपालिकेची आर्थिक स्थिती नाजूक आहे. तसेच रुग्णालयासाठी आवश्यक तज्ज्ञांची पदे तीन वेळा जाहिरात देऊन, भरती प्रक्रिया राबवूनही महानगरपालिकेस मिळालेली

नाहीत. त्यामुळे वैद्यकीय तज्ज्ञांच्या अभावी रुग्णालय सुरळीतपणे चालविणे शक्य होणार नाही व नागरिकांना दर्जेदार वैद्यकीय सुविधा मिळणार नाहीत.

सदर रुग्णालयाच्या उद्‌घाटन प्रसंगी राज्याचे सन्मा. आरोग्यमंत्री डॉ. दिपक सावंत यांनी, राज्याच्या विधी मंडळात शासनाने दिलेल्या आश्वासनानुसार, महानगरपालिकेचे हे रुग्णालय उप-जिल्हा रुग्णालयाचा दर्जा देऊन शासनामार्फत चालविले जाईल, असे आश्वासन दिले आहे. तसेच राज्याचे सन्मा. वित्त आणि नियोजन, वने मंत्री, श्री. सुधीर मुनगंटीवार यांनीही सदर उद्‌घाटन प्रसंगी रुग्णालय चालविण्यासाठी आवश्यक निधीची शासन तरतूद करेल असे आश्वासन दिले आहे.

महानगरपालिकेच्या नाजूक आर्थिक स्थिती लक्षात घेता, तसेच महानगरपालिकेतील इतर पायाभूत सुविधा विकसित करण्यासाठी शासन विविध योजना व अनुदानांच्या स्वरुपात मदत करत आहे, ही वस्तुस्थिती पाहता, सदर रुग्णालय चालविण्यासाठीही शासनाकडून मदत घेणे आवश्यक आहे.

सबब, मिरा भाईंदर महानगरपालिकेचे भारतरत्न पंडित भीमसेन जोशी रुग्णालय पूर्ण क्षमतेने व सुरळीतपणे चालविण्यासाठी शासनाकडून प्रतिनियुक्तिने वैद्यकीय तज्ज्ञ, तंत्रज्ञ, उपकरणे, साहित्य व औषधे तसेच आर्थिक मदत या स्वरुपात मदत मागण्यासाठी शासनाकडे विनंती प्रस्ताव पाठविण्यास व शासनाच्या निर्णयाप्रमाणे उचित कार्यवाही करण्यास ही महासभा मंजुरी देत आहे.

सुचक :- श्री. नरेंद्र मेहता          अनुमोदक :- श्रीम. निलम ढवण

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | मेहता नरेंद्र लालचंद | १ | कॅटलीन ॲन्थोनी परेरा | |
| २ | शरद केशव पाटील | २ | ध्रुवकिशोर पाटील | |
| ३ | म्हात्रे कल्पना महेश | ३ | डिमेलो बर्नड अल्बर्ट | |
| ४ | भानुशाली वर्षा गिरधर | ४ | ग्रिटा स्टिफन फॅरो | |
| ५ | मिरादेवी रामलाल यादव | ५ | असेन्ला मेन्डोंसा परेरा | |
| ६ | कोठारी सुमन रमेश | ६ | शिल्पा भावसार | |
| ७ | डॉ. नयना मनोज वसाणी | ७ | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | |
| ८ | सिमा कमलेश शहा | ८ | रॉड्रीक्स बाबरा डॉनल्ड | |
| ९ | जैन गिता भरत | ९ | दक्षता राजेंद्र ठाकूर | |
| १० | अरोरा दिपीका पंकज | १० | पाटील वंदना विकास | |
| ११ | रावल भगवती जयशंकर | ११ | शबनम लियाकत शेख | |
| १२ | मेहता डिंपल विनोद | १२ | प्रभात प्रकाश पाटील | |
| १३ | मेघना दिपक रावल | १३ | पाटील सुनिता कैलास | |
| १४ | शर्मा सुनिला सत्येंद्र | १४ | झिनत रऊफ कुरेशी | |
| १५ | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | १५ | विराणी रेखा अनिल | निरंक |
| १६ | पाटील प्रेमनाथ गजानन | १६ | पुजारी कांचना शेखर | |
| १७ | सिंग मदन उदितनारायण | १७ | पिसाळ मनिषा नामदेव | |
| १८ | कांगणे यशवंत ठकाजी | १८ | डिसा मर्लिन मर्विन | |
| १९ | अनिल बाबुराव भोसले | १९ | अनिता जयवंत पाटील | |
| २० | कासोदरीया अश्विन श्यामजी | २० | गोविंद हेलन जॉर्जी | |
| २१ | जैन दिनेश तेजराज | २१ | काझी रशीदा जमील | |
| २२ | जैन रमेश धरमचंद | २२ | इनामदार जुबेर | |
| २३ | डॉ. राजेंद्र जैन | २३ | वेतोसकर राजेश शंकर | |
| २४ | निलम हरिश्चंद्र ढवण | २४ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | |
| २५ | तारा विनायक घरत | २५ | रकवी सुहास माधवराव | |
| २६ | जयमाला किशोर पाटील | २६ | पांडे हंसुकुमार कमलकुमार | |
| २७ | परमार अनिता भरत | २७ | खण्डेलवाल सुरेश | |
| २८ | पाटील प्रणाली संदिप | २८ | वेंचर गिल्बर्ट मेन्डोंसा | |
| २९ | गावंड मंदाकिणी आत्माराम | २९ | मेन्डोसा स्टिवन जॉन | |
| ३० | संध्या प्रफुल्ल पाटील | ३० | डॉ. आसिफ शेख | |
| ३१ | म्हात्रे प्रभाकर पद्माकर | ३१ | नरेश तुकाराम पाटील | |

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.१८/०१/२०१६

**प्रकरण क्रमांक ( १४१ )** :- भाईंदर (पूर्व) चौपाटी सुंदरीकरण नविनीकरण करणेकरीता खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणे.

**ठराव क्रमांक** (१०८) :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेत भाईंदर (पूर्व) येथे आरक्षण क्र.१२२अ चौपाटीसाठी राखीव आहे. सदर जागा मौजे नवघर सर्व्हे क्र.१५ (नवीन), सर्व्हे क्र.२०९ (जुना) मध्ये मोडत असून सदर आरक्षणाचे क्षेत्र मा.जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडील दि.०७/१०/२०१० रोजीच्या आदेशान्वये संरक्षणासाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेकडे हस्तांतर केले आहे. सदर ठिकाणी तत्कालीन नगरपरिषद असतांना १९९२ पासून श्रीगणेश विसर्जन होत असल्याने वेळोवेळी आवश्यक व्यवस्था तसेच दुरूस्तीकरण करण्यात आले आहे. सदर जागेवर मोठयाप्रमाणावर नागरीक, रहिवाशी व मुले दररोज फिरावयास तसेच खेळण्यास येत असल्याने मोठयाप्रमाणावर गर्दी होत असते. सदर ठिकाणी असलेल्या व्यवस्थेत दुरूस्ती कामे व रंगकाम इ. कामे करून सुंदरीकरण, नविनीकरण करण्याची आवश्यकता असून चौपाटी परीसराची शोभा वाढणार आहे. सदर कामाकरीता तांत्रिक सल्लागार नेमण्याबाबत निर्णय झाला होता. तथापी वारंवार निविदा मागवुन देखील निविदा प्राप्त झालेली नाही. सदर कामासाठी एकत्रित होणाऱ्या रु.३,८५,५९,७००/- एवढया खर्चास व टप्प्याटप्प्याने निविदा मागविणेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

सुचक :- Sumanf Kothari
सुमन कोठारी

अनुमोदन :- Sumanf Kothari
श्री. मदन सिंह सुमन कोठारी

महापौर
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

PC-1/DK/2015-16 /MT -8

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.३०/०१/२०१६

## (दि. १८/०१/२०१६ रोजीची तहकुब महासभा)

**प्रकरण क्र. १४३ :- मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मंजूर विकास कामात फेरबदल / सुधारणा करणे व कामांना आर्थिक प्रशासकीय मान्यता देणे.**

**ठराव क्र. १०९ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका मा. महासभा दि.०१/०७/२०१५ ठराव क्र.१६ अन्वये खालील कामांना प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | विकास कामाचे नाव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १ | मिरारोड (पूर्व) कनकिया वासुदेव कॉम्पलेक्स समोरील स्प्रींग रोझ ते मेरी गोल्ड पर्यंत विकास योजना रस्ता तयार करणे व दोन्ही बाजूस गटारे बांधणे. | रु. २,०३,४३,४००/- |
| २ | मिरारोड (पूर्व) कनकिया वासुदेव कॉम्पलेक्स रस्ता रॉडस्टोन ते एस.टी.पी. पर्यंत विकास योजना रस्ता तयार करणे व गटारे बांधणे. | रु.३,०५,११,४००/- |
| ३ | हटकेश मंगल नगर जंक्शन ते १५ नंबर बस स्टॉप पर्यंत रस्त्याच्या डाव्याबाजूस गटार बांधुन स्लॅब टाकणे. | रू. २४,९३,७००/- |
| ४ | मिरारोड (पूर्व) महापौर निवास रस्त्यावरील उर्वरीत ठिकाणी गटारे बांधणे | रू. ४९,८७,६५०/- |
| ५ | मिरारोड (पूर्व) बेवर्लीपार्क मेरीगोल्ड १ व २ ते मंगलनगर पर्यंत रस्त्यालगत गटारे बांधणे व १५.०० मी. डी.पी. रस्ता तयार करणे | रु.२,२०,७९,६५०/- |

सदर कामाबाबत निविदा प्रक्रीया करून मा. स्थायी समिती सभेच्या मान्यतेने कामे मंजूर करण्यात आलेली आहेत. तथापी, दरम्यानच्या काळात सदर कामे ही विकास हक्क प्रमाणपत्राच्या मोबदल्यात करण्यासाठी परवानगी दिल्याने प्रस्तावित कामे रद्द करण्यात येत आहे. सदर कामाच्या निविदा प्रक्रीया झाल्याने सदर काम मंजूर झालेल्या कंत्राटदाराकडून त्याच मंजूर दराने अंदाजपत्रकात सुधारणा करून खालील कामे करून घेण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | विकास कामाचे नाव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १ | मिरारोड (पूर्व) कनकिया येथील आरक्षण क्र. २५० ते तिवारी कॉलेज पर्यंत विकास योजना रस्ता तयार करणे व गटार बांधणे | रु.१,३९,५४,३५०/- |
| २ | भाईंदर (पूर्व) इंद्रलोक फेस-१ येथील तिरुपती धाम ते मुख्य रस्त्यापर्यंत गटार बांधुन स्लॅब टाकणे. | रु.१३,२१,३००/- |
| ३ | मिरारोड (पूर्व) आयडीयल पार्क येथील स्मितल आर्चिड व रितु ग्लोरी रस्त्यालगत गटार बांधुन स्लॅब टाकणे. | रु.१४,७८,०००/- |
| ४ | मिरारोड (पूर्व) सालासर आंगण ते आरक्षण क्र.२५४ रस्त्यालगत गटार बांधुन स्लॅब टाकणे. | रु.११,५७,१००/- |
| ५ | मिरारोड (पूर्व) पुनमगार्डन येथील सेरेनिटी व स्वयंम इमारत येथील रस्त्यालगत गटार बांधुन स्लॅब टाकणे. | रु.२३,०२,२००/- |
| ६ | हटकेश विनय नगर येथील राज मंदिर कॉम्पलेक्स ते गौरव वॅलीकडे जाणारा १८.०० मी. विकास योजना रस्ता तयार करणे व रस्त्यालगत गटारे बांधणे. | रु.१,८५,९०,४५०/- |
| ७ | मिरारोड (पूर्व) पुनमगार्डन येथील ॲमिनिटी इमारत ते हॅप्पी होम येथील रस्त्यालगत गटार बांधुन स्लॅब टाकणे. | रु.३३,३०,३००/- |
| ८ | मिरारोड (पूर्व) रामदेव पार्क येथील बालाजी गार्डन येथे हिताक्षी हाईट्स पर्यंत रस्त्यालगत गटार बांधुन स्लॅब टाकणे. | रु.९,९४,०००/- |
| ९ | भाईंदर (पूर्व) गोल्डन नेस्ट फेस-३, ब्ल्यू मून क्लब रस्त्यालगत फुटपाथ करीता कर्बस्टोन व चेकर्ड लाद्या बसविणे. | रु.१०,५५,७५०/- |
| १० | मिरारोड (पूर्व) कनकिया येथील प्रथमेश हाईट्स ते सालासर आंगण पर्यंत रस्त्यालगत गटार बांधुन स्लॅब टाकणे. | रू.५०,३७,५५०/- |
| ११ | भाईंदर (पूर्व) पुजा पार्क, मोती नगर येथील रस्त्यालगत गटार बांधुन स्लॅब टाकणे. | रू.१४,६२,४५०/- |

| | | |
|---|---|---|
| १२ | भाईंदर (पूर्व) बालाजी हॉस्पीटल येथील गणेश कृपा इमारती पर्यंत रस्त्यालगत गटार बांधुन स्लॅब टाकणे. | रु.२४,९३,७००/- |
| १३ | मिरारोड (पूर्व) कनकीया येथील युनिक गार्डन परिसरातील रस्त्यालगत गटार बांधणे व स्लॅब टाकणे | रु.४४,७८,१००/- |
| १४ | राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ वर वसानी पेट्रोल पंप ते दिल्ली दरबार उघाडी पर्यंत नाला बांधणे व उर्वरीत रस्ता तयार करणे. | रु.२,२०,२२,९५०/- |

वरील सर्व कामांच्या निविदा मंजूर झाल्या असल्याने सदर कामांच्या कंत्राटदाराकडूनच त्यांच्या मंजूर बाबी व दराने नव्याने कामे प्रस्तावित करून ती करून घेतल्यास सोयीचे होऊन नव्याने निविदा प्रक्रीया करण्याचा वेळ वाचेल.

वरीलप्रमाणे अ.क्र. १ चे कामाचे मंजूर कंत्राटदाराकडून नव्याने प्रस्तावित अ.क्र. १,२,३,४ व ५ ही कामे करुन घेण्यात यावीत. अ.क्र. २ चे कामाचे मंजूर दर व कंत्राटदाराकडून नव्याने प्रस्तावित अ.क्र. ६,७,८,९,१० व ११ ही कामे करुन घ्यावीत. अ.क्र. ३ चे कामाचे मंजूर दर व कंत्राटदाराकडून नव्याने प्रस्तावित अ.क्र. १२ हे काम करून घ्यावे. अ.क्र. ४ चे कामाचे मंजूर दर व कंत्राटदाराकडून नव्याने प्रस्तावित अ.क्र. १३ चे काम करुन घेण्यात यावे. अ.क्र. ५ चे कामाचे मंजूर दराने व कंत्राटदाराकडून नव्याने प्रस्तावित अ.क्र. १४ चे काम करुन घेण्यात यावे. नव्याने प्रस्तावित केलेल्या अ.क्र. १ ते १४ कामाच्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

तसेच शहरात करावयाच्या कामांची खालीलप्रमाणे अंदाजपत्रके तयार करण्यात आली आहे.

| अ.क्र | कामाचे नांव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १ | भाईंदर (प.) प्लॅन्टेरीया इमारत रस्ता दोन्ही बाजूस गटार बांधणे. | रु.३७,४८,०००/- |
| २ | मिरारोड (पूर्व) शितलनगर नर्सरी बाजूचा नाला बांधणे. | रु.५८,९३,७००/- |
| ३ | मिरारोड (पूर्व) प्लेझंट पार्क डॉन बास्को रस्ता दोन्ही बाजूस गटारे बांधणे. | रु.९५,८३,५००/- |
| ४ | भाईंदर (प.) जय अंबे झोपडपट्टी भूमिगत गटारे/ रस्ते करणे. | रु.५०,००,०००/- |
| ५ | मिरारोड (पूर्व) शांतीनगर सेक्टर ५, उद्यान आधुनिक पध्दतीने विकसित करणे. | रु.८०,२६,०३२/- |
| ६ | मिरारोड (पूर्व) साईबाबा उद्यान, आधुनिक पध्दतीने विकसित करणे. | रु.२०,६४,९९२/- |
| ७ | मिरारोड (पूर्व) आरक्षण क्र. ३२०, उद्यान आधुनिक पध्दतीने विकसित करणे. | रु.५८,४१,४२४/- |
| ८ | माशाचापाडा शाळा इमारत बांधणे. | मुळ अंदाजपत्रक रु.४९,९१,९६०/- सुधारीत अंदाजपत्रक रु.७८,५८,९७१/- |
| ९ | मिरारोड (पूर्व) कनकीया आरक्षण क्र. २५१, २५२ जागेलगत गटार व कुंपणभिंत बांधणे | रु.५७,८७,८००/- |
| १० | मिरारोड (पूर्व) आरक्षण क्र. ३२९, ३५४, ३५५ ग्रील बसविणे व आवश्यक कामे करणे. | रु.५०,००,०००/- |
| ११ | आरक्षण क्र. २१६ विकसित करणे | मूळ अंदाजपत्रक रु.१,१५,०६,८३५/- सुधारीत अंदाजपत्रक रु.१,८६,५०,०००/- |
| १२ | आरक्षण क्र. २३५ विकसित करणे | मूळ अंदाजपत्रक रु.३,७८,८८,४४०/- सुधारीत अंदाजपत्रक रु.४,९८,००,०००/- |
| १३ | राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ वरील दारा ढाबा ते कलासिल्क इंड. पर्यंत सी.सी. नाला बांधणे. | मूळ अंदाजपत्रक रु.६,२३,२१,०५९/- सुधारीत अंदाजपत्रक रु.१०,४७,२१,०५९/- |
| १४ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील उद्याने, मैदाने, दुभाजकामध्ये सुशोभिकरण करणे (वार्षिक निविदा) | रु.२,००,००,०००/- |
| १५ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील उद्याने, स्मशाने, मैदाने, दुभाजके तसेच दुतर्फा वृक्षरोपण करणेसाठी लालमाती, शेणखत व सफेद रेती पूरवठा करणे (वार्षिक निविदा) | रु.१,००,००,०००/- |

| | | |
|---|---|---|
| १६ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध उद्यानात खेळणी, बँचेस पूरवठा व जुनी खेळणी दुरूस्ती करणे (वार्षिक निविदा) | रु.२,००,००,०००/- |
| १७ | राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ दहीसर चेक नाका ते काशिमिरा नाक्यापर्यंत सर्व्हीस रस्त्यालगतचा रस्ता रुंदीकरण करून गटार बांधणे. | मूळ अंदाजपत्रक रु.४,१०,२५,५००/- सुधारीत अंदाजपत्रक रु.५,९९,१७,२००/- |
| १८ | मिरारोड (पूर्व) विनयनगर पूजापार्क ते श्री अॅव्हेन्यू नाल्यावर उद्यान विकसित करण्याकरीता बांधकाम विषयक कामे करणे | रु.७८,५६,०००/- |
| १९ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध प्रकारचे फलक, दुभाजक ग्रील, रेलिंग, कर्बस्टोन, स्लॅब, फुटपाथ दुरूस्ती, गतिरोधक पट्टे, झेब्रा क्रॉसिंगपट्टे इत्यादी कामे करणे (वार्षिक निविदा) | रु.१,००,००,०००/- |
| २० | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध आरक्षणाच्या ताब्यात असलेल्या व येणाऱ्या जागांना, कुंपणभिंती बांधणे (वार्षिक निविदा) | रु.१,५०,००,०००/- |
| २१ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील आवश्यक तेनूसार स्मशानभूमी दुरूस्ती कामे करणे (वार्षिक निविदा) | रु.५०,००,०००/- |
| २२ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सब-वे, शाळा इमारती, सार्वजनिक इमारती, वाचनालये, समाजमंदिरे, व्यायामशाळा, रुग्णालये मधील आवश्यकतेनूसार दुरूस्ती कामे करणे (वार्षिक निविदा) | रु.१,००,००,०००/- |
| २३ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मैदाने, उद्याने, तळी, विहीरी मधील आवश्यक तेनूसार दुरूस्ती कामे, ग्रील, रेलिंग, गेट इत्यादी साफसफाई करणे (वार्षिक निविदा) | रु.१,००,००,०००/- |
| २४ | मिरारोड (पूर्व) आयुक्त निवासस्थान नुतनीकरणे करणे. | रु.६२,५०,०००/- |
| २५ | मिरारोड (पूर्व) कानुंगो इस्टेट येथील आरक्षण क्र. १६७ उद्यान विकसित करणे (अल्पसंख्यांक बहूल नागरी क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत) | रु.२५,००,०००/- |
| २६ | भाईंदर (पूर्व) जैसलपार्क विधी शेड बांधणे | मूळ अंदाजपत्रक रु.५६,५४,९८६/- सुधारीत अंदाजपत्रक रु.७२,१३,६५०/- |
| २७ | भाईंदर (पूर्व) आरक्षण १०८ विकास यैजनेतील मार्केट विकसित करणे | रु.३,८९,६२,८५०/- |
| २८ | भाईंदर (प.) डोंगरी येथे कब्रस्तानसाठी सी.सी. पदपथाचे व कुंपण भिंतीचे बांधकाम करणे (अल्पसंख्यांक बहूल नागरी क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत) | रु.१३,५६,८००/- |
| २९ | भाईंदर (प.) दादरी बोहरा कब्रस्तानसाठी व सी.सी. पदपथाचे काम करणे (अल्पसंख्यांक बहूल नागरी क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत) | रु. ९,८२,५००/- |
| ३० | राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ वेस्टर्न पार्क बस स्टॉप ते मुख्य नाला पर्यंत सी.सी. गटार बांधून स्लॅब टाकणे (अल्पसंख्यांक बहूल नागरी क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत) | रु.१९,९८,३००/- |
| ३१ | भाईंदर (प.) आयुक्त कार्यालय नूतनीकरण करणे. | रु.८२,१५,७८१/- |
| ३२ | मिरारोड (पूर्व) कनकीया येथे आपतकालिन कक्ष तयार करणे. | रु.८५,२५,९००/- |
| ३३ | भाईंदर (पूर्व) आरक्षण क्र. २३१ येथे मार्केटचे बांधकाम करणे | सुधारीत अंदाजपत्रक रु.९,५७,८७,३००/- |
| ३४ | भाईंदर (पूर्व) आरक्षण क्र. २१८ येथे कम्युनिटी सेंटरचे बांधकाम करणे | रु.११,७८,१६,५००/- |
| ३५ | मिरारोड (पूर्व) रेल्वे स्टेशन बाहेरील परीसर सुशोभिकरण करणे | मूळ अंदाजपत्रक रु.७,१०,१९,६००/- सुधारीत अंदाजपत्रक रु.८,२४,६३,८७१/- |
| ३६ | भाईंदर (पूर्व) नेस्ट रस्ता ते कनकिया रस्ता जोडणारा ३०.०० मीटर डी.पी. रस्ता तयार करणे व गटारे बांधणे. (तिवारी कॉलेज समोरील रस्ता) | मूळ अंदाजपत्रक रु.७,००,५०,६००/- सुधारीत अंदाजपत्रक रु.१२,००,६०,२००/- |
| ३७ | भाईंदर पूर्व व पश्चिम यांना जोडणारा रेल्वे खालील सबवे पोहच रस्ते तयार करणे | मूळ अंदाजपत्रक रु.२३,११,९६,८७७/- सुधारीत अंदाजपत्रक रु.३९,४३,६२,०००/- |

| | | |
|---|---|---|
| ३८ | आरक्षण क्र. ३३१ ते ३३५ या जागेस कुंपणभिंत बांधणे | रु.९२,५०,०००/- |
| ३९ | भाईंदर (पूर्व) आरक्षण क्र. २३० उद्यान आधुनिक पध्दतीने विकसित करणे | रु. १५,९९,८०,८९३/- |
| ४० | मिरारोड (पूर्व) आरक्षण क्र. २४२, उद्यान आधुनिक पध्दतीने विकसित करणे. | रु. ४,३७,२३,२४८/- |
| ४१ | भाईंदर (पूर्व) आरक्षण क्र. २२६, उद्यान आधुनिक पध्दतीने विकसित करणे. | रु. ४,३२,९९,६३७/- |
| ४२ | मिरारोड (पूर्व) पुनम गार्डन येथील सुविधा क्षेत्र इमारतीमध्ये अभ्यासिका, विरंगुळा केंद्र व कार्यालयासाठी फर्निचर इ. व्यवस्था करणे. | रु. १,०३,२५,९००/- |
| ४३ | भाईंदर (प.) पोलीस स्टेशन ते मांडली तलाव पर्यंत रस्ता सिमेंट कॉंक्रीटचा तयार करणे | रु.१,७८,९८,०००/- |
| ४४ | भाईंदर (पूर्व) प्रभाग समिती क्र. ०३ व ०४ च्या कार्यालयाच्या पहिल्या मजल्यावर ई-लायब्ररी विकसित करणे. | मूळ अंदाजपत्रक रु.३८,०६,८८०/- सुधारीत अंदाजपत्रक रु.४८,०६,८८०/- |
| ४५ | मुख्य कार्यालय इमारत सुरक्षेसाठी विविध व्यवस्था करणे | रु.३०,००,०००/- |
| ४६ | मिरारोड (पूर्व) जॉगर्स पार्क विविध कामे करणे | रु.१,००,००,०००/- |
| ४७ | मिरारोड (पूर्व) स्मशानभूमी विविध कामे करणे | रु.५०,००,०००/- |
| ४८ | भाईंदर (पूर्व) नवघर शाळा इमारतीवर वाढीव दोन मजले बांधणे | रु.२,८६,६०,५००/- |
| ४९ | भाईंदर (पूर्व) गोडदेव स्मशानभूमी विकसित करणे | मूळ अंदाजपत्रक रु.७६,००,०००/- सुधारीत अंदाजपत्रक रु.१,१२,७६,५६५/- |
| ५० | भाईंदर (पूर्व) आरक्षण क्र. १०९ येथे कम्युनिटी हॉल बांधणे | मूळ अंदाजपत्रक रु.६६,००,०००/- सुधारीत अंदाजपत्रक रु.१,०१,००,०००/- |

वरील कामांच्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

वरील कामांपैकी अ.क्र. ८, ११, १२, १३, १७, २६, ३३, ३४, ३५, ३६, ३७, ४४, ४९ व ५० ही सुधारीत अंदाजपत्रकानुसार संबंधित कंत्राटदाराकडून कामे करुन घेण्यात यावीत. उर्वरीत कामे ही आर्थिक तरतुदीनुसार व आवश्यकतेनुसार निविदा मागवून करुन घ्यावी.

**सुचक :- श्री. नरेंद्र मेहता** **अनुमोदन :- श्री. प्रशांत केळूसकर**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | मेहता नरेंद्र लालचंद | १ | सय्यद नुरजहॉ नझर हुसैन | |
| २ | शरद केशव पाटील | २ | ध्रुवकिशोर पाटील | |
| ३ | पाटील रोहिदास शंकर | ३ | डिमेलो बर्नड अल्बर्ट | |
| ४ | म्हात्रे कल्पना महेश | ४ | शिल्पा भावसार | |
| ५ | मिरादेवी रामलाल यादव | ५ | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | |
| ६ | कोठारी सुमन रमेश | ६ | दक्षता राजेंद्र ठाकूर | |
| ७ | डॉ. नयना मनोज वसाणी | ७ | पाटील वंदना विकास | |
| ८ | जैन गिता भरत | ८ | प्रभात प्रकाश पाटील | |
| ९ | अरोरा दिपीका पंकज | ९ | पाटील सुनिता कैलास | |
| १० | मेहता डिंपल विनोद | १० | झिनत रऊफ कुरेशी | **निरंक** |
| ११ | शर्मा सुनिला सत्येंद्र | ११ | पुजारी कांचना शेखर | |
| १२ | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | १२ | पिसाळ मनिषा नामदेव | |
| १३ | सिंग मदन उदितनारायण | १३ | डिसा मर्लिन मर्विन | |
| १४ | कांगणे यशवंत ठकाजी | १४ | वंदना रामदास चक्रे | |
| १५ | अनिल बाबुराव भोसले | १५ | गोविंद हेलन जॉर्जी | |
| १६ | कासोदरीया अश्विन | १६ | काझी रशीदा जमील | |
| १७ | जैन दिनेश तेजराज | १७ | इनामदार जुबेर | |
| १८ | जैन रमेश धरमचंद | १८ | शेख अशरफ मोहम्मद | |
| १९ | डॉ. राजेंद्र जैन | १९ | सुर्यकांत खंडोजी म्हात्रे | |
| २० | निलम हरिश्चंद्र ढवण | २० | सामंत प्रमोद जयराम | |
| २१ | शुभांगी महिन कोटीयन | २१ | रकवी सुहास माधवराव | |

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.३०/०१/२०१६

## (दि. १८/०१/२०१६ रोजीची तहकुब मा. महासभा)

**प्रकरण क्र. (१४४) :- महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश-२०१५ अंतर्गत संगणकीय सेवा उपलब्ध *करणेबाबत आर्थिक प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.***

**ठराव क्र. ११० :-**

महाराष्ट्र शासनाने राज्यातील पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व समयोचित लोकसेवा देण्याकरिता तसेच लोकांच्या स्थानिक प्रशासनाकडून वाढत्या अपेक्षा विचारात घेऊन त्यांना तत्पर व दर्जेदार सेवा पुरविण्याच्या दृष्टीकोनातून महाराष्ट लोकसेवा हक्क अध्यादेश-२०१५, दि. २८/०४/२०१५ रोजी लागू करण्यात आला आहे. या अध्यादेशातील कलम-३ अनुसार नागरिकांना दैनंदिन जीवनामध्ये सातत्याने आवश्यक असणाऱ्या व ज्या लोकसेवांचा जास्तीत जास्त नागरिकांनी फायदा घेतला आहे व ज्या सेवा महत्वाच्या आहेत अशा माहनगरपालिकेने जाहीर करावयाचा लोकसेवेचा तपशिल संदर्भिय शासन निर्णयासोबत सहपत्र-अ नुसार (सेवा, आवश्यक कागदपत्र व नियम कालावधी, फी, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी, द्वितीय अपिलीय प्राधिकारी) अधिसुचित करण्यात आला आहे.

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

शासन निर्णय, नगर विकास विभाग क्रमांकः एमसीओ-२०१५/प्र.क्र.१८९/नवि-१४, दि. २३ जून २०१५ चे

सहपत्र - "अ"

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश-२०१५

(कलम-३ अन्वये महानगरपालिकेनी जाहीर करावयाचा लोकसेवेचा तपशील)

| अ.क्र. | लोक सेवांची सुची | आवश्यक कागद पत्र | फी | नियत काल मर्यादा | पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपिलीय प्राधिकारी | द्वितीय अपिलीय प्राधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१. | जन्म प्रमाणपत्र देणे | विहित नमुन्यातील अर्ज | प्रति प्रत रू. १०/- | ३ दिवस | वैद्यकीय अधिकारी | वैद्यकीय आरोग्य अधिकारी | उपायुक्त (आरोग्य) |
| ०२. | मृत्यु प्रमाणपत्र देणे | विहित नमुन्यातील अर्ज | प्रति प्रत रू. १०/- | ३ दिवस | वैद्यकीय अधिकारी | वैद्यकीय आरोग्य अधिकारी | उपायुक्त (आरोग्य) |
| ०३. | विवाह नोंदणी प्रमाणपत्र देणे | १) विहित नमुन्यातील अर्ज<br>२) वास्तव्याचा पुरावा.<br>३) वयाचा पुरावा<br>४) विवाहासाठी उपस्थित साक्षीदारांचे स्वयंघोषणापत्र<br>५) ९० दिवसांनंतर नोंदणी असल्यास स्वयंघोषणापत्र | ९० दिवसांपर्यंत रू. ५०/-<br>१ वर्ष कालावधी पर्यंत रू. १५०/-<br>१ वर्षानंतर रू. २५०/- | ३ दिवस | वरिष्ठ लिपिक | मुख्य लिपिक | प्रभाग अधिकारी |
| ०४. | मालमत्ता करउतारा देणे. | विहित नमुन्यातील अर्ज | प्रति प्रत रू. १०/- | ३ दिवस | कर निरिक्षक | मुख्य लिपिक | प्रभाग अधिकारी |
| ०५. | थकबाकी नसल्याचा दाखला देणे. | विहित नमुन्यातील अर्ज | प्रति प्रत रू. १०/- | ३ दिवस | कर निरिक्षक | मुख्य लिपिक | प्रभाग अधिकारी |
| ०६. | अ) दस्तऐवजाच्या आधारे मालमत्ता हस्तांतरण नोंद प्रमाणपत्र देणे | १) विहित नमुन्यातील अर्ज<br>२) थकबाकी नसल्याचा दाखला<br>३) दस्तऐवजाची प्रत (खरेदी खत/बक्षीस पत्र/ वाटणीपत्र व इतर) | रहिवास- रू. १०००/-<br>वाणिज्य रू. १५००/- | १५ दिवस | कर निरिक्षक | मुख्य लिपिक | प्रभाग अधिकारी |
| | ब) वारसा हक्काने मालमत्ता हस्तांतरण नोंद प्रमाणपत्र देणे | १) विहित नमुन्यातील अर्ज<br>२) थकबाकी नसल्याचा दाखला<br>३) वारसा हक्क प्रमाणपत्र | रू. ५०/- | १५ दिवस | कर निरिक्षक | मुख्य लिपिक | प्रभाग अधिकारी |
| ०७. | झोन दाखला देणे. | १) विहित नमुन्यातील अर्ज<br>२) ७/१२ उतारा/सिटी सर्व्हे उतारा<br>३) मोजणी नकाशा/ सिटी सर्व्हे नकाशा | महानगरपालिकेने वेळोवेळी निश्चित केलेले दर | ७ दिवस | कनिष्ठ अभियंता | सहाय्यक नगररचनाकार | नगररचनाकार |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०८. | भाग नकाशा देणे. | १) विहित नमुन्यातील अर्ज<br>२) ७/१२ उतारा/सिटी सव्ह उतारा<br>३) मोजणी नकाशा/ सिटी सर्व्हे नकाशा | महानगरपालिकेने वेळोवेळी निश्चित केलेले दर | ३ दिवस | कनिष्ठ अभियंता | सहाय्यक नगररचनाकार | नगररचनाकार |
| ०९. | बांधकाम परवाना देणे. | १) विहित नमुन्यातील अर्ज<br>२) वास्तु विशारदाचा दाखला<br>३) मालकी हक्काची कागदपत्रे<br>४) बांधकाम आराखडा नकाशा ५ प्रती<br>५) मोजणी नकाशा<br>६) मंजुर रेखांकनाची प्रत | महानगरपालिकेने वेळोवेळी निश्चित केलेले दर | ६० दिवस | कनिष्ठ अभियंता | सहाय्यक नगररचनाकार | नगररचनाकार |
| १०. | जोते प्रमाणपत्र. | १) विहित नमुन्यातील अर्ज<br>२) बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र | महानगरपालिकेने वेळोवेळी निश्चित केलेले दर | १५ दिवस | सर्व्हेअर | सहाय्यक नगररचनाकार | नगररचनाकार |
| ११. | भोगवटा प्रमाणपत्र देणे. | १) विहित नमुन्यातील अर्ज<br>२) बांधकामं प्रारंभ प्रमाणपत्र<br>३) जोते प्रमाणपत्र<br>४) घर मालक/वास्तुविशारद यांचे पुर्णत्वाचे स्वयंघोषणापत्र | महानगरपालिकेने वेळोवेळी निश्चित केलेले दर | ३० दिवस | कनिष्ठ अभियंता | सहाय्यक नगररचनाकार | नगररचनाकार |
| १२. | नळजोडणी देणे. | १) विहित नमुन्यातील अर्ज<br>२) जागा मालकी कागदपत्रे<br>३) थकबाकी नसल्याचा दाखल | १/२" इंच व्यास (घरगुती) रू. ३०,०००/-<br>१/२" इंच व्यास (वाणिज्य) रू. ४५,०००/-<br>१" इंच व्यास (घरगुती) रू. ५०,०००/-<br>१" इंच व्यास (वाणिज्य) रू. ७५,०००/- | १५ दिवस | कनिष्ठ अभियंता | उप-अभियंता | कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) |
| १३. | जलनिःसारण जोडणी देणे. | १) विहित नमुन्यातील अर्ज<br>२) जागा मालकी कागदपत्रे<br>३) थकबाकी नसल्याचा दाखल | ६" इंच व्यास (प्रत्येक कनेक्शन) रू. २५,०००/-<br>६" इंच व्यास व्यासापेक्षा जास्त (प्रत्येक कनेक्शन) रू. ५०,०००/-<br>रो-हाऊस घरांसाठी रू. १५,०००/- | १५ दिवस | कनिष्ठ अभियंता | उप-अभियंता | कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) |
| १४. | अग्निशमन ना-हरकत दाखला देणे. | १) विहित नमुन्यातील अर्ज<br>२) थकबाकी नसल्याचा दाखल<br>३) वास्तुशिल्पकार यांचा अर्ज<br>४) आग प्रतिबंधक उपाययोनांबाबातची रूपरेषा<br>५) कॅपिटेशन फी | महानगरपालिकेने वेळोवेळी निश्चित केलेले दर | ७ दिवस | सब-स्टेशन ऑफिसर | प्र. मुख्य अग्निशमन अधिकारी | उपायुक्त (अग्निशमन) |
| १५. | अग्निशमन अंतिम ना-हरकत दाखला देणे. | १) विहित नमुन्यातील अर्ज<br>२) थकबाकी नसल्याचा दाखल<br>३) वास्तुशिल्पकार यांचा अर्ज<br>४) अग्निशमन यंत्रणा उभारणी केल्याचे प्रमाणपत्र<br>५) लायसन्स एजन्सी यांचे नमुना-अ प्रमाणपत्र<br>६) विकासक/सोसायटी यांचे अग्निशमन यंत्रणा सुस्थितीत ठेवण्याचे हमीपत्र | महानगरपालिकेने वेळोवेळी निश्चित केलेले दर | १५ दिवस | सब-स्टेशन ऑफिसर | प्र. मुख्य अग्निशमन अधिकारी | उपायुक्त (अग्निशमन) |

वरील प्रमाणे १ ते १५ संगणकीकृत व ऑनलाईन सेवा सुरू करणेकामी व अग्निशमन परवानगी याकामी नव्याने संगणक आज्ञावली विकसित करणेकामी दि. ०४/११/२०१५ रोजी निविदा मागविणेत आलेली आहे. याकामी एकूण ३ निविदा प्राप्त झाल्या आहेत. परंतु या क्र. १ ते १५ मध्ये नमुद केलेल्या सेवा व नविन संगणक आज्ञावली पूर्ण क्षमतेने ऑन लाईन सेवा सुरू करणे व त्याचे पुढील ५ वर्षात देखभाल दुरूस्तीसह या सर्विसेस सक्षमपणे चालू राहण्याच्या दृष्टीने मा. महापौरासमवेत सखोल चर्चा झाली. वरीलकामी अ. क्र. १ ते १५ सर्विसेस , मालमत्ता कर आज्ञावली, पाणीपुरवठा कर आज्ञावली, जन्म मृत्यू आज्ञावली, विवाह नोंदणी आज्ञावली, फायर या विभागांसाठी नविन संगणक आज्ञावली, ऑटोडिसीआर ॲप्लीकेशनसोबत इंटीग्रेशन व कार्यरत आज्ञावलीचे डाटा पोर्टींग, मायग्रेशन कामी प्रथम वर्षासाठी रु. १,५०,००,०००/- व तसेच दुसऱ्या, तिसऱ्या, चौथ्या , पाचव्या वर्षासाठी वार्षिक तांत्रिक सपोर्ट म्हणून प्रतिवर्ष रु. ३० लाख खर्च अपेक्षित आहे.

गुणवत्ता, दर्जेदार, सुरक्षित व विश्वसनीय संगणक आज्ञावली विकसित करणेकामी अनुभवी व नामांकित कंपनीकडून संगणक आज्ञावली विकसित केल्यास नागरिकांना या आज्ञावलीद्वारे विनाविलंब सेवा पूरवठा करता येतील. संगणक व संगणक आज्ञावली खरेदी या लेखाशिर्षाखाली सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पात रु. २.५० करोड तरतूद करण्यात आलेली आहे.

याकामी हि सभा फेरनिविदा मागविणेस व उपरोक्त कामी आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत केळूसकर अनुमोदक :- श्री. अश्विन कासोदरीया**

**सदर ठरावामध्ये सुचक श्री. ध्रुवकिशोर पाटील व अनुमोदक श्री. सुरेश खंडेलवाल ह्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

प्रशासनाने निविदा काढताना खालील बाबींचा विचार करुन अटीशर्ती समाविष्ट कराव्यात.

१) निविदा मागवताना प्रत्येक कंपनीकडून Power Point Presentation मागवावे. ऑनलाईन सर्व्हीसेस कशी चालणार कोणत्या बाबी त्यात समाविष्ट केल्या आहेत कसा Result मिळणार, सॉफ्टवेअरची गती काय राहील व इत्यादी बाबी Power Point Presentation मुळे समजेल.

२) कोणते तंत्रज्ञान वापरणार आहे, नवीन की जुने आपला डाटा कुठे Save केला जाईल त्याचे Server व Data Center कुठे असेल Data किती Secure राहील.

३) एका वेळेला किती लोक सर्व्हीस वापरु शकतील. ज्याप्रमाणे S.S.C. Result च्या वेळी Website Crash झाली व बंद पडली तसे होऊ नये. Website बंद पडल्यास किती वेळेत चालु होईल तसेच Website बंद पडल्यास पर्यायी व्यवस्था.

४) Hackers ना माहितीचा गैर उपयोग रोखण्या करीता कोणती उपाया योजना करणार आहात.

५) आज्ञावली चालविण्याकरीता प्रशिक्षीत कर्मचारी लागेल की आपले कर्मचारी काम करु शकतील.

६) महापालिकेच्या इतर सॉफ्टवेअर याच्याशी जोडणार की वेगळे ठेवणार, सर्व सॉफ्टवेअर याच्याशी जोडल्यास सोयीचे होईल.

७) अज्ञावलीचे Third Party Audit नामांकीत कंपनीकडून करणे बंधनकारक करावे.

८) आज्ञावली विकसित करणेकरीता वेळ निश्चित करावा.

९) माहिती चोरीला गेल्यास अथवा गैरवापर झाल्यास जबाबदार कोण? जबाबदारी निश्चित करावी.

१०) ज्यांच्याकडे इंटरनेटची सोय नाही त्यांच्या करीता मनपा मुख्यालय व प्रभाग कार्यालयास KIOSK ची सोय करावी.

११) आपली संपूर्ण जुनी माहिती आज्ञावलीमध्ये समाविष्ट करणार का?

१२) आपले कर्मचारी व ठेकेदार यांची जबाबदारी, कर्तव्ये निश्चित करावी. अश्या मी सुचना मांडत आहे.

**सदर ठरावामध्ये सुचक श्री. बर्नड डिमेलो व अनुमोदक डॉ. आसिफ शेख ह्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

प्रभाग क्र. २५ व २६ दोन्ही प्रभाग एम.एम.आर.डी.ए. च्या हद्दीत येत असल्याने येथील नागरीकांना बरेच दाखले महानगरपालिका देऊ शकत नाही. म्हणून नागरीकांना वांद्रे, मुंबई येथे जावे लागते. म्हणून एम.एम.आर.डी.ए. च्या अधिकाऱ्याला महानगरपालिकेने जागा उपलब्ध केल्यास नागरीकांची गैरसोय दुर होईल.

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजुर.**
**ठराव वाचुन कायम केला आहे.**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि.३०/०१/२०१६
## (दि. १८/०१/२०१६ रोजीची तहकुब मा. महासभा)

**प्रकरण क्र. १४६ :-** **मिरारोड (पूर्व) कनकिया परिसरात जेट्टी, विसर्जन धक्का बांधणे व पर्यटनाच्या दृष्टीने विकास करण्यासाठी विचार विनिमय करुन निर्णय घेणे.**

**ठराव क्र. ११२ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (पूर्व) जैसल पार्क येथे विसर्जन धक्का असून सदर ठिकाणी भाईंदर (पूर्व), मिरारोड, राष्ट्रीय महामार्ग क्र. ८, दहिसर भागातील श्रीगणेश मुर्तीचे विसर्जन होत असते, त्यामुळे सदर धक्यावर मोठ्या प्रमाणावर गर्दी होऊन येणाऱ्या व जाणाऱ्या सर्व रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर वाहतुकीची कोंडी होत असते. सदर धक्का खाडीपर्यंत वाढविण्याची गरज आहे. त्यामुळे सदर गर्दी व वाहतुक कोंडी कमी करण्यासाठी मिरारोड (पूर्व), दहिसर, राष्ट्रीय महामार्ग क्र.८, प्रभाग क्र.३१ मधील श्रीगणेश विसर्जन साठी कनकिया भागात खाडी किनारी भाईंदर (पु.) नवघर पेळणी नविन विसर्जन धक्का बांधणे आवश्यक झाले आहे.

भाईंदर (पूर्व) नवघर पेळणी व एल.एन. तिवारी कॉलेज समोर कनकिया भागाच्या पर्यटनाच्या दृष्टीने व जलवाहतुकीच्या दृष्टीने विकास करण्यासाठी (विविध उपक्रम राबविणे, जेट्टी विकसित करणे) पर्यटन संचनालय, महाराष्ट्र शासन यांनी प्रकल्प अहवाल तयार करुन पर्यटन विभागास सादर करण्यास कळविलेले आहे. सदर कामाबाबत महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड व पर्यंटन विभागामार्फत संयुक्त पहाणी करण्यात आलेली आहे. सदर जेट्टी उभारण्यासाठी खाडी किनाऱ्यावर जाण्यासाठी रस्ता नसल्याने सदर रस्ता विकास आराखड्यात दर्शविण्यासाठी विकास योजनेत फेरबदल करावा लागणार आहे. तसेच सी.आर.झेड. प्राधिकरणाच्या मान्यता घेऊन तद्नंतर कामे करावी लागणार आहेत.

तरी वरील प्रस्तावानुसार भाईंदर (पूर्व) नवघर पेळणी येथील विसर्जन धक्का खाडीपर्यंत क्रॉक्रीटीकरण करणे, कनकिया भागात विसर्जन धक्का तयार करणे, धक्का व रस्ता विकास योजनेत दर्शविणे, रस्ता तयार करणे, सी.आर.झेड प्राधिकरणाची मान्यता घेणे, सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन शासनास पाठविणे, जागा संपादन करणे, इ. कामे करण्यासाठी प्रशासकिय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे. येत्या अर्थसंकल्पात सदर कामासाठी आवश्यक तरतूद करण्याची दक्षता प्रशासनाने घ्यावी. सदर प्रस्तावाबाबत पुढील सर्व कार्यवाही करण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना देण्यात येत आहे. तसेच दोन्ही जेटीसाठी मिरा भाईंदर महानगरपालिका महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डास आवश्यक निधी उपलब्ध करुन देईल अशी हमी देत आहे.

**सुचक :- श्री. शरद पाटील** **अनुमोदक :- श्री. प्रशांत केळूसकर**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | मेहता नरेंद्र लालचंद | १ | सय्यद नुरजहॉ नझर हुसैन | निरंक |
| २ | शरद केशव पाटील | २ | ध्रुवकिशोर पाटील | |
| ३ | रोहिदास शंकर पाटील | ३ | डिमेलो बर्नड अल्बर्ट | |
| ४ | म्हात्रे कल्पना महेश | ४ | शिल्पा भावसार | |
| ५ | मिरादेवी रामलाल यादव | ५ | दक्षता राजेंद्र ठाकूर | |
| ६ | कोठारी सुमन रमेश | ६ | पाटील वंदना विकास | |
| ७ | डॉ. नयना मनोज वसाणी | ७ | शबनम लियाकत शेख | |
| ८ | जैन गिता भरत | ८ | प्रभात प्रकाश पाटील | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ९ | अरोरा दिपीका पंकज | ९ | पाटील सुनिता कैलास | |
| १० | मेहता डिंपल विनोद | १० | झिनत रऊफ कुरेशी | |
| ११ | शर्मा सुनिला सत्येंद्र | ११ | पुजारी कांचना शेखर | |
| १२ | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | १२ | पिसाळ मनिषा नामदेव | |
| १३ | पाटील प्रेमनाथ गजानन | १३ | डिसा मर्लिन मर्विन | |
| १४ | सिंग मदन उदितनारायण | १४ | वंदना रामदास चक्रे | |
| १५ | कांगणे यशवंत ठकाजी | १५ | गोविंद हेलन जॉर्जी | |
| १६ | अनिल बाबुराव भोसले | १६ | काझी रशीदा जमील | |
| १७ | कासोदरीया अश्विन श्यामजी | १७ | इनामदार जुबेर | |
| १८ | जैन दिनेश तेजराज | १८ | वेतोसकर राजेश शंकर | |
| १९ | जैन रमेश धरमचंद | १९ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | |
| २० | डॉ. राजेंद्र जैन | २० | सुर्यकांत म्हात्रे | |
| २१ | निलम हरिश्चंद्र ढवण | २१ | पांडे हंसुकुमार कमलकुमार | |
| २२ | तारा विनायक घरत | २२ | खण्डेलवाल सुरेश | |
| २३ | शुभांगी महिन कोटीयन | २३ | वेंचर गिल्बर्ट मेन्डोंसा | |
| २४ | जयमाला किशोर पाटील | २४ | मेन्डोसा स्टिवन जॉन | |
| २५ | परमार अनिता भरत | २५ | डॉ. आसिफ शेख | |
| २६ | पाटील प्रणाली संदिप | २६ | नरेश तुकाराम पाटील | |
| २७ | संध्या प्रफुल्ल पाटील | २७ | भोईर कमलेश यशवंत | |
| २८ | संदिप मोहन पाटील | २८ | वंदना मंगेश पाटील | |
| २९ | हरिश्चंद्र रामचंद्र आमगावकर | | | |
| ३० | प्रविण मोरेश्वर पाटील | | | |
| ३१ | शाह राकेश रतिशचंद्र | | | |
| ३२ | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | | | |
| ३३ | केळुसकर प्रशांत नारायण | | | |
| ३४ | भोईर भावना राजू | | | |
| ३५ | जाधव मोहन महादेव | | | |
| ३६ | मुन्ना सिंग | | | |
| ३७ | ॲड. रवि व्यास | | | |
| ३८ | दिप्ती भट | | | |
| ३९ | मयेकर सरस्वती रजनीकांत | | | |

**ठराव बहुमताने मंजुर.**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.३०/०१/२०१६

## (दि. १८/०१/२०१६ रोजीची तहकुब मा. महासभा)

**प्रकरण क्रमांक ( १४७ )** :- राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ वर सम्राट हॉटेल समोर रस्ता ओलांडण्यासाठी पादचारी पूल बांधणे बाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**ठराव क्रमांक ( ११३ )** :-

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातून राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ जात असून सदर महामार्ग भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या मालकीचा आहे. सदर महामार्गावरील महाजनवाडी, मिरा गावठण येथील रहीवाशी तसेच शाळकरी मुलांना सदर महामार्ग वारंवार ओलांडावा लागतो. सदर महामार्गावर मोठया प्रमाणावर वाहतूकीचा ताण असल्याने वाहने वेगाने जात असल्याने रहीवाशी, पादचारी व शाळकरी मुलांना जीव मुठीत धरुन रस्ता ओलांडावा लागतो. सदर जागेवर पादचारी पूल बांधण्यासाठी मा.श्री. राजन विचारे, खासदार यांनी खासदार निधीतून रु.७५.०० लक्ष रक्कम उपलब्ध करुन देण्याचे मा. जिल्हाधिकारी कार्यालयास कळविलेले असून मा. जिल्हाधिकारी कार्यालयाकडून मिरा भाईंदर महानगरपालिकेस अंदाजपत्रक सादर करण्याबाबत कळविलेले आहे. सदर महामार्ग भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या मालकीचा असल्याने त्यांना सदर कामाबाबत कळविलेला असता त्यांनी सदर काम महानगरपालिकेमार्फत करण्यास नाहरकत पत्र दिले आहे. सदर कामाचे तांत्रिक सल्लागार मे. एच.एम.राजे कन्सल्टंट प्रा.लि. यांच्यामार्फत रु.२,१७,९३,०००/- रकमेचे अंदाजपत्रक सादर केलेले आहे.

त्यापैकी रु.७५.०० लक्ष खासदार निधितून उपलब्ध होणार असून उर्वरीत रु.१,४२,९३,०००/- एवढा निधी महानगरपालिकेकडून अर्थसंकल्पात पुरेशी तरतूद उपलब्ध करुन देण्यात यावा. प्रस्तावित रु. २,१७,९३,०००/- रकमेच्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :-**        **अनुमोदक :-**

**ठराव सर्वानुमते मंजुर.**
**ठराव वाचुन कायम केला आहे.**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.३०/०१/२०१६

## (दि. १८/०१/२०१६ रोजीची तहकुब मा. महासभा)

**प्रकरण क्र. (१४८ ) :-** **मिरा भाईंदर महानगरपालिकेचा विविध विभागाचे अभिलेख स्कॅनींग व डिजीटायजेशन करणे कामी ई निविदा मागविणेस आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.**

**ठराव क्र. ११४ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका विविध विभागाचे अभिलेख स्कॅनिंग व डिजीटायजेशन करणे आवश्यक आहे. याकामी निविदा मागविणेपूर्वी महानगरपालिकेच्या विविध विभागाकडून अभिलेख्यांची अंदाजित संख्या घेण्यात आली आहे. विविध विभागाकडून प्राप्त झालेल्या अभिलेखांची एकत्रित संख्या खालीलप्रमाणे आहे. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र. राभूअ२०१४/प्र. क्र. १८२/ल-१ मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०००३२ दि. २२/१०/१४ रोजीच्या मंजूर दरानुसार अ.क्र. १ ते ५ कामी खालीलप्रमाणे खर्चाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे.

| अ.क्र. | आकारमान | पृष्ठ संख्या | दर रू. | एकूण रु. |
|---|---|---|---|---|
| १ | **अे-४/लिगल** | ७९,३६८९१ | ०.९७ | ७६,९८,७८४ |
| २ | **अे-३** | १,७८,००० | १.८४ | ३,२७,५२० |
| ३ | **अे-२** | २,८१,२७० | ८ | २२,५०,१६० |
| ४ | **अे-१** | १,२०,००० | ८ | ९,६०,००० |
| ५ | **अे-०** | - | ८.२१ | - |
| | **एकूण** | **८५,१६,१६१** | | **रु. १,१२,३६,४६४/-** |

| Sr. No. | Particualars | Gross Amount |
|---|---|---|
| 1 | DMS License ,DMS services,Configuration and customization of DMS Integration with other MBMC Application, Hosting Charges,User Training, Helpdesk/Technical support,Configuration and customization of DMS, Indexing Rate per file, Binding rate per file, Numbering rate per file | 11,23,646/- |

याकामी एकूण पुष्ठ संख्या अंदाजे ८५,१६,१६१ स्कॅनिग व डिजिटायजेशन करणेकामी अंदाजे रु. **१,२३,६०,११०/-** इतका खर्च अपेक्षित आहे. संगणक व संगणक आज्ञावली खरेदी या लेखाशिर्षाखाली सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पात रु. २.५० करोड तरतूद करण्यात आलेली आहे.

याकामी हि सभा ई- निविदा मागविणेस व उपरोक्त कामी आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत केळूसकर** **अनुमोदक :- श्री. अनिल भोसले**

**सदर ठरावामध्ये सुचक श्री. नरेंद्र मेहता व अनुमोदक श्री. रोहिदास पाटील ह्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

मा. आयुक्त यांनी सदर बाबतीतील निधीस गरज पडल्यास सन २०१६-१७ च्या बजेटमध्ये तरतुद करावी तसेच त्याबाबत ठेका पध्दतीने करावे किंवा स्वतः विकत घ्यावे. याबाबत जे

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.३०/०१/२०१६

(दि. १८/०१/२०१६ रोजीची तहकुब मा. महासभा)

प्रकरण क्र. १४९ - केंद्र शासन पुरस्कृत "राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान" "National Urban Livelihood Mission" "शहरी बेघर निवारा नुतनीकरण/चालविणेबाबतचा विषय मा. महासभेसमोर ठेवणेबाबत.

संदर्भ :- नगरविकास विभागाचा शासन निर्णय क्रमांक एनयुएलएम २०१४/प्र.क्र.१०४/ नवि-१४ दि.२८ ऑगस्ट २०१४

ठराव क्र. ११५:-

सदरचा विषय सविस्तर माहितीसह पुढील मा. महासभेत घेण्यात यावा असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :- श्री. शरद पाटील

अनुमोदक :- Ashvin S. Kasodariya
श्री. अश्विन कासोदरिया

ठराव सर्वानुमते मंजुर.
ठराव वाचुन कायम केला आहे.

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.३०/०१/२०१६

## (दि. १८/०१/२०१६ रोजीची तहकुब मा. महासभा)

**प्रकरण क्र. १५० :-** **मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमासाठी जे.एन.एन.यु.आर.एम. अंतर्गत प्राप्त होणाऱ्या बसेस व अस्तित्वातील बसेस चालविणेसाठीचा धोरणात्मक निर्णय घेणेबाबत.**

**ठराव क्र. ११६ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमात JnNURM-II या योजने अंतर्गत मंजूर १०० व JnNURM-I या योजनेतील ५० बसेस असे एकूण १५० बसेस शहरातंर्गत व शहराबाहेरील बस मार्गावर चालविणेचे आहेत.

केंद्र शासनाच्या JnNURM-II या योजने अंतर्गत मंजूर बसेस व सद्यस्थितीत ५० बसेस चालविणेसाठी NCC (Net Cost Contract) व GCC (Gross Cost Contract) ह्या दोन तत्वापैकी एका तत्वावर महानगरपालिकेच्या बसेस खाजगी Operator मार्फत चालविणेचे आहे. दोन्ही प्रकारापैकी कोणत्याही एका प्रकारात बसेस चालविणेकामी खाजगी ठेकेदाराची नियुक्ती करावी लागणार आहे.

खालीलप्रमाणे दोन्ही तत्वांचे स्वरूप देण्यात येत आहे.

**A) NCC (Net Cost Contract)**

१) महानगरपालिका बस खरेदी करून ठेकेदारास चालविणेस देईल.

२) खाजगी ठेकेदार नेमून महपालिकेने दिलेल्या भाडेदर व बस मार्गावर नियोजित बसेस चालविणे.

३) खाजगी ठेकेदार तिकिट दर जमा / वसूल करील.

४) महापालिकेला नेमलेल्या ठेकेदाराकडून प्रति कि. मी. / प्रति बस स्वामित्व धन दिले जाईल.

५) यामध्ये महानगरपालिकेला कोणताही कर्मचारी नेमणूक व तद्अनुषंगाने येणारा खर्च करावा लागणार नाही.

६) बसेस चालवित असताना कोणत्याही प्रकारचा धोका, अपघात जोखीम प्रत्यक्ष महानगरपालिकेला सोसावा लागत नाही.

७) यामध्ये ज्यावेळी किंवा नियोजित मार्गावर कमी उत्पन्न आहे. त्यावेळी किंवा त्या बस मार्गावर ठेकेदाराकडून बसेस न चालविणेची शक्यता नाकारता येत नाही.

८) ठेकेदारास पुरेसे उत्पन्न मिळाले नाही तर दुरूस्ती अभावी बसेस नादुरूस्त स्थितीत राहून त्याचा परिणाम थेट बस ऑपरेटींगवर होतो.

**B) GCC (Gross Cost Contract)**

१) महानगरपालिका बस खरेदी करून ठेकेदारास चालविणेस देईल.

२) महानगरपालिकेच्या बसेस ठेकेदाराकडून चालविण्यात येतील.

३) महानगरपालिकेकडून तिकिट दर जमा / वसूल केला जाईल त्याकरिता वाहक, निरिक्षक, प्रवर्तक, हिशोब ठेवणेकरिता (जसे रोकड, तिकिट) कर्मचारी वर्ग नेमावा लागेल.

४) महापालिका बसमार्ग, वेळ (Bus Scheduled) देईल त्याप्रमाणे बसेस ठेकेदाराकडून चालविणेत येते, वाहन चालक, इंधन, वंगण, दुरूस्ती, अपघात जोखीम ही बाब ठेकेदाराच्या अधिन असेल.

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. ३०/०१/२०१६
## (दि. १८/०१/२०१६ रोजीची तहकुब सभा)

प्रकरण क्र. १५१ :- स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीचा आढावा घेणेबाबत. संदर्भ :- महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक/२०१५/प्र.क्र.२४९/नवि-३४, दिनांक :- १९/११/२०१५.

(सदरचा विषयाचा आढावा घेण्यात आला.)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. महासभा दि.३०/०१/२०१६**

**(दि. १८/०१/२०१६ रोजीची तहकुब मा. महासभा)**

**प्रकरण १५३ :- अस्थायी बालवाडी सेविकांना मानधनात वाढ करणेबाबत विचार विनिमय करणेबाबत..**

**ठराव क्र.११८:-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये महानगरपालिकेच्या एकुण २६ बालवाडी सुरु आहेत. महानगरपालिका आस्थापनेवर शासन आदेशान्वये मंजुर २७ स्थायी बालवाडी शिक्षिका या पदावर त्यांची शैक्षणिक पात्रता, अर्हता तसेच मागासवर्गीय अनुशेषाच्या अनुषंगाने नेमणूक झालेली आहे. सद्यस्थितीत ५ अस्थायी बालवाडी सेविकांना मा.महासभा दि.०१/०२/१०११ प्रकरण ८४ ठराव क्र.७५ अन्वये रु.८,०००/- एवढया ठोक मानधनावर काम करीत आहेत. त्यांना स्थायी बालवाडी शिक्षिकाप्रमाणेच कार्यालयीन कामकाज, निवडणुकीचे काम, पल्स पोलिओचे काम, जनगणना इ.कामे करीत असतात.

तरी अस्थायी बालवाडी सेविकांना ठोक मानधन रु.११,०००/- एवढे करणेस हि सभा मंजुरी देत असुन येणाऱ्या खर्चात आर्थिक व प्रशासकीय मान्यता देत आहे.

सुचक — श्री. प्रशांत केळुसकर

अनुमोदन — श्री. रमेश जैन

ठराव सर्वानुमते मंजुर

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.३०/०१/२०१६

## (दि. १८/०१/२०१६ रोजीची तहकुब मा. महासभा)

**प्रकरण क्र. १५४ :-** **भाईंदर (पश्चिम) विनायक नगर येथील समाजमंदिराची पुर्नःबांधणी करणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.**

**ठराव क्रमांक ११९ :-**

प्रशासनाने दिलेल्या गोषवाऱ्यानुसार विनायक नगर भाईंदर (प.), येथे समाज मंदीराची पुर्नःबांधणी करण्यासाठी एकुण रु.२,१२,१४,५००/- इतका खर्च येणार आहे. नगरसेवक निधी/प्रभाग निधीतुन रु.३८.० लक्ष इतका निधी उपलब्ध होवू शकणार आहे सदर समाज मंदिराचे काम हे सन्मा. नगरसेवक निधीतुन पुर्ण होऊ शकत नाही. त्यामुळे सन्मा. नगरसेवकांनी सदर नगरसेवक निधी इतरत्र वापरणे योग्य होईल.

तसेच सदर समाज मंदिराची पुर्नःबांधणी करणेकामी सन २०१५-१६ च्या चालु वर्षात तरतुद नसल्याने सन २०१६-१७ च्या आर्थिक वर्षात रु. २,१२,१४,५००/- ची तरतुद करुन महानगरपालिका निधीतुन बांधण्यात यावे. तसेच नविन समाज मंदिराचे बांधकाम सुरु होईपर्यंत आहे त्या समाज मंदिरामधील विद्युत पुरवठा पुर्ववत करुन अन्य आवश्यक ती दुरुस्तीची कामे करुन नागरीकांसाठी समाज मंदिर खुले ठेवावे असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत केळूसकर** **अनुमोदक :- श्री. अश्विन कासोदरीया**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | मेहता नरेंद्र लालचंद | १ | सय्यद नुरजहाँ नझर हुसैन | |
| २ | शरद केशव पाटील | २ | ध्रुवकिशोर पाटील | |
| ३ | रोहिदास शंकर पाटील | ३ | डिमेलो बर्नड अल्बर्ट | |
| ४ | म्हात्रे कल्पना महेश | ४ | शिल्पा भावसार | |
| ५ | मिरादेवी रामलाल यादव | ५ | पाटील सुनिता कैलास | |
| ६ | डॉ. नयना मनोज वसाणी | ६ | झिनत रऊफ कुरेशी | |
| ७ | जैन गिता भरत | ७ | पुजारी कांचना शेखर | |
| ८ | अरोरा दिपीका पंकज | ८ | पिसाळ मनिषा नामदेव | |
| ९ | मेहता डिंपल विनोद | ९ | डिसा मर्लिन मर्विन | |
| १० | शर्मा सुनिला सत्येंद्र | १० | काझी रशीदा जमील | |
| ११ | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | ११ | इनामदार जुबेर | |
| १२ | पाटील प्रेमनाथ गजानन | १२ | वेतोसकर राजेश शंकर | निरंक |
| १३ | सिंग मदन उदितनारायण | १३ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | |
| १४ | कांगणे यशवंत ठकाजी | १४ | खण्डेलवाल सुरेश | |
| १५ | अनिल बाबुराव भोसले | १५ | डॉ. आसिफ गुलाब शेख | |
| १६ | कासोदरीया अश्विन श्यामजी | १६ | नरेश तुकाराम पाटील | |
| १७ | जैन दिनेश तेजराज | १७ | भोईर कमलेश यशवंत | |
| १८ | जैन रमेश धरमचंद | १८ | वंदना मंगेश पाटील | |
| १९ | डॉ. राजेंद्र जैन | | | |
| २० | निलम हरिश्चंद्र ढवण | | | |
| २१ | तारा विनायक घरत | | | |
| २२ | शुभांगी महिन कोटीयन | | | |
| २३ | जयमाला किशोर पाटील | | | |
| २४ | परमार अनिता भरत | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| २५ | पाटील प्रणाली संदिप | | |
| २६ | संदिप मोहन पाटील | | |
| २७ | हरिश्चंद्र रामचंद्र आमगावकर | | |
| २८ | प्रविण मोरेश्वर पाटील | | |
| २९ | शाह राकेश रतिशचंद्र | | |
| ३० | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | | |
| ३१ | केळुसकर प्रशांत नारायण | | |
| ३२ | जाधव मोहन महादेव | | |
| ३३ | मुन्ना सिंग | | |
| ३४ | ॲड. रवि व्यास | | |
| ३५ | दिप्ती भट | | |
| ३६ | मयेकर सरस्वती रजनीकांत | | |

**ठराव बहुमताने मंजुर.**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि.३०/०१/२०१६
## (दि. १८/०१/२०१६ रोजीची तहकुब महासभा)

**प्रकरण क्रमांक ( १५६ ) :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील स्वच्छतागृह दैनंदिन देखभाल व दुरुस्ती, संचलन करणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.**

**ठराव क्रमांक १२७ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेने बांधलेली १७२ सार्वजनिक स्वच्छतागृह व ०५ मोबाईल टॉयलेट आहेत. तसेच पे ॲन्ड युज तत्त्वावर बांधलेली ५६ स्वच्छतागृह आहेत. सदर १७२ सार्वजनिक स्वच्छतागृह व ०५ मोबाईल टॉयलेटची दैनदिन देखभाल, संचलन, आवश्यक दुरुस्ती कामे महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहेत. सदर स्वच्छतागृहाचे वीजबील, पाणीबील महानगरपालिका भरते. सदर स्वच्छतागृह दैनदिन देखभाल, साफसफाई १ संचलनासाठी (२४ तासासाठी) निविदा मागवून मा. स्थायी समिती सभेच्या मान्यतेने रु. २०,०००/- प्रति स्वच्छतागृह प्रति महिना या दराने खाजगी संस्थाना कामे नेमून देण्यात आली आहेत. सदर निविदाची मुदत ही जानेवारी २०१६ मध्ये संपत आहे. सदर कामांवर मोठया प्रमाणावर खर्च होत असल्याने मा. विशेष महासभा दि.२२/०७/२०१५ ठराव क्र. ३४ च्या मंजूरीन्वये सदर स्वच्छतागृह सर्व दुरुस्त्या करणे, दैनदिन देखभाल साफसफाई करणे, वीजबील, पाणी बील स्वतः संस्थेने भरणे व संचलनासाठी खाजगी संस्थाना देणे व सदर संस्थानी वापर करणाऱ्या कुटुंबाकडून मासिक दर निश्चित करुन वसूल करणेसाठी निविदा मागविण्यात आल्या. तथापी सदर कामासाठी वारंवार निविदा मागवून देखिल निविदा भरण्यासाठी खाजगी संस्था पुढे आल्या नाहीत. सदर निविदामध्ये पाणीबील, वीजबील व मोठया दुरुस्त्या महानगरपालिकेमार्फत करण्यात येतील अशी दुरुस्ती करुन देखिल निविदाना प्रतिसाद मिळालेला नाही.

*वरील प्रस्तावाबाबत प्रथम टप्प्यात स्वंच्छतागृहे दुरुस्ती कामी वार्षिक मुदतीच्या निविदा मागविणेस व खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता तसेच पुर्नविनीयोजनाद्वारे तरतुद उपलब्ध करुन देयके प्रदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे. हि महानगरपालिका क्षेत्रातील स्वच्छतागृहे देखभाल व संचलनासाठी देण्यासाठी विभागाने सर्व स्वच्छता गृहाबाबत पाहणी करुन तीन श्रेणीत विभागणी करण्यात यावी जेणेकरुन काही स्वच्छतागृहे पैसे द्या व वापरा तत्वावर देता येतील याबाबत गोषवारा पुढील मा. महासभेत ठेवण्यात यावा तोपर्यंत जुन्या निविदा धारकांना तीन महिन्यांपर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.*

**सुचक :- श्री. शरद पाटील** **अनुमोदक :- श्रीम. दिपीका अरोरा**

**सदर ठरावामध्ये सुचक श्री. ध्रुवकिशोर पाटील व अनुमोदक श्री. बर्नड डिमेलो यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली**

*काही संस्था शौचालयाची साफसफाई बरोबर करत नसल्याच्या नागरीकांच्या व नगरसेवकांच्या तक्रारी आल्या आहेत. ते शौचालय त्या संस्थेकडून काढून दुसऱ्या संस्थेस देणेबाबत प्रशासनाने कार्यवाही करावी अशी मी सुचना मांडत आहे.*

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजुर.**
**ठराव वाचुन कायम केला आहे.**

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.३०/०१/२०१६

## (दि. १८/०१/२०१६ रोजीची तहकुब मा. महासभा)

**प्रकरण क्रमांक (१५७ )** :- महानगरपालिका क्षेत्रात होणाऱ्या पाण्याचा उपसा थांबविणे व शहरा बाहेरून येणारा माती भराव नियंत्रण ठेवणेसाठी उपाययोजन  करणेबाबत...

**ठराव क्रमांक** ( १२२ ) :-

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्र मुंबई महानगरपालिकेलगत असून राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ लगत असलेल्या काजूपाडा, चेणा, माशाचा पाडा, दासगुलपाडा, घोडबंदर भागातून मोठ्या प्रमाणावर पाण्याचा उपसा होऊन टँकरव्दारे पाणी मुंबई हद्दीत जातो. सदर टँकर वाहतुकीमुळे सदर भागातील रस्ते वारंवार नादुरूस्त होत आहेत.

तसेच मुंबई हद्दीतून मोठ्या प्रमाणावर माती मिरा भाईंदर क्षेत्रात येत असते. त्यामुळे महानगरपालिकेस रस्त्यावर व आरक्षित जागेवर टाकण्यात येणारी माती काढण्यासाठी मोठ्या प्रमाणावर खर्च येत असतो.

प्रशासनाच्या वरील प्रस्ताव व परिस्थिती पाहता सदर दोन्ही विषयांवर नियंत्रण व उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. मनपा क्षेत्रातून उपसा होणारा पाणी हा मुख्यत्वे मुंबई महानगर क्षेत्रात जातो. सदर पाण्यामुळे जिवितास अपाय होण्यांची शक्यता देखिल आहे, त्यामुळे नियंत्रणाची आवश्यकता आहे. तसेच माती  भरावामुळे देखिल रस्ते खराब झाल्याने त्यावर नियंत्रण करण्याची आवश्कयता आहे. त्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करावी.

१) मातीभराव करणाऱ्या वाहतूक पुरवठादार यांची महानगरपालिकेत नोंदणी करण्यात यावी.

२) ज्या ठिकाणी माती भराव करावयाचे आहे त्या क्षेत्रावर करावयाच्या परिमाणाचा अंदाज घेऊन रु. १००/- प्रति डंपर प्रमाणे रक्कम जमा करुन घ्यावी, जेणेकरुन वाहतूकीमुळे खराब होणारे रस्ते दुरुस्ती करुन घेता येतील.

३) अनधिकृतरीत्या माती वाहतूक करताना आढळल्यास रु.२०००/- प्रति फेरा दंड वसूल करण्यात यावा.

४) स्वामित्व धन भरण्याची संपूर्ण जबाबदारी वाहतूकदार याची राहील.

५) पाणी उपसा करणाऱ्यांची यादी करुन नोंदणी करण्यात यावी.

६) पाणी वाहतूक करणाऱ्या सर्व वाहनाची तपासणी करुन Physical fitness बाबत वाहतूक विभागाचे प्रमाणपत्र असल्याशिवाय वाहतूक करुन देऊ नये.

७) वरील बाबींची पूर्तता केली नसल्यास रु.२०००/- प्रति टँकर दंड आकारण्यात यावा.

८) ज्या ठिकाणी पाण्याचा उपसा करावयाचा आहे, त्या ठिकाणील मातीचे नमून शासकीय प्रयोगशाळेतून त्यांच्या खर्चाने तपासून पाण्याच्या दर्जाबाबत खात्री करण्यात यावी.

वरील कामावर नियंत्रणासाठी मा. आयुक्त यानी स्वतंत्र पथक नेमावे व सदर उपाययोजनेसाठी इतर सर्व कार्यवाही करण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना प्रदान करण्यात येत आहेत.

**सुचक :-** श्री. नरेंद्र मेहता

**अनुमोदक :-** श्री. प्रशांत केळुसकर

**ठराव सर्वानुमते मंजुर.**
**ठराव वाचुन कायम केला आहे.**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि.३०/०१/२०१६
## (दि. १८/०१/२०१६ रोजीची तहकुब मा. महासभा)

**प्रकरण क्र. १५९ :- मालमत्ता कर विभागातील गैर प्रकाराबाबत.**

**ठराव क्र. १२४ :-**

सदरचा विषय रितसर प्रशासनामार्फत पुढे सादर करण्यात यावा असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. नरेंद्र मेहता** **अनुमोदक :- श्री. प्रशांत केळूसकर**

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि.३०/०१/२०१६
## (दि. १८/०१/२०१६ रोजीची तहकुब मा. महासभा)

**प्रकरण क्र. १६० :-** महानगरपालिकाचे मिरारोड येथील स्व. इंदीरा गांधी रुग्णालयातील गैरसोयीबाबत.

**ठराव क्र. १२५ :-**

सदरचा विषया बाबतच्या त्रुटींचा पूर्ण अभ्यास प्रशासनाने करुन नंतर रितसर प्रशासनाने सादर करावा असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत केळूसकर** **अनुमोदक :- श्री. शरद पाटील**

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ३०/०१/२०१६

## (दि. १८/०१/२०१६ रोजीची तहकुब सभा)

प्रकरण क्र. १६१ :- सन्मा. सदस्य श्री. ध्रुवकिशोर पाटील यांचा दिनांक १०/०१/२०१६ (प्राप्त दि. ११/०१/२०१६) रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- केंद्र सरकारच्या हागणदारीमुक्त शहर योजने अंतर्गत घरातील शौचालय बाबत.

(सदरचा विषय फेटाळण्यात आला.)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ३०/०१/२०१६

## (दि. १८/०१/२०१६ रोजीची तहकुब सभा)

प्रकरण क्र. १६२ :- सन्मा. सदस्य श्री. प्रशांत ज्ञानदेव दळवी यांचा दिनांक १३/०१/२०१६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात महिला आणि पुरुषांकरीता अद्यायवत सार्वजनिक शौचालय उभारण्याबाबत.

(सन्मा. सदस्य सभागृहात उपस्थित नसल्यामुळे सदरचा विषय फेटाळण्यात आला.)

# मिरा भाईदर महानगरपालिका
## मा. विशेष महासभा दि. २४/०२/२०१६

**प्रकरण क्र. १६३ :-** **मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रात चित्रिकरणासाठी मराठी मालिका व चित्रपट यांच्याकडून आकारण्यात येत असलेल्या भाड्यात व नगरभवन वापराच्या सवलत भाड्यात देणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.**

**ठराव क्र. १२७ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्र हे मुंबई महानगरपालिकेलगत असल्याने या शहरात विविध भाषिक मालिका व चित्रपट यांचे चित्रिकरण होत असते. सार्वजनिक जागांवर होणाऱ्या चित्रिकरणासाठी महानगरपालिकेने रु.१५०००/- प्रतिदिन हे दर निश्चित केले आहेत. शासनाने असा अध्यादेश पारित केला आहे की, मराठी मालिका व चित्रपट यांचे ५०% कमी दरात चित्रीकरण करण्याची परवानगी देण्यात यावी त्या अनुषंगाने मराठी मालिका व चित्रपट यांना प्रोत्साहन देण्यासाठी त्यांना रु.५,०००/- प्रतिदिन या दरात दर आकारावेत.

सदरचे दर हे प्रति दिवस प्रती साईट (ठिकाण) प्रमाणे आकारण्यात यावेत तसेच सदर मालिका अथवा चित्रपट यांचे चित्रीकरण करताना कोणत्याही प्रकारे फसवणूक करुन सवलत मिळवून चित्रीकरण करताना आढळल्यास अथवा विना परवाना चित्रीकरण करताना आढळल्यास त्यावर १० पटीने दंड आकारण्यात यावा अथवा शुटींग सामुग्री गाड्या जप्त करुन पोलिस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल करण्याबाबतचे संपूर्ण अधिकार मा. आयुक्त यांना देण्यात येत आहे.

तसेच भाईंदर (प.) नगरभवन हॉलचे सध्या आकारण्यात येत असलेले रु.५०००/- प्रति दिन हे भाडे आर्थिक दुर्बल घटकातील नागरीकांसाठी जास्त असल्याने अशा घटकांना ५० टक्के सवलत म्हणजेच रु. २५००/- इतके भाडे आकारण्यात यावे असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- सौ. निलम ढवण** **अनुमोदक :- श्री. मोहन जाधव**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा-भाईंदर महानगरपालिका
## मा. विशेष महासभा दि. २४/०२/२०१६

**प्रकरण क्र.१६४ :- मा. महासभा दि.१३/०७/२०१५, ठराव क्र.३२ राज्य शासनाने निलंबीत केल्याबाबत त्यावर ३० दिवसांच्या आत अभिवेदन सादर करणेबाबत**

**ठराव क्र.** १२८

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे महाजनवाडी सर्व्हे क्र.१०७/१पै, १०८/१,२,३, १०९/२३,२४,२७,२८,११०/५ पै. या जागेच्या मंजुर रेखांकनातील ७७८१.०२ चौ.मी. क्षेत्राच्या नागरी सुविधा क्षेत्राच्या भुखंडापैकी ५०% प्रमाणे जे ३८९०.५१ चौ.मी. क्षेत्राचा भुखंड विकासक मे. काऊटाऊन लॅन्ड डेव्हलपर्स प्रा.लि. यांना ३० वर्षाकरीता भाडेतत्वावर देणेबाबत दि.०१/०२/२०११ रोजी मा. महासभेने ठराव क्र.८५ अन्वये मंजुरी दिलेली असून त्याप्रमाणे विकासकाबरोबर महानगरपालिकेने करारनामा केलेला आहे.

सदरच्या नागरी सुविधा क्षेत्राच्या भुखंडाबाबत मा. उच्च न्यायालय मुंबई येथे याचिका क्र. ४४४८/२०१३ दाखल असुन सदर याचिकेमध्ये अंतिम निर्णय पारित झालेला नाही. तसेच सदर भुखंडाबाबत कुठलीही निविदा प्रक्रिया न करता मा. महासभेच्या ठरावाच्या आधारे सदर भुखंड विकासकास भाडे तत्वावर दिलेला असल्यामुळे सदर भुखंडाबाबत झालेला करारनामा रद्द करुन ती जागा महापालिकेने ताब्यात घेवून विकसीत करणेबाबत दि.१३/०७/२०१५ रोजी मा. महासभेने ठराव क्र.३२ अन्वये मंजुरी दिलेली आहे.

सदर ठराव महानगरपालिकेच्या हिताचा नसल्याचे नमुद करुन विखंडीत करणेबाबत प्रशासनाने शासनाकडे विनंती केलेली आहे. त्याप्रमाणे शासनाने दि.१३/०७/२०१५ रोजीचा ठराव क्र.३२ निलंबित केलेला आहे व याबाबत अभिवेदन सादर करणेबाबत दि.२०/०१/२०१६ रोजीच्या पत्रान्वये कळविलेले आहे.

सदर बाबतीत शासनास अभिवेदन सादर करण्यात येते की, विकासकास सदरचा भुखंड भाडेतत्वावर देताना -

१) निविदा प्रक्रिया करणेत आलेली नाही.

२) भुखंडासाठी भाडे आकारताना खाजगी व्हॅल्युअर मार्फत भाड्याची निश्चिती केलेली असून शासनाकडून भाडे ठरवून घेतलेले नाही.

३) नागरी सुविधा क्षेत्राच्या ५०% प्रमाणेचा ३८९०.५१ चौ.मी. क्षेत्राचा भुखंड भाडे तत्वावर देताना ७७८१.०२ चौ.मी. अनुज्ञेय चटई क्षेत्र निर्देशांक देण्यात आलेला आहे. त्यामुळे महानगरपालिकेच्या ताब्यातील उर्वरीत ५०% प्रमाणेचा जागेमध्ये चटई क्षेत्र निर्देशांक शिल्लक राहिलेले नाही.

४) मिरा भाईंदर शहराच्या मंजुर विकास योजनेमध्ये मोठ्या प्रमाणात शाळेची आरक्षणे प्रस्तावित असून बहुतांश प्रमाणात शाळा विकसीत झालेल्या आहेत. त्यामुळे या जागेमध्ये शाळेऐवजी इतर सार्वजनिक स्वरुपाची जनतेला आवश्यक असणारी सुविधा उपलब्ध करुन देता येवू शकेल.

यास्तव दि.१३/०७/२०१५ रोजीचा ठराव क्र.३२ विखंडीत करण्यात येवू नये म्हणून व या जागेमध्ये पारदर्शकरित्या निविदा प्रक्रियेसह महापालिकेच्या हीताचा निर्णय घेवून भुखंड विकसीत करणेबाबत नव्याने प्रक्रिया करणे महापालिकेला शक्य होईल व त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होणार नाही याप्रमाणे शासनास अभिवेदन सादर करणेसाठी ही महासभा मंजुरी देत आहे.

**सुचक :-** [illegible] **अनुमोदक :-** [illegible]

**ठराव ~~सर्वानुमते~~ बहुमताने मंजुर.**

**ठराव वाचुन कायम केला आहे.**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा.८महासभा दि.२४/०२/२०१६

विशेष

**प्रकरण क्र. १६५- महानगरपालिका आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांचे पदोन्नतीस मान्यता देणेबाबत...**

**ठराव क्र.** १२९

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर श्रेणी-०२, प्रशासकीय सेवा संवर्गात प्रशासन अधिकारी, प्रशासकीय अधिकारी, उपकर निर्धारक व संकलक, आस्थापना अधीक्षक, स्टोअर ऑफिसर, उप-नगरसचिव, अधीक्षक (मार्केट-परवाना), प्रभाग क्षेत्रीय अधिकारी, हेडक्लार्क ची १८ पदे मंजूर आहेत. सदर पदांची वेतनश्रेणी रु. ९३००-३४८०० ग्रेड वेतन ४४०० आहे. मंजुर १८ पदांपैकी ०८ पदे रिक्त आहेत.

आस्थापनेवरील सदर रिक्त पदांवर पदोन्नती देणेकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५४(१) अन्वये गठीत केलेल्या पदोन्नती निवड समितीची बैठक दि. १६/१२/२०१५ रोजी आयोजित करण्यात आली होती.

शासनाने मंजूर केलेल्या सेवा (सेवा भरती व सेवांचे वर्गीकरण) नियम-२०१४ मध्ये सदर पदांवरील पदोन्नतीकरीता आवश्यक असणारी अर्हता खालील प्रमाणे नमुद आहे.

कोटा - १०० % पदोन्नती

अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी किंवा समकक्ष अर्हता.

ब) महापालिकेच्या आस्थापनेवरील ज्येष्ठता व गुणवत्ता या आधारे मुख्य लिपीक किंवा समकक्ष संवर्गातील कर्मचाऱ्यांमधून किमान ०५ वर्षांचा अनुभव.

श्रेणी-०२ प्रशासकीय संवर्गातील रिक्त पदांपैकी बिंदु नियमावलीनुसार अ.जा.-१,भ.ज.-१ खुला-६ प्रवर्गातील आहेत.

वरील प्रमाणे अर्हता लक्षात घेता, मुख्यलिपीक संवर्गातील कर्मचाऱ्यांमधून पात्र ठरणाऱ्या कर्मचाऱ्यांना ज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे श्रेणी-०२ संवर्गातील प्रशासकीय सेवा संवर्गातील पदावर पदोन्नती देणेकरीता गठीत पदोन्नती निवड समितीने खालील प्रमाणे कर्मचाऱ्यांच्या पदोन्नती करीता निवड केलेली आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचे नाव | कार्यरत पद | प्रवर्ग | धारण करीत असलेली अर्हता | |
|---|---|---|---|---|---|
| १. | श्री. विजय सदानंद पाटील | मुख्यलिपीक | खुला | १ | बी.ए. (पेरिअर युनिव्हर्सिटी)<br>एल.जी.एस.<br>एल.एस.जी.डी. |
| | | | | २ | मुख्यलिपीक या पदावर ०५ वर्षापेक्षा जास्त काम केल्याचा अनुभव आहे. |
| २. | श्री. अशोक गायकवाड | मुख्यलिपीक | अनुसूचित | १ | बी.कॉम. (यशवंतराव चव्हाण मुक्त |

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचे नाव | कार्यरत पद | प्रवर्ग | धारण करीत असलेली अर्हता | |
|---|---|---|---|---|---|
| | | | जाती | | विद्यापीठ)<br>एल.जी.एस.<br>जी.डी. अँण्ड सी.ए.<br>एल.एस.जी.डी. |
| | | | | २ | मुख्यलिपीक या पदावर ०५ वर्षापेक्षा जास्त काम केल्याचा अनुभव आहे. |
